# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र. ७० /२०२५

**विषय : अनुकंपा तत्वावरील नियुक्तीसाठी पात्र वारसदारांच्या प्राथमिक प्रतिक्षासूचीबाबत...**

**संदर्भ :** १. शासन निर्णय क्र. अकंपा १२१७/प्र.क्र.:१०२/आठ, दि. २१ सप्टेंबर, २०१७

२. शासन निर्णय क्र.: अकंपा-१२२१/प्र.क्र.१८६/का-८, दिनांक २६ ऑगस्ट, २०२१

३. शासन निर्णय क्र.: अकंपा-२२०७/प्र.क्र.१४१/विशि-१, दिनांक २२ डिसेंबर, २०२३

४. विद्यापीठाचे परिपत्रक क्र.५७/२०२४, जावक क्र.एएन/१३५५, दिनांक ०२ एप्रिल, २०२४

अनुकंपा तत्वावरील नियुक्तीसाठी वारसदारांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, संदर्भीय शासन निर्णय व परिपत्रकान्वये संबंधित नियम, तरतूदी व अटींच्या अधीन राहून दिनांक ३१ डिसेंबर, २०२४ अखेरची स्थिती दर्शविणारी प्राथमिक प्रतिक्षासूची जाहिर करण्यात येत आहे.

सदर यादी www.unipune.ac.in या संकेतस्थळावर पहावयास मिळेल. सर्व अनुकंपा तत्वावरील नियुक्तीसाठी अर्ज केलेल्या वारसदारांनी प्राथमिक प्रतिक्षासूचीतील आपले नाव व त्या अनुषंगाने केलेल्या नोंदी पाहून प्रशासन शिक्षकेतर कक्षात प्राथमिक प्रतिक्षासूचीतील आपल्या नावापुढे स्वाक्षरी करावी. सदर प्राथमिक प्रतिक्षासूचीसंबंधी काही आक्षेप असल्यास सदर परिपत्रक प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांपर्यंत सर्व पुराव्यांसह प्रशासन शिक्षकेतर कक्षाकडे लेखी कळवावे. सदर मुदतीनंतर प्राप्त झालेले आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच प्राथमिक प्रतिक्षासूचीवर स्वाक्षरी न केलेल्या वारसदारांनी प्राथमिक प्रतिक्षासूचीसंबंधी काहीही आक्षेप नाहीत असे समजण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्र.: अकंपा-१२२१/प्र.क्र.१८६/का-८, दिनांक २६ ऑगस्ट, २०२१ अन्वये प्रशासकीय विभागांतर्गत नियुक्ती प्राधिकाऱ्यांच्या स्तरावर गटनिहाय अनुकंपा नियुक्तीची स्वतंत्र प्रतिक्षासूची तयार करण्यासाठी सन २०२३ ते २०२४ या कालावधीत निधन झालेल्या सेवकांच्या अनुकंपा तत्वावरील नियुक्तीसाठी पात्र वारसदारांनी सोबत दिलेल्या विकल्प नमुन्यात अनुकंपा तत्वावरील नियुक्तीसाठी पात्र वारसदारांनी माहिती भरुन सदर परिपत्रक प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांपर्यंत प्रशासन शिक्षकेतर कक्षाकडे जमा करावेत.

गणेशखिंड, पुणे -४११००७
जा.क्र. : एएन/ 1014
दिनांक : 19 MAR 2025

(प्रा.(डॉ.) ज्योती भाकरे)
**प्रभारी कुलसचिव**

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१. मा.विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग
२. मा.संचालक, प्रशाला
३. मा.शाखाप्रमुख, सर्व प्रशासकीय शाखा

यांना विनंती की, सदर परिपत्रक त्यांच्या विभागातील सर्व संबंधित सेवकांच्या निदर्शनास आणावे.

दिनांक : / /

प्रति,
मा.कुलसचिव,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे- ४११००७.

विषय : अनुकंपा तत्वावरील नियुक्तीकरिता विकल्प सादर करण्याबाबत....

संदर्भ : १. शासन निर्णय क्र : अकंपा-१२२१/प्र.क्र.१८६/का-८, दिनांक २६ ऑगस्ट, २०२१.

२. शासन निर्णय क्र: अकंपा-१२१७ /प्र.क्र.१०२/आठ, दिनांक २१ सप्टेंबर, २०१७.

महोदय,

उपरोक्त विषय व संदर्भीय शासन निर्णयास अनुसरुन गटनिहाय अनुकंपा नियुक्तीची (गट- क व गट -ड साठी) स्वतंत्र प्रतिक्षासुची तयार करण्यासाठी मी खालीलप्रमाणे विकल्प सादर करत आहे.

अनुकंपा तत्वावरील नियुक्तीसाठी पात्र वारसदाराचे पुर्ण नाव : ..........................................

जन्मदिनांक : ..........................................
शैक्षणिक अर्हता : ..........................................
शासन निर्णय क्र : अकंपा-१२२१/प्र.क्र.१८६/का-८, ..........................................
दिनांक २६ ऑगस्ट, २०२१ अन्वये गटनिहाय अनुकंपा नियुक्ती :

**(गट - क अथवा गट - ड )**

संपर्कासाठी पत्ता : ..........................................
मोबाईल क्रमांक : ..........................................

कळावे,

आपला/आपली विश्वासु,

..................................

(पूर्ण नाव :.............................................. )

सोबत :- शैक्षणिक अर्हतबाबतची सर्व प्रमाणपत्रे

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

परिशिष्ट-क-१

### अनुकंपा तत्वावर सेवेत सामावून घेण्याकरिता प्राप्त झालेल्या अर्जांची प्राथमिक प्रतिक्षा सूची

### (३१ डिसेंबर, २०२४ अखेरची स्थिती)

( साप्रवि, शासन निर्णय क्र. : अकंपा १२१७/प्र.क्र.१०२/आठ, दि. २१ सप्टेंबर, २०१७, साप्रवि, शासन निर्णय क्र. : अकंपा-१२२१/प्र.क्र.८६/का-८, दिनांक २६ ऑगस्ट, २०२१, उच्चतंशिवि, शासन निर्णय क्र. : संकीर्ण- २२०७/प्र.क्र.१४१/विशि-१, दिनांक २२ डिसेंबर, २०२३. परिपत्रक क्र. ५७/२०२४, जावक क्र.एएन/१३५५, दिनांक ०२ एप्रिल, २०२४ )

| अ. क्र. | मयत कर्मचाऱ्यांचे नाव, पदनाम, व निधन दिनांक | प्रतिक्षासूची मधील उमेदवारांचे नाव | अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | प्रतिक्षासूची मध्ये नाव दाखल झाल्याचा दिनांक | प्रतिक्षा सूची मधील क्रमांक | जन्म तारीख | शैक्षणिक अर्हता | मागासवर्गीय प्रवर्गाचे नाव/खुला | शेरा | नियुक्तीसाठी शिफारस केल्याचा दिनांक व क्रमांक | नियुक्तीसाठी शिफारस कोणत्या कार्यालयात केली. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १. | कै.दत्तू दिनकर साळुंके, विद्युत पर्यवेक्षक, निधन दि.२७/११/२०१९ | श्री.चेतन दत्तू साळुंके | ३१.०१२.२०१९ | -- | -- | १८.०३.१९९१ | एच.एस.सी. | इमाव | अनुकंपा नियुक्तीसाठी प्रस्ताव मा.सहसंचालक (उच्च शिक्षण), पुणे कार्यालयास सादर. | संदर्भ क्र.एएन/३७७५, दिनांक १४.१०.२०२४ | मा.सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, १७, डॉ.आंबेडकर मार्ग, लाल देऊळासमोर, कँप, पुणे-४११ ००१. |
| २. | कै.संजय वसंत पगारे, कनिष्ठ सहायक (सर्व.), निधन दि.२०/०३/२०१७ | कु.जयसन संजय पगारे | १८.०४.२०१७ | -- | -- | २८.०६.२००२ | एच.एस.सी. टंकलेखन - मराठी-३० व इंग्रजी-४० श.प्र.मि., एम.एस.सी.आय.टी. | खुला | अनुकंपा नियुक्तीसाठी प्रस्ताव मा.सहसंचालक (उच्च शिक्षण), पुणे कार्यालयास सादर. | संदर्भ क्र.एएन/३७४३, दिनांक १०.१०.२०२४ | मा.सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, १७, डॉ.आंबेडकर मार्ग, लाल देऊळासमोर, कँप, पुणे-४११ ००१. |

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

परिशिष्ट-क-१

## अनुकंपा तत्वावर सेवेत सामावून घेण्याकरिता प्राप्त झालेल्या अर्जांची प्राथमिक प्रतिक्षा सूची

## (३१ डिसेंबर, २०२४ अखेरची स्थिती)

( साप्रवि, शासन निर्णय क्र. : अकंपा १२१७/प्र.क्र.१०२/आठ, दि. २१ सप्टेंबर, २०१७, साप्रवि, शासन निर्णय क्र. : अकंपा-१२२१/प्र.क्र.१८६/का-८, दिनांक २६ ऑगस्ट, २०२१, उच्चशिवि, शासन निर्णय क्र. : संकीर्ण- २२०७/प्र.क्र.१४१/विशि-१, दिनांक २२ डिसेंबर, २०२३, परिपत्रक क्र. ५७/२०२४, जावक क्र.एएन/१३५५, दिनांक ०२ एप्रिल, २०२४ )

| अ. क्र. | मयत कर्मचाऱ्यांचे नाव, पदनाम, व निधन दिनांक | प्रतिक्षासूची मधील उमेदवारांचे नाव | अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | प्रतिक्षासूची मध्ये नाव दाखल झाल्याचा दिनांक | प्रतिक्षा सूची मधील क्रमांक | जन्म तारीख | शैक्षणिक अर्हता | मागासवर्गीय प्रवर्गाचे नाव/खुला | शेरा | नियुक्तीसाठी शिफारस केल्याचा दिनांक व क्रमांक | नियुक्तीसाठी शिफारस कोणत्या कार्यालयात केली. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| ३. | कै.सुरेश शंकर देसाई, सहायक कक्षाधिकारी (सर्व.), निधन दि.०३/१०/२०२० | कु. अखिल सुरेश देसाई | ०८.१०.२०२० | -- | -- | १७.०२.१९९५ | बी.बी.ए. PGDHRM टंकलेखन मराठी ३० व इंग्रजी ४० श.प्र.मि., एम.एस.सी.आय.टी. | अनुसूचित जाती (SC) | अनुकंपा नियुक्तीसाठी प्रस्ताव मा.सहसंचालक (उच्च शिक्षण), पुणे कार्यालयास सादर. | संदर्भ क्र.एएन/३४८०, दिनांक १९.०९.२४ | मा.सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, १७, डॉ.आंबेडकर मार्ग, लाल देऊळासमोर, कँप, पुणे-४११ ००१. |
| ४. | कै.शंकर गंगाराम मालेराव, दप्तरी, निधन दि.२७/०४/२०२१ | ओंकार शंकर मालेराव | १५.०६.२०२१ | -- | -- | २०.०७.१९९४ | बी.कॉम. | अनुसुचित जाती (SC) | अनुकंपा नियुक्तीसाठी प्रस्ताव मा.सहसंचालक (उच्च शिक्षण), पुणे कार्यालयास सादर. | संदर्भ क्र.एएन/३६३८, दिनांक ०१.१०.२४ | मा.सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, १७, डॉ.आंबेडकर मार्ग, लाल देऊळासमोर, कँप, पुणे-४११ ००१. |

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

परिशिष्ट-क-१

## अनुकंपा तत्वावर सेवेत सामावून घेण्याकरिता प्राप्त झालेल्या अर्जांची प्राथमिक प्रतिक्षा सूची

(३१ डिसेंबर, २०२४ अखेरची स्थिती)

( साप्रवि, शासन निर्णय क्र. : अकंपा १२१७/प्र.क्र.१०२/आठ, दि. २१ सप्टेंबर, २०१७, साप्रवि, शासन निर्णय क्र. : अकंपा-१२२१/प्र.क्र.१८६/का-८, दिनांक २६ ऑगस्ट, २०२१, उच्चतंशिवि, शासन निर्णय क्र. : संकीर्ण- २२०७/प्र.क्र.१४१/विशि-१, दिनांक २२ डिसेंबर, २०२३. परिपत्रक क्र. ५७/२०२४, जावक क्र.एएन/१३५५, दिनांक ०२ एप्रिल, २०२४ )

| अ. क्र. | मयत कर्मचाऱ्यांचे नाव, पदनाम, व निधन दिनांक | प्रतिक्षासूची मधील उमेदवारांचे नाव | अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | प्रतिक्षासूची मध्ये नाव दाखल झाल्याचा दिनांक | प्रतिक्षा सुची मधील क्रमांक | जन्म तारीख | शैक्षणिक अर्हता | मागासवर्गीय प्रवर्गाचे नाव/खुला | शेरा | नियुक्तीसाठी शिफारस केल्याचा दिनांक व क्रमांक | नियुक्तीसाठी शिफारस कोणत्या कार्यालयात केली. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| ५. | कै.नागनाथ बळीराम धाडवे<br>कनिष्ठ सहायक (सर्व.),<br>निधन दि.३०/०६/२०१९ | श्री.योगेश नागनाथ धाडवे | १०.०८.२०१९ | -- | -- | ०४.०९.१९८८ | बी.ए.<br>एम.एस.सी.आय.टी. | अनुसुचित जाती (SC) | अनुकंपा नियुक्तीसाठी प्रस्ताव मा.सहसंचालक (उच्च शिक्षण), पुणे कार्यालयास सादर. | संदर्भ क्र.एएन/३६९६, दिनांक ०८.१०.२४ | मा.सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, १७, डॉ.आंबेडकर मार्ग, लाल देऊळासमोर, कँप, पुणे-४११ ००१. |
| ६. | कै.जालिंदर शंकर खांदवे<br>पहारेकरी<br>निधन दि.१३/११/२०२२ | कु.सायली जालिंदर खांदवे | ३१.१२.२०२२ | -- | -- | २३.०३.२००० | B.Com.<br>Certificate course in MS Office & Tally ERP | खुला | अनुकंपा नियुक्तीसाठी प्रस्ताव मा.सहसंचालक (उच्च शिक्षण), पुणे कार्यालयास सादर. | संदर्भ क्र.एएन/३७३२, दिनांक ०९.१०.२०२४ | मा.सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, १७, डॉ.आंबेडकर मार्ग, लाल देऊळासमोर, कँप, पुणे-४११ ००१. |

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

परिशिष्ट-क-१

### अनुकंपा तत्वावर सेवेत सामावून घेण्याकरिता प्राप्त झालेल्या अर्जांची प्राथमिक प्रतिक्षा सूची
### (३१ डिसेंबर, २०२४ अखेरची स्थिती)

( साप्रवि, शासन निर्णय क्र. : अकंपा १२१७/प्र.क्र.१०२/आठ, दि. २१ सप्टेंबर, २०१७, साप्रवि, शासन निर्णय क्र. : अकंपा-१२२१/प्र.क्र.१८६/का-८, दिनांक २६ ऑगस्ट, २०२१, उवतंशिवि, शासन निर्णय क्र. : संकीर्ण- २२०७/प्र.क्र.१४१/विशि-१, दिनांक २२ डिसेंबर, २०२३. परिपत्रक क्र. ५७/२०२४, जावक क्र.एएन/१३५५, दिनांक ०२ एप्रिल, २०२४ )

| अ. क्र. | मयत कर्मचाऱ्यांचे नाव, पदनाम, व निधन दिनांक | प्रतिक्षासूची मधील उमेदवारांचे नाव | अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | प्रतिक्षासूची मध्ये नाव दाखल झाल्याचा दिनांक | प्रतिक्षा सुची मधील क्रमांक | जन्म तारीख | शैक्षणिक अर्हता | मागासवर्गीय प्रवर्गाचे नाव/खुला | शेरा | नियुक्तीसाठी शिफारस केल्याचा दिनांक व क्रमांक | नियुक्तीसाठी शिफारस कोणत्या कार्यालयात केली. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| ७. | कै.गजेंद्र लक्ष्मण तारडे, हमाल, निधन दि.१८/०४/२०२१ | श्रीमती सुनिता गजेंद्र तारडे | ०७.०६.२०२१ | -- | -- | १४.०९.१९८२ | B.A.(History) टंकलेखन मराठी ३० व इंग्रजी ४० श.प्र.मि., एम.एस.सी.आय.टी. | अनुसूचित जमाती | अनुकंपा नियुक्तीसाठी प्रस्ताव मा.सहसंचालक (उच्च शिक्षण), पुणे कार्यालयास सादर. | संदर्भ क्र.एएन/३८३४, दिनांक १८.१०.२४ | मा.सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, १७, डॉ.आंबेडकर मार्ग, लाल देऊळासमोर, कॅम्प, पुणे-४११ ००१. |
| ८. | कै.पवन रामभाऊ धुले, हमाल, निधन दि.२०/०५/२०२१ | लग्ना पूर्वीचे नाव - श्रीमती दिपाली महादेव गरड | २७.०८.२०२१ | -- | -- | ०९.११.१९९४ | बी.ए., डी.एड., टंकलेखन मराठी ३० व इंग्रजी ४० श.प्र.मि., एम.एस.सी.आय.टी. | खुला | अनुकंपा नियुक्तीसाठी प्रस्ताव मा.सहसंचालक (उच्च शिक्षण), पुणे कार्यालयास सादर. | संदर्भ क्र.एएन/३९४९, दिनांक २८.१०.२४ | मा.सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, १७, डॉ.आंबेडकर मार्ग, लाल देऊळासमोर, कॅम्प, पुणे-४११ ००१. |

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

### परिशिष्ट-क-१

### अनुकंपा तत्वावर सेवेत सामावून घेण्याकरिता प्राप्त झालेल्या अर्जांची प्राथमिक प्रतिक्षा सूची
### (३१ डिसेंबर, २०२४ अखेरची स्थिती)

( सामवि, शासन निर्णय क्र. : अकंपा १२१७/प्र.क्र.१०२/आठ, दि. २१ सप्टेंबर, २०१७, साप्रवि, शासन निर्णय क्र. : अकंपा-१२२१/प्र.क्र.१८६/का-८, दिनांक २६ ऑगस्ट, २०२१, उच्चतंशिवि, शासन निर्णय क्र. : संकीर्ण- २२०७/प्र.क्र.१४१/विशि-१, दिनांक २२ डिसेंबर, २०२३. परिपत्रक क्र. ५७/२०२४, जावक क्र.एएन/१३५५, दिनांक ०२ एप्रिल, २०२४ )

| अ. क्र. | मयत कर्मचाऱ्यांचे नाव, पदनाम, व निधन दिनांक | प्रतिक्षासूची मधील उमेदवारांचे नाव | अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | प्रतिक्षासूची मध्ये नाव दाखल झाल्याचा दिनांक | प्रतिक्षा सूची मधील क्रमांक | जन्म तारीख | शैक्षणिक अर्हता | मागासवर्गीय प्रवर्गाचे नाव/खुला | शेरा | नियुक्तीसाठी शिफारस केल्याचा दिनांक व क्रमांक | नियुक्तीसाठी शिफारस कोणत्या कार्यालयात केली. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| ९. | कै.विलास कांतीलाल गांधी, सहायक कक्षाधिकारी (सर्व.), निधन दि.०४/०२/२०२१ | (लग्ना पुर्वीचे नाव- श्रीमती ऋतुजा विलास गांधी) (लग्ना नंतरचे नाव- श्रीमती ऋतुजा समित शेठ ) | १२.०२.२०२१ | -- | -- | ०९.०८.१९९१ | एम.कॉम. एम.एस.सी.आय.टी. | खुला | अनुकंपासाठी पदे उपलब्ध झाल्यानंतर शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात येईल. | | |
| १०. | कै.कांतीलाल रामचंद्र कैंगार, शिपाई, निधन दि.१३/०५/२०१९ | श्रीमती रेखा रामचंद्र कैंगार (परित्यक्ता बहीण) | ०६.१२.२०२२ | -- | -- | ०१.०६.१९८५ | एस.एस.सी. | अनुसुचित जाती (SC) | अनुकंपा नियुक्तीसाठी प्रस्ताव मा.सहसंचालक (उच्च शिक्षण), पुणे कार्यालयास सादर. | संदर्भ क्र. एएन/६८, दिनांक ०७.०१.२०२५ | मा.सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, १७, डॉ.आंबेडकर मार्ग, लाल देऊळासमोर, कॅम्प, पुणे-४११ ००१. |

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.**

**परिशिष्ट-क-१**

**अनुकंपा तत्वावर सेवेत सामावून घेण्याकरिता प्राप्त झालेल्या अर्जांची प्राथमिक प्रतिक्षा सूची**

**(३१ डिसेंबर, २०२४ अखेरची स्थिती)**

( साप्रवि, शासन निर्णय क्र. : अकंपा १२१७/प्र.क्र.१०२/आठ, दि. २१ सप्टेंबर, २०१७, साप्रवि, शासन निर्णय क्र. : अकंपा-१२२१/प्र.क्र.१८६/का-८, दिनांक २६ ऑगस्ट, २०२१, उच्चतंशिवि, शासन निर्णय क्र. : संकीर्ण- १२०७/प्र.क्र.१४१/विशि-१, दिनांक २२ डिसेंबर, २०२३. परिपत्रक क्र. ५७/२०२४, जावक क्र.एएन/१३५५, दिनांक ०२ एप्रिल, २०२४ )

| अ. क्र. | मयत कर्मचाऱ्यांचे नाव, पदनाम, व निधन दिनांक | प्रतिक्षासूची मधील उमेदवारांचे नाव | अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | प्रतिक्षासूची मध्ये नाव दाखल झाल्याचा दिनांक | प्रतिक्षा सूची मधील क्रमांक | जन्म तारीख | शैक्षणिक अर्हता | मागासवर्गीय प्रवर्गाचे नाव/खुला | शेरा | नियुक्तीसाठी शिफारस केल्याचा दिनांक व क्रमांक | नियुक्तीसाठी शिफारस कोणत्या कार्यालयात केली. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| ११. | कै. स्नेहदिप सटवा गायकवाड कनिष्ठ सहायक (सर्वसाधारण) निधन दि.०४/०७/२०२२ | श्रीमती प्रज्ञा स्नेहदिप गायकवाड | १०.०८.२०२२ | -- | -- | ०७.०५.१९८८ | RGNM (Revised General Nursing & Midwifery) | अनुसुचित जाती (SC) | अनुकंपासाठी पदे उपलब्ध झाल्यानंतर शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात येईल. | | |
| १२. | कै.संतोष बदाम शिंदे सहायक कक्षाधिकारी निधन दि. २१.०८.२०२३ | श्रीमती पुनम संतोष शिंदे | १५.०९.२०२३ | -- | -- | १५.०६.१९८६ | B.A.(HINDI), M.A.(HINDI) टंकलेखन इंग्रजी - ३० व इंग्रजी-४० श.प्र.मि., एम.एस.सी.आय.टी. | अनुसुचित जमाती | अनुकंपासाठी पदे उपलब्ध झाल्यानंतर शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात येईल. | | |
| १३. | कै.मीरा बाळू उगवे कनिष्ठ सहायक (सर्वसाधारण) निधन दि.१०/१२/२०२१ | श्री.मनोज बाळू उगवे | ०५.०१.२०२२ | -- | -- | ०५.०२.१९८८ | एच.एस.सी. टंकलेखन मराठी ३० व इंग्रजी ४० श.प्र.मि., एम.एस.सी.आय.टी. | इमाव | अनुकंपासाठी पदे उपलब्ध झाल्यानंतर शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात येईल. | | |

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.**

**परिशिष्ट-क-१**

**अनुकंपा तत्वावर सेवेत सामावून घेण्याकरिता प्राप्त झालेल्या अर्जांची प्राथमिक प्रतिक्षा सूची**

**(३१ डिसेंबर, २०२४ अखेरची स्थिती)**

( साप्रवि, शासन निर्णय क्र. : अकंपा १२१७/प्र.क्र.१०२/आठ, दि. २१ सप्टेंबर, २०१७, साप्रवि, शासन निर्णय क्र. : अकंपा-१२२१/प्र.क्र.१८६/का-८, दिनांक २६ ऑगस्ट, २०२१, उच्चशिवि, शासन निर्णय क्र. : संकीर्ण- २२०७/प्र.क्र.१४१/विशि-१, दिनांक २२ डिसेंबर, २०२३. परिपत्रक क्र. ५७/२०२४, जावक क्र.एएन/१३५५, दिनांक ०२ एप्रिल, २०२४ )

| अ. क्र. | मयत कर्मचाऱ्यांचे नाव, पदनाम, व निधन दिनांक | प्रतिक्षासुची मधील उमेदवारांचे नाव | अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | प्रतिक्षासूची मध्ये नाव दाखल झाल्याचा दिनांक | प्रतिक्षा सुची मधील क्रमांक | जन्म तारीख | शैक्षणिक अर्हता | मागासवर्गीय प्रवर्गाचे नाव/खुला | शेरा | नियुक्तीसाठी शिफारस केल्याचा दिनांक व क्रमांक | नियुक्तीसाठी शिफारस कोणत्या कार्यालयात केली. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १४. | कै.सुनिल रघुनाथ मुखेकर, वरिष्ठ सहायक (सर्व.), निधन दि.११/०२/२०१९ | श्री.यश सुनिल मुखेकर | १७.०७.२०१९ | -- | -- | ०१.०४.२००२ | एच.एस.सी. B.Com टंकलेखन - मराठी - ३० व ईग्रजी - ४० श.प्र.मि., एम.एस.सी.आय.टी | खुला | १. श्री.मुखेकर अर्जदार (वारस) अल्पवयीन असल्याने सज्ञान होईपर्यंत हक्क अबाधित ठेवणेसंदर्भात या कार्यालयाचे संदर्भ क्र.एएन/३१४१ दि.०१/०८/२०१९ नुसार शासनाकडे प्रस्ताव पाठविलेला आहे. २. १८ वर्षे पुर्ण झाल्याचा दि. ३१/०३/२०२०. ३. अनुकंपासाठी पदे उपलब्ध झाल्यानंतर शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात येईल. | | |

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

### परिशिष्ट-क-१

### अनुकंपा तत्वावर सेवेत सामावून घेण्याकरिता प्राप्त झालेल्या अर्जांची प्राथमिक प्रतिक्षा सूची

### (३१ डिसेंबर, २०२४ अखेरची स्थिती)

( साप्रवि, शासन निर्णय क्र. : अकंपा १२१७/प्र.क्र.१०२/आठ, दि. २१ सप्टेंबर, २०१७, साप्रवि, शासन निर्णय क्र. : अकंपा-१२२१/प्र.क्र.१८६/का-८, दिनांक २६ ऑगस्ट, २०२१, उच्चतंशिवि, शासन निर्णय क्र. : संकीर्ण- २२०७/प्र.क्र.१४१/विशि-१, दिनांक २२ डिसेंबर, २०२३, परिपत्रक क्र. ५७/२०२४, जावक क्र.एएन/१३५५, दिनांक ०२ एप्रिल, २०२४ )

| अ. क्र. | मयत कर्मचाऱ्यांचे नाव, पदनाम, व निधन दिनांक | प्रतिक्षासूची मधील उमेदवारांचे नाव | अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | प्रतिक्षासूची मध्ये नाव दाखल झाल्याचा दिनांक | प्रतिक्षा सूची मधील क्रमांक | जन्म तारीख | शैक्षणिक अर्हता | मागासवर्गीय प्रवर्गाचे नाव/खुला | शेरा | नियुक्तीसाठी शिफारस केल्याचा दिनांक व क्रमांक | नियुक्तीसाठी शिफारस कोणत्या कार्यालयात केली. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १५. | कै.अनुप काशिनाथ गायकवाड, प्रमुख भांडाररक्षक, निधन दि.२८/१२/२०१६ | कु. निधी अनुप गायकवाड | २५.०१.२०१७ | ---- | --- | ०१.०६.२००७ | ---- | --- | १. कु.निधी अनुप गायकवाड (वारस) सद्यस्थितीत अज्ञान<br>२. जन्मतारीख-- ०१.०६.२००७<br>१८ वर्ष पुर्ण — ३१.०५.२०२५.<br>३. सबब, प्रस्ताव प्रलंबित. | | |
| १६. | कै.सुनिता विश्वास ओहोळ निम्नश्रेणी लघुलेखक निधन दि. १५/११/२०१७ उच्च श्रेणी लघुलेखक (मराठी) | कु.प्रतिक विश्वास ओहोळ | २०.११.२०१७ | ---- | --- | --- | --- | --- | निधन समयी मृत कर्मचारी धारण करत असलेले पदनाम गट-ब मधील असून, सदरचे पदनाम मा.सर्वोच्च न्यायालयात न्यायप्रविष्ठ आहे. सबब, प्रस्ताव प्रलंबित. | | |
| १७. | कै.अशोक गोविंद भोसले, कार्यशाळा कार्यदेशक, निधन दि.२६/०४/२०२१ | हर्षल अशोक भोसले | ०१.०६.२०२१ | ---- | --- | २५.०८.२००४ | एस.एस.सी. | -- | १. अनुकंपासाठी अर्ज प्राप्त पण माहिती अपूर्ण सादर केलेली आहे.<br>२. सबब, प्रस्ताव प्रलंबित. | | |

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

परिशिष्ट-क-१

## अनुकंपा तत्वावर सेवेत सामावून घेण्याकरिता प्राप्त झालेल्या अर्जांची प्राथमिक प्रतिक्षा सूची

## (३१ डिसेंबर, २०२४ अखेरची स्थिती)

( साप्रवि, शासन निर्णय क्र. : अकंपा १२१७/प्र.क्र.१०२/आठ, दि. २१ सप्टेंबर, २०१७, साप्रवि, शासन निर्णय क्र. : अकंपा-१२२१/प्र.क्र.१८६/का-८, दिनांक २६ ऑगस्ट, २०२१, उच्चतंशिवि, शासन निर्णय क्र. : संकोर्ण- २२०७/प्र.क्र.१४१/विशि-१, दिनांक २२ डिसेंबर, २०२३. परिपत्रक क्र. ५७/२०२४, जावक क्र.एएन/१३५५, दिनांक ०२ एप्रिल, २०२४ )

| अ. क्र. | मयत कर्मचाऱ्यांचे नाव, पदनाम, व निधन दिनांक | प्रतिक्षासूची मधील उमेदवारांचे नाव | अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | प्रतिक्षासूची मध्ये नाव दाखल झाल्याचा दिनांक | प्रतिक्षा सुची मधील क्रमांक | जन्म तारीख | शैक्षणिक अर्हता | मागासवर्गीय प्रवर्गाचे नाव/खुला | शेरा | नियुक्तीसाठी शिफारस केल्याचा दिनांक व क्रमांक | नियुक्तीसाठी शिफारस कोणत्या कार्यालयात केली. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १८. | कै.समिर माणिक नेवकर, वरिष्ठ सहायक(लेखा), निधन दि.१३/०४/२०२१ | कु.वेदांत समीर नेवकर<br><br>जन्मतारीख-२४.२.२००८ | १७.०६.२०२१ | ---- | --- | २४.२.२००८ | --- | --- | १. कै.समिर माणिक नेवकर यांचा मुलगा कु.वेदांत समीर नेवकर हा प्रस्ताव पाठवतेवेळी अल्पवयीन असल्याने, कु.वेदांत समीर नेवकर यांचे वयाची १८ वर्षे पुर्ण झाल्यानंतर अनुकंपा तत्वावर सेवेत घेणेसाठीचा अनुकंपा नियुक्तीचा प्रस्ताव सादर करण्यात येईल. तसेच तो पर्यंत कु.वेदांत समीर नेवकर यांचा हक्क अबाधित ठेवण्यासंबंधित संदर्भ क्र.एएन/२०६८ दि.३०/०६/२०२१ अन्वये मा.सहसंचालक, (उच्च शिक्षण), पुणे विभाग यांना कळविण्यात आले आहे.<br><br>२. जन्मतारीख – | | |

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

परिशिष्ट-क-१

### अनुकंपा तत्वावर सेवेत सामावून घेण्याकरिता प्राप्त झालेल्या अर्जांची प्राथमिक प्रतिक्षा सूची

### (३१ डिसेंबर, २०२४ अखेरची स्थिती)

( साप्रवि, शासन निर्णय क्र. : अकंपा १२१७/प्र.क्र.१०२/आठ, दि. २१ सप्टेंबर, २०१७, साप्रवि, शासन निर्णय क्र. : अकंपा-१२२१/प्र.क्र.१८६/का-८, दिनांक २६ ऑगस्ट, २०२१, उच्चतंशिवि, शासन निर्णय क्र. : संकीर्ण- २२०७/प्र.क्र.१४१/विशि-१, दिनांक २२ डिसेंबर, २०२३. परिपत्रक क्र. ५७/२०२४, जावक क्र.एएन/१३५५, दिनांक ०२ एप्रिल, २०२४ )

| अ. क्र. | मयत कर्मचाऱ्यांचे नाव, पदनाम, व निधन दिनांक | प्रतिक्षासुची मधील उमेदवारांचे नाव | अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | प्रतिक्षासुची मध्ये नाव दाखल झाल्याचा दिनांक | प्रतिक्षा सुची मधील क्रमांक | जन्म तारीख | शैक्षणिक अर्हता | मागासवर्गीय प्रवर्गाचे नाव/खुला | शेरा | नियुक्तीसाठी शिफारस केल्याचा दिनांक व क्रमांक | नियुक्तीसाठी शिफारस कोणत्या कार्यालयात केली. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| | | | | | | | | | २४.०२.२००८<br>१८ वर्षे पूर्ण –<br>२४.०२.२०२६<br>३. सबब, प्रस्ताव प्रलंबित. | | |
| १९. | कै.सकुबाई मच्छिंद्र ढोकळ<br>हमाल<br>निधन<br>दि.०८/०३/२०२३ | श्रीमती उषा रवि ढोकळ | ०६.०३.२०२४ | ---- | -- | १७.०३.१९८६ | एस.एस.सी. परीक्षा अनुत्तीर्ण | अनुसुचित जाती | १. संदर्भ क्र.एएन/१५६६, दिनांक १५ मे, २०२३ अन्वये अनुकंपा तत्वावर वारसदारास नोकरी मिळण्याकरिता कागदपत्रांची पर्तता करण्याबाबत कळविले आहे.<br>२. अद्याप कागदपत्रे अप्राप्त. | | |
| २०. | कै.पारखी प्रसाद दत्तात्रय<br>शिपाई<br>निधन दि. १७/१२/२०१५ | | | ---- | --- | ---- | --- | ---- | अद्याप अर्ज प्राप्त झालेला नाही. | | |

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

परिशिष्ट-क-१

## अनुकंपा तत्वावर सेवेत सामावून घेण्याकरिता प्राप्त झालेल्या अर्जांची प्राथमिक प्रतिक्षा सूची

(३१ डिसेंबर, २०२४ अखेरची स्थिती)

( साप्रवि, शासन निर्णय क्र. : अकंपा १२१७/प्र.क्र.१०२/आठ, दि. २१ सप्टेंबर, २०१७, साप्रवि, शासन निर्णय क्र. : अकंपा-१२२१/प्र.क्र.१८६/का-८, दिनांक २६ ऑगस्ट, २०२१, उवतंशिवि, शासन निर्णय क्र. : संकीर्ण- २२०७/प्र.क्र.१४१/विशि-१, दिनांक २२ डिसेंबर, २०२३. परिपत्रक क्र. ५७/२०२४, जावक क्र.एएन/१३५५, दिनांक ०२ एप्रिल, २०२४ )

| अ. क्र. | मयत कर्मचाऱ्यांचे नाव, पदनाम, व निधन दिनांक | प्रतिक्षासूची मधील उमेदवारांचे नाव | अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | प्रतिक्षासूची मध्ये नाव दाखल झाल्याचा दिनांक | प्रतिक्षा सुची मधील क्रमांक | जन्म तारीख | शैक्षणिक अर्हता | मागासवर्गीय प्रवर्गाचे नाव/खुला | शेरा | नियुक्तीसाठी शिफारस केल्याचा दिनांक व क्रमांक | नियुक्तीसाठी शिफारस कोणत्या कार्यालयात केली. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| २१. | कै. वाळिंबे अविनाश माधव तंत्रज्ञ (सर्वसाधारण) निधन दि.०२/१२/२०१९ | ---- | --- | ---- | --- | ---- | --- | ---- | अद्याप अर्ज प्राप्त झालेला नाही. | | |
| २२. | कै. बेल लाजा शिंदे शिपाई निधन दि.३०.०७.२०१९ | वारसदार- कु. जीवन बेल शिंदे तदनंतर कुमारी दिपाली बेल शिंदे यांचा अर्ज प्राप्त. | जीवन अर्ज प्राप्त दिनांक ०९.११.२०२० कु. दिपालीचा अर्ज प्राप्त दिनांक १५.०४.२०२४ | -- | --- | ०१.०६.२००० | आठवी पास | अनुसुचित जमाती | अनुकंपासाठी पदे उपलब्ध झाल्यानंतर शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात येईल. | | |
| २३. | कै. संतोष रामचंद्र मोरे पदनाम - क्षेत्रीक निधन दि. ०७.०४.२०२४ | श्रीमती मनिषा संतोष मोरे | ०९.०५.२०२४ | --- | --- | ०६.०६.१९८९ | एच.एस.सी. उत्तीर्ण | खुला | अनुकंपासाठी पदे उपलब्ध झाल्यानंतर शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात येईल. | | |

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.**

**परिशिष्ट-क-१**

**अनुकंपा तत्वावर सेवेत सामावून घेण्याकरिता प्राप्त झालेल्या अर्जाची प्राथमिक प्रतिक्षा सूची**

**(३१ डिसेंबर, २०२४ अखेरची स्थिती)**

( साप्रवि, शासन निर्णय क्र. : अकंपा १२१७/प्र.क्र.१०२/आठ, दि. २१ सप्टेंबर, २०१७, साप्रवि, शासन निर्णय क्र. : अकंपा-१२२१/प्र.क्र.१८६/का-८, दिनांक २६ ऑगस्ट, २०२१, उच्चतंशिवि, शासन निर्णय क्र. : संकीर्ण- २२०७/प्र.क्र.१४१/विशि-१, दिनांक २२ डिसेंबर, २०२३. परिपत्रक क्र. ५७/२०२४, जावक क्र.एएन/१३५५, दिनांक ०२ एप्रिल, २०२४ )

| अ. क्र. | मयत कर्मचाऱ्यांचे नाव, पदनाम, व निधन दिनांक | प्रतिक्षासूची मधील उमेदवारांचे नाव | अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | प्रतिक्षासूची मध्ये नाव दाखल झाल्याचा दिनांक | प्रतिक्षा सुची मधील क्रमांक | जन्म तारीख | शैक्षणिक अर्हता | मागासवर्गीय प्रवर्गाचे नाव/खुला | शेरा | नियुक्तीसाठी शिफारस केल्याचा दिनांक व क्रमांक | नियुक्तीसाठी शिफारस कोणत्या कार्यालयात केली. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| २४. | कै.प्रभु गुराप्पा देवकर<br>निधन दिनांक १९.०२.२०२४ | (लग्ना पुर्वीचे नाव- श्रीमती माधुरी प्रभु देवकर)<br>(लग्ना नंतरचे नाव- श्रीमती माधुरी आनंद पवार) | ०७.०२.२०२५ | --- | -- | १८.०९.१९९१ | एस.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण | | अद्याप कागदपत्रे अप्राप्त. | | |

[ टिप :- प्रतिक्षा सूचीमध्ये उमेदवारांचे नाव त्याने विहित मुदतीत ज्या दिनांकास परिपूर्ण अर्ज सादर करेल त्या दिनांकास प्रतिक्षासूचीमध्ये नाव समाविष्ट करण्यात यावे.
(शासन निर्णय क्र : अकंपा-१२२१/प्र.क्र.१८६/का-८, दिनांक २६ ऑगस्ट, २०२१) ]

(प्रा. (डॉ.) ज्योती भाकरे)
प्रभारी कुलसचिव

अनुकंपा तत्वावर शासन सेवेत नियुक्ती
देण्यासंदर्भात निर्गमित करण्यात आलेल्या
शासन निर्णय/परिपत्रक यांचे एकत्रिकरण

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक : अकंपा १२१७/प्र.क्र.१०२/आठ
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २१ सप्टेंबर, २०१७.

वाचा :
१. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. अकंपा-१०९३/२३३५/प्र.क्र.९०/९३/आठ, दिनांक २६.१०.१९९४
२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.अकंपा-१०९५/प्र.क्र. ३४-अ/आठ, दिनांक २३.०८.१९९६
३. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.अकंपा-१०९५/प्र.क्र. ३४-अ/आठ, दिनांक ११.०९.१९९६
४. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.अकंपा-१०९६/प्र.क्र.६७/९६/आठ, दिनांक २०.१२.१९९६
५. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.अकंपा-१०९३/२३३५/प्र.क्र.९०/९३/आठ, दिनांक १२.०३.१९९७
६. शासन परिपत्रक, क्र. अकंपा-१०९७/प्र.क्र.१९/९७/आठ, दि. ०७.०६.१९९७
७. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.अकंपा-१०९७/प्र.क्र.३२/ आठ, दिनांक ०८.०९.१९९७
८. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.अकंपा-१०९७/प्र.क्र.५०/९७/आठ, दिनांक ०४.१०.१९९७
९. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.अकंपा-१०९३/२३३५/ प्र.क्र.९०/९३/आठ, दिनांक २१.११.१९९७
१०. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.अकंपा-१०९८/प्र.क्र.५ /९८/आठ, दिनांक १०.०३.१९९८
११. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.अकंपा-१०००/ प्र.क्र.२०/२०००/आठ, दिनांक २८.०३.२००१
१२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.अकंपा-१०००/ प्र.क्र.५/२००१/आठ, दिनांक ०२.०५.२००१
१३. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.अकंपा-१०००/प्र.क्र.५९/२०००/आठ, दिनांक २४.०९.२००१
१४. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.अकंपा-१००१/प्र.क्र.५/२००२/आठ, दिनांक ३०.०७.२००२
१५. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.अकंपा-१०००/प्र.क्र.५९/२०००/आठ, दिनांक २१.११.२००२

१६. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.अकंपा-१००१/प्र.क्र.५/२००२/आठ, दिनांक २२.०१.२००३
१७. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.अकंपा-१००३/प्र.क्र.२५/२००३/आठ, दिनांक १३.०६.२००३
१८. शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.अकंपा-१००३/प्र.क्र.५१/२००३/आठ, दिनांक २९.१०.२००३
१९. शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.अकंपा-१००३/प्र.क्र.५९/२००३/आठ, दिनांक ३०.०१.२००४
२०. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.अकंपा-१००४/प्र.क्र.५१/२००४/आठ, दिनांक २२.०८.२००५
२१. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.अकंपा-१००६/प्र.क्र.१७४/०६/आठ, दिनांक १७.०७.२००७
२२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.अकंपा-१००७/प्र.क्र.१८१/०७/आठ, दिनांक ०१.०१.२००८
२३. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.अकंपा-१००८/अनौ.१७/०८/प्र.क्र. ३५/०८/आठ, दिनांक ३१.०३.२००८
२४. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.अकंपा-१००७/१२९५/प्र.क्र.१८१/०७/आठ, दिनांक २३.०४.२००८
२५. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.अकंपा-१००८/प्र.क्र.८७/०८/आठ, दिनांक ०६.११.२००८
२६. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.अकंपा-१००८/प्र.क्र.२४८/०८/आठ, दिनांक २०.०१.२००९
२७. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.अकंपा-१००८/११४२/प्र.क्र.१६६/०८/आठ, दिनांक १०.०७.२००९
२८. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.अकंपा-१००८/प्र.क्र.२४८/०८/आठ, दिनांक १३.११.२००९
२९. शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.अकंपा-१००९/८२२६/प्र.क्र.२०१/०९/आठ, दिनांक ०५.०२.२०१०
३०. शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.अकंपा-१०१०/६७/प्र.क्र.४१/१०/आठ, दिनांक १५.०५.२०१०
३१. शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.अकंपा-१०१०/प्र.क्र. २४४/आठ, दिनांक- १३.१०.२०१०
३२. शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, क्र.अकंपा-१०१०/प्र.क्र.३०८/आठ, दिनांक ०६.१२.२०१०
३३. शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.अकंपा-१००९/५८२/प्र.क्र.७६/२००९/आठ, दिनांक ०५.०३.२०११

३४. शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, क्र.अकंपा-१०१२/प्र.क्र.२०४/आठ, दिनांक १७.०९.२०१२
३५. शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, क्र.अकंपा-१०१३/प्र.क्र.८/आठ, दिनांक २६.०२.२०१३
३६. शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, क्र.अकंपा-१०१४/प्र.क्र.३४/आठ, दिनांक ०१.०३.२०१४
३७. शासन पूरक पत्र,सामान्य प्रशासन विभाग, क्र.अकंपा-१०१४/प्र.क्र.३४/आठ, दिनांक ०२.०५.२०१४
३८. शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, क्र.अकंपा-१०१४/प्र.क्र.१६४/आठ, दिनांक २०.०५.२०१५
३९. शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, क्र.अकंपा-१२१५/प्र.क्र.४७/आठ, दिनांक २८.१०.२०१५
४०. शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, क्र.अकंपा-१०१४/प्र.क्र.१५५/आठ, दिनांक १७.११.२०१६
४१. शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, क्र.अकंपा-१२१७/प्र.क्र.४६/आठ, दिनांक ०३.०५.२०१७

प्रस्तावना :

शासकीय सेवेत असताना कर्मचारी/अधिकारी दिवंगत झाल्यास किंवा गंभीर आजार, अपघात यामुळे शासकीय सेवा करण्यास वैद्यकीय दृष्टया कायमचा असमर्थ ठरल्यामुळे रुग्णता सेवा निवृत्त झाल्यास त्याच्या कुटुंबावर ओढावण्या-या आर्थिक आपत्तीत कुटुंबियांना तातडीने मदत मिळण्याच्या उद्देशाने सन १९७६ साली प्रथमत: अनुकंपा नियुक्तीची योजना लागू केली. या योजनेमध्ये शासन निर्णय, दि. २६.१०.१९९४ अन्वये अनुकंपा तत्वावर नियुक्तीबाबतची सुधारित नियमावली विहीत करण्यात आली व त्यामध्ये वेळोवेळी संदर्भाधीन शासन निर्णय/परिपत्रकांन्वये दुरुस्त्या करण्यात आल्या व नवीन तरतुदी समाविष्ट करण्यात आल्या. सदर तरतुदी एकत्रित स्वरुपात नसल्यामुळे अनुकंपा तत्वावर नियुक्तीबाबतची कार्यवाही करताना नियुक्ती प्राधिकारी यांना अडचणी निर्माण होतात तसेच प्रकरणपरत्वे निर्णय घेताना विसंगती निर्माण होण्याची शक्यता असते. सदर बाब विचारात घेता संदर्भाधीन शासन निर्णय व शासन परिपत्रकांमधील सर्व महत्वाच्या तरतूदी एकत्रित करुन त्या एकाच आदेशात नमूद केल्या तर कार्यवाही करताना सुलभ जाईल. त्यामुळे प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने सर्व शासन निर्णय/शासन परिपत्रकामधील एकत्रित तरतुदी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने त्यांचे संकलन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. यानुसार अनुकंपा नियुक्ती योजनेसंबंधी शासन निर्णय, सा.प्र.वि., दि. २६.१०.१९९४ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या संदर्भाधीन सर्व शासन निर्णय/शासन परिपत्रकांचे एकत्रीकरण करुन सर्वसमावेशक आदेश पुढीलप्रमाणे देण्यात येत आहेत:-

शासन निर्णय :

१. राज्य शासकीय कर्मचा-यांच्या पात्र वारसदारांना लागू असलेल्या अनुकंपा नियुक्ती योजनेसंबंधी निर्गमित करण्यात आलेल्या सर्व आदेशांचे अधिक्रमण करुन सुधारित आदेश दि. २६.१०.१९९४ रोजी निर्गमित केले आहेत. अनुकंपा नियुक्ती योजनेसंबंधी शासन निर्णय, सा.प्र.वि., दि. २६.१०.१९९४ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या संदर्भाधीन सर्व निर्गमित झालेले शासन निर्णय/परिपत्रके यामधील महत्वाच्या एकत्रित तरतुदी सोबतच्या परिशिष्ट 'अ' नुसार असतील. संदर्भाधिन शासन निर्णय व परिपत्रकांमधील आदेशांचे एकत्रिकरण करतांना मूळ तरतूदी जश्याच्या तश्या घेण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे अनुकंपा नियुक्ती देतांना काही अडचणी उदभवल्यास उपरोक्त संदर्भाधीन मूळ शासन निर्णय व परिपत्रकांचे अवलोकन करावे.

२. दिवंगत शासकीय कर्मचा-याच्या कुटुंबियाने करावयाचा अर्ज व तत्संबंधीची माहिती सोबतच्या परिशिष्ट 'ब' नुसार असेल.

३. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दि. २०.१२.१९९६ मध्ये नमूद केलेली अनुकंपा नियुक्तीसाठी गट-क मधील कार्यकारी पदांची यादी सोबतच्या परिशिष्ट 'क' नुसार असेल.

४. अनुकंपा नियुक्तीसाठी नियुक्ती प्राधिकारी यांनी ठेवावयाच्या प्रतीक्षासूचीचे प्रारुप परिशिष्ट 'ड' नुसार असेल.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७०९२११५०८४८५२०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Mukesh Khullar

Digitally signed by Mukesh Khullar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, [illegible]

(मुकेश खुल्लर)
अपर मुख्य सचिव (सेवा), महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपालांचे सचिव, मलबार हिल मुंबई,
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३. मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा, विधान भवन, मुंबई,
५. सर्व सन्माननीय संसद सदस्य,
६. विधान सभा सदस्य/विधान परिषद सदस्य,
७. मा. मुख्य सचिव,
८. सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
९. सर्व मंत्रालयीन विभाग,

१०.प्रबंधक मूळ शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
११.प्रबंधक अपिल शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
१२.प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१३.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने),
१४.प्रधान सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय (विधानसभा) मुंबई,
१५.सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, (विधान परिषद), मुंबई,
१६.सचिव, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासन भवन, मुंबई,
१७.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई,
१८.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, मुंबई,
१९. महालेखापाल (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई,
२०. महालेखापाल (लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, मुंबई,
२१.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२२.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
२३.मुख्य लेखा परीक्षक (निवासी लेखे), कोकण भवन, नवी मुंबई,
२४. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई, (२ प्रती प्रसिध्दीकरिता)
२५. सर्व विभागीय आयुक्त/सर्व जिल्हाधिकारी,
२६.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
२७.निरनिराळया मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
२८.सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
२९.सामान्य प्रशासन विभाग/का.३९,(महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दीकरिता)
३०. निवडनस्ती. (कार्यासन-८).

परिशिष्ट- 'अ'

(शासन निर्णय क्रमांक : अकंपा १२१७/प्र.क्र.१०२/आठ, दिनांक २१ सप्टेंबर, २०१७.)

(शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दि. २६.१०.१९९४ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णय/शासन परिपत्रकान्वये विहीत केलेली अनुकंपा कारणास्तव शासकीय सेवेत नोकरी देण्याबाबतची एकत्रित नियमावली)

१. महाराष्ट्र राज्य शासनाच्या सर्व कार्यालयात अनुकंपा कारणास्तव करावयाच्या नेमणूकांना हे नियम लागू राहतील.

२. अनुकंपा नियुक्ती योजनेसंदर्भातील तरतुदी ह्या केवळ शासकीय कर्मचा-यांपूरत्याच सीमीत आहेत. सदर तरतुदी ह्या जिल्हा परिषदा/ नगरपालिका / महानगरपालिका / महामंडळे / प्राधिकरणे / व्यापारी उपक्रम व इतर तत्सम आस्थापनावरील कर्मचा-यांना थेट लागू होणार नाहीत. त्यासाठी संबंधित प्रशासकीय विभागाने स्वतंत्रपणे निर्णय घेणे आवश्यक राहील.

३. अनुकंपा तत्वावर नियुक्तीबाबतच्या तरतूदी खालीलप्रमाणे आहेत:-

**(१) अनुकंपा नियुक्ती योजनेचा लाभ खालील शासकीय कर्मचा-यांच्या पात्र कुटुंबियांना अनुज्ञेय राहील:-**

(अ) शासकीय कर्मचाऱ्यांना (रुपांतरीत स्थायी व अस्थायी आस्थापनेवरील शासकीय कर्मचारी धरुन) (शासन, निर्णय, दि. २६.१०.१९९४)

(आ) सेवा नियमित केलेल्या परंतु अधिसंख्य पदावर कार्यरत असलेले कर्मचारी. (शासन निर्णय, दि. १०.७.२००९)

**(२) शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्या पात्र नातेवाईकांना खालील नमूद परिस्थितीत अनुकंपा तत्वावर नियुक्ती लागू राहील:-**

(अ) शासकीय सेवेत असताना दिवंगत झालेल्या गट-क व गट-ड संवर्गातील कर्मचा-यांच्या पात्र कुटुंबियांनाच अनुकंपा तत्वावर नियुक्ती अनुज्ञेय राहील. (शासन निर्णय, दि. २२.०८.२००५)

(आ) गट अ/ब/क/ड मधील शासकीय अधिकारी अथवा कर्मचा-यास नक्षलवादी/ आतंकवादी/ दरोडेखोर/समाज विघातक यांच्या हल्यात/कारवाईत मृत्यू आल्यास अथवा शासन सेवेत कार्यरत असतांना स्वत:चा जीव धोक्यात घालून प्रत्यक्ष कर्तव्य बजावत असताना मृत्युमुखी पडल्यास अशा अधिका-यांच्या व कर्मचा-यांच्या कुटुंबियातील पात्र व्यक्तीस, अनुकंपा तत्वावर नियुक्ती देताना, त्यांचे नाव अनुकंपाधारकांच्या सामान्य प्रतीक्षासूचीमध्ये न घेता, त्यांची वेगळी यादी करुन पद उपलब्ध असल्यास, रिक्त पदांच्या ५ टक्के मर्यादेची ( १० टक्के- शासन निर्णय दि. १ मार्च, २०१४) अट शिथील करुन त्यांना सर्व प्राथम्याने अनुकंपा नियुक्ती देण्यात यावी. (शासन शुध्दीपत्रक दि. १७.०९.२०१२)

(इ) गट अ/ब/क/ड मधील जे शासकीय अधिकारी अथवा कर्मचारी नक्षलवादी/ आतंकवादी/ दरोडेखोर/समाजविघातक यांच्या हल्यात/कारवाईमध्ये कायमस्वरुपी जायबंदी झाले आहेत व त्यांनी स्वत:हून शासकीय सेवा सोडून देण्याची लेखी अनुमती दिली आहे अशा अधिकारी/कर्मचा-

यांच्या पात्र कुटुंबियातील एका व्यक्तीस अनुकंपा नियुक्तीसाठी विहीत केलेल्या ५ टक्के (१० टक्के- शासन निर्णय दि. १ मार्च, २०१४) मर्यादेमध्ये प्राधान्याने नियुक्ती देण्यात यावी. (शासन निर्णय, दिनांक १७.७.२००७)

(३) <u>खालील दर्जाच्या पदावर अनुकंपा नियुक्ती देय राहील</u> :-

(अ) राज्य शासनांतर्गत कोणत्याही गट-क आणि गट-ड मधील सरळ सेवेच्या पदांवर त्या पदाच्या सेवाप्रवेश नियमातील विहीत शैक्षणीक अर्हता असल्यास अशी नियुक्ती देता यईल. ( शासन निर्णय, दि. २६.१०.१९९४ व दि. २८.०३.२००१)

(आ) ह्या नियमानुसार नियुक्ती मिळण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षेस बसण्याची आवश्यकता नाही तसेच सदर पदावर अनुकंपा नियुक्ती करण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचा सल्ला घेण्याची आवश्यकता असणार नाही. मात्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील पोलीस उपनिरीक्षक, विक्रीकर निरीक्षक, मोटार वाहन उप निरीक्षक, रेंज वन अधिकारी, कनिष्ठ अभियंता, सहायक वैद्यकीय अधिकारी, इ. गट-'क' मधील कार्यकारी (एक्झिक्युटीव) पदावर तसेच मंत्रालयातील सहायक पदावर नियुक्ती देता येणार नाही. तसेच निवडमंडळाचा सल्ला घेणे आवश्यक नाही. (शासन निर्णय, दि. २६.१०.१९९४ व दि. २१.११.१९९७)

(इ) लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील पदाखेरीज अन्य गट-'क' मधील कार्यकारी पदांवर नियुक्ती देण्यात यावी मात्र अशी नियुक्ती ही त्या पदांसाठी सेवा प्रवेश नियमानुसार सरळ सेवा भरतीची तरतुद आहे अशाच पदांवर देण्यात यावी. ( उदाहरणादाखल काही कार्यकारी पदांची यादी- परिशिष्ट क ) (शासन निर्णय, दि. २०.१२.१९९६)

(४) अनुकंपा नियुक्तीसाठी पात्र कुटुंबिय:-

(अ) अनुकंपा तत्वावरील नियुक्तीसाठी खालील नमूद केलेले नातेवाईक पात्र राहतील व त्यापैकी एका पात्र नातेवाईकास नियुक्ती अनुज्ञेय राहील.

(१) पती/पत्नी,

(२) मुलगा/मुलगी (अविवाहीत/विवाहीत), मृत्यूपूर्वी कायदेशीररित्या दत्तक घेतलेला मुलगा/मुलगी (अविवाहीत/विवाहीत)

(३) दिवंगत शासकीय कर्मचा-याचा मुलगा हयात नसेल किंवा तो नियुक्तीसाठी पात्र नसेल तर त्याची सून

(४) घटस्फोटित मुलगी किंवा बहीण, परित्यक्ता मुलगी किंवा बहीण, विधवा मुलगी किंवा बहीण,

(५) केवळ दिवंगत अविवाहीत शासकीय कर्मचा-यांच्या बाबतीत त्याच्यावर सर्वस्वी अवलंबून असणारा भाऊ किंवा बहीण (शासन निर्णय, दि. २६.१०.१९९४ व दि. १७.११.२०१६)

(आ) मृत अधिकारी/कर्मचा-यांच्या पति/पत्नी ने कोणाची अनुकंपा तत्वावर नियुक्ती करावी याबाबत नामांकन देणे आवश्यक राहील. मृत अधिकारी/कर्मचा-यांचे पती/पत्नी हयात नसल्यास त्याच्या/तिच्या सर्व पात्र कुटुंबियांनी एकत्रित येऊन कोणाची नियुक्ती करावी याबाबत नामांकन करावे. (शासन निर्णय, दि. १७.०७.२००७)

(५) कुटुंबाची हलाखीची परिस्थिती

(अ) अनुकंपा तत्वावर नियुक्तीकरिता मासिक उत्पन्नाची तसेच ठोक रकमेची मर्यादा यापुढे राहणार नाही. (शासन निर्णय, दि. २६.१०.१९९४)

(आ) अनुकंपा तत्वावर नियुक्ती देताना असे प्रस्ताव शासन सेवेतील रोजगारावर असलेली मर्यादा, या योजनेच्या मागील भूमिका लक्षात घेऊन जो कर्मचारी मृत झाला आहे त्याच्या कुटुंबियांना तात्काळ उदभवणा-या आर्थिक पेचप्रसंगावर मात करण्याच्या उद्देशाने विचारात घ्यावेत. (शासन निर्णय, दि. २६.१०.१९९४)

(इ) दिवंगत शासकीय कर्मचा-याचा नातेवाईक पूर्वीच सेवेत असेल तथापि तो त्याच्या कुटुंबातील अन्य सदस्यांना आधार देत नसेल तर अशा प्रकरणात त्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती हलाकीची आहे किंवा कसे हे ठरविताना नियुक्ती प्राधिका-यांनी अत्याधिक दक्षता घ्यावी, जेणेकरुन सेवेत असलेला सदस्य कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत नाही या नांवाखाली अनुकंपा तत्वावरील नियुक्तीचा दुरुपयोग केला जाणार नाही.

यासंदर्भात नियुक्ती प्राधिका-याने मिळणा-या निवृतीवेतनाची रक्कम, कुटुंबातील व्यक्तींची संख्या, त्याची मालमत्ता/दायित्व, गंभीर आजारामुळे अथवा अपघातामुळे मृत झाला असल्यास त्यासाठी करण्यात आलेला वैद्यकीय खर्च, कुटुंबातील मिळवत्या व्यक्ती इत्यादी बाबी विचारात घेणे अपेक्षित आहे. (शासन निर्णय, दि. २६.१०.१९९४)

(६) **लहान कुटुंबांचे प्रमाणपत्र :-**

दिनांक ३१ डिसेंबर २००१ नंतर तिसरे अपत्य झालेल्या कर्मचा-यांच्या कुटुंबियास अनुकंपा तत्वावरील नियुक्तीसाठी पात्र समजले जाणार नाही. (शासन निर्णय, दि. २८/३/२००१)

(७) **योजनेची माहिती देण्याची जबाबदारी :-**

(अ) आस्थापना अधिका-याने अनुकंपा तत्वावर नियुक्तीच्या योजनेची माहिती (योजनेचा उद्देश, पात्र नातेवाईक, अर्ज करण्याची मुदत, शैक्षणिक अर्हता, टंकलेखन प्रमाणपत्र सादर करण्यास मुदत, अर्ज विहीत नमून्यात भरणे इ. माहिती) शासकीय कर्मचा-याच्या मृत्यूनंतर १५ दिवसानंतर किंवा कुटुंबनिवृत्तीवेतनाची कागदपत्रे पाठविताना शासकीय कर्मचा-यांच्या कुटुंबियांना त्वरीत उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.तसेच सदर माहिती मिळाल्याबाबत कुटुंबाकडून पोच घेणे आवश्यक आहे. (शासन निर्णय, दि. २३.०८.१९९६ व शासन परिपत्रक दि.५.२.२०१०)

(ब) दिवंगत शासकीय कर्मचा-याचा पात्र वारसदार सज्ञान नसेल तर तो सज्ञान झाल्यानंतर एक वर्षाच्या आत अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठी अर्ज करु शकेल मात्र तो सज्ञान झाल्यावर त्याने असा अर्ज करणे अपेक्षित आहे हे देखील कुटुंबनिवृत्तीवेतन धारकाला कुटुंब निवृत्तीवेतनविषयक कागदपत्रांची पूर्तता करतेवेळी लेखी कळविणे संबंधित आस्थापना अधिका-यावर बंधनकारक राहील. (शासन निर्णय, दि. २०.०५.२०१५)

**(८) कुटुंबातील अन्य सदस्यांचा सांभाळ करण्याबाबतचे प्रतिज्ञापत्र:-**

(अ) अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यापूवी संबंधितांकडून कुटुंबातील अन्य व्यक्तींचा सांभाळ करण्याबाबत प्रतिज्ञापत्र घेण्यात यावे. (शासन निर्णय, दि. २३.०८.१९९६)

आ) अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यापूर्वी संबंधिताकडून दिवंगत कर्मचा-यावर अवलंबून असलेल्या कुटुंबातील अन्य व्यक्तींचा सांभाळ करण्याबाबत प्रतिज्ञापत्र घेण्यात यावे. भविष्यामध्ये सदर प्रतिज्ञापत्राचे उल्लंघन झाल्याबाबतची तक्रार संबंधित कुटुंबातील सदस्यांनी केल्यास सदर तक्रारीची चौकशी संबंधित नियुक्ती प्राधिकारी/शिस्तभंगविषयक प्राधिका-याने करावी. चौकशीअंती अनुकंपा नियुक्तीधारकाने प्रतिज्ञापत्राचे उल्लंघन केल्याचे निष्पन्न झाल्यास त्याला सेवेतून काढून टाकण्याची देखील शिक्षा देता येईल. (शासन निर्णय, दि. १७.११.२०१६)

**(९) कुटुंबातील इतर सदस्यांचे संमतीपत्र:-**

अ) अनुकंपा तत्वावर नियुक्ती ही कुटुंबातील एकाच पात्र नातेवाईकास अनुज्ञेय असल्याने (शासन, निर्णय, दि. २६.१०.१९९४) कुटुंबातील इतर सदस्यांचे ना हरकत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

आ) ज्या शासकीय कर्मचा-यांना वैयक्तिक कायद्यानुसार एकापेक्षा जास्त लग्न करण्यास प्रतिबंध नसेल अशा कर्मचा-याच्या एकापेक्षा जास्त पत्नी हयात असल्यास, ज्या पत्नीला किंवा तिच्या मुलाला/मुलीला अनुकंपा तत्वावर नियुक्ती द्यायची आहे त्या व्यतिरिक्त अन्य पत्नीचे देखील ना हरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. (शासन निर्णय, दि. २३.०८.१९९६)

**(१०) अर्ज करण्यासाठी मुदत:-**

(अ)अनुकंपा नियुक्तीसाठी दिवंगत शासकीय कर्मचाऱ्यांच्या कुटुंबातील पात्र नातेवाईकाने शासकीय अधिकारी/कर्मचारी दिवंगत झाल्याच्या दिनांकापासून **एक वर्षाच्या** मुदतीत संबंधित नियुक्ती प्राधिका-याकडे विहीत नमून्यात परिपूर्ण अर्ज सादर करणे आवश्यक आहे. (शासन निर्णय, २२/८/२००५ व शासन परिपत्रक, दि. ०५.०२.२०१०)

**(आ)** सेवेत असताना दिवंगत झालेल्या कर्मचा-यांच्या कुटुंबातील अज्ञान वारसदाराच्या बाबतीत एकाने सज्ञान म्हणजे १८ वर्षांचा झाल्यावर एक वर्षाच्या आत अनुकंपा नियुक्तीसाठी परिपूर्ण अर्ज सादर करणे आवश्यक आहे. (शासन निर्णय, दि. ११/९/१९९६ व शासन परिपत्रक, दि. ०५.०२.२०१०)

**(इ)** पात्र वारसदारास विहीत १ वर्षाच्या मुदतीनंतर २ वर्ष इतक्या कालावधिपर्यंत (मृत्यूच्या दिनांकापासून ३ वर्षापर्यंत) तसेच दिवंगत शासकीय कर्मचा-यांच्या अज्ञान वारसदाराच्या बाबतीत तो उमेदवार सज्ञान झाल्यानंतर विहीत १ वर्षाच्या मुदतीनंतर २ वर्षापर्यंत (सज्ञान झाल्यानंतर ३ वर्षापर्यंत) अर्ज सादर करण्यास विलंब झाल्यास असा विलंब क्षमापित करण्याचे अधिकार संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागाच्या विभाग प्रमुखांना देण्यात येत आहेत.

अनुकंपा नियुक्ती धोरणातील याशिवाय अन्य कोणत्याही अटी व शर्ती शिथील करण्याचे अधिकार संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागप्रमुखांना राहणार नाहीत. (शासन निर्णय, दि. २०.०५.२०१५)

(ई) जोपर्यंत अनुकंपा नियुक्तीकरीता आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे उमेदवारांकडून प्राप्त होत नाहीत तोपर्यंत त्यांचे नांव प्रतीक्षासूचीमध्ये समाविष्ट करता येणार नाही. ज्यादिवशी संपूर्ण कागदपत्रे प्राप्त होतील त्यादिवशीच त्यांचे नाव प्रतिक्षासूचीमध्ये समाविष्ट करावे. (शासन परिपत्रक, दि. ५/२/२०१०)

**(११) अनुकंपा नियुक्तीसाठी वयोमर्यादा:-**

**(अ) किमान वयोमर्यादा-** १८ वर्ष (शासन निर्णय, दि. ११.०९.१९९६)

**(आ) कमाल वयोमर्यादा-** वयाच्या ४५ वर्षापर्यंतच्याच उमेदवारांना अनुकंपा नियुक्ती अनुज्ञेय असेल. त्यामुळे प्रतिक्षा सूचीतील उमेदवारांना वयाच्या ४५ वर्षापर्यंत नियुक्ती न मिळाल्यास त्यांची नावे वयाची ४५ वर्ष पूर्ण होताच आवश्यक ती नोंद घेऊन प्रतीक्षासूचीतून काढून टाकण्यात यावीत. (शासन निर्णय, २२.०८.२००५ व दि. ६.१२.२०१०)

**(१२) अनुकंपा नियुक्तीसाठी शैक्षणिक अर्हता:-**

(अ) पात्र नातेवाईकाची शैक्षणिक अर्हता व निम्न वयोमर्यादेनुसार त्याला गट-क किंवा गट-ड मधील पदावर अनुकंपा नियुक्ती अनुज्ञेय राहील. (शासन निर्णय,दि. २६/१०/१९९४)

(आ) संबंधीत पदांसाठी विहीत शैक्षणिक पात्रता आणि निम्न वयोमर्यादा याबाबतच्या अटी या नेमणूकांसाठी कटाक्षाने पाळण्यात येतील. (शासन निर्णय,दि. २६/१०/१९९४)

(इ) तथापि, दिवंगत शासकीय कर्मचाऱ्याची पत्नी शैक्षणिक पात्रतेव्यतिरिक्त इतर अटी पूर्ण करीत असल्यास तिच्या बाबतीत गट-ड मध्ये नेमणूकीसाठी शैक्षणिक अर्हतेची अट शिथील करण्याचे अधिकार संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्याला असतील. (शासन निर्णय,दि. २६/१०/१९९४)

**(१३) गट-क मधील लिपीक-टंकलेखक पदावर अनुकंपा नियुक्तीसाठी टंकलेखन प्रमाणपत्र सादर करण्यास मुदत:-**

(अ) अनुकंपा तत्वावर लिपीक-टंकलेखक पदावर नियुक्त झालेल्या उमेदवारांना विहीत वेगमर्यादेचे टंकलेखन अर्हता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी शासन निर्णय, दि. ०६.१२.२०१० अन्वये ६ महिने असलेली मुदत वाढवून ती २ वर्ष इतकी करण्यात येत आहे.

अनुकंपा तत्वावर लिपीक-टंकलेखक पदावर नियुक्ती दिलेल्या व शासन निर्णयाच्या दिनांकापर्यंत नियुक्तीपासून २ वर्ष पूर्ण न झालेल्या उमेदवारांनाही सदर प्रमाणपत्र सादर करण्यासाठी उमेदवारांच्या नियुक्तीपासून २ वर्ष इतकी मुदत देण्यात येत आहे.

६ महिन्याच्या कालावधित सदर प्रमाणपत्र सादर न केल्याने ज्या उमेदवारांच्या लिपीक-टंकलेखक पदावरील सेवा समाप्त करण्यात आल्या आहेत त्यांनाही लिपीक-टंकलेखक पदावरील नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्षात सदर प्रमाणपत्र सादर करण्याची मुभा द्यावी. अशा उमेदवारांनी सदर प्रमाणपत्र सादर केल्यानंतर लिपीक-टंकलेखक पदावरील अनुपस्थित कालावधिचे कोणतेही वेतनविषयक लाभ न देता सेवा सातत्यासह लिपीक-टंकलेखक पदावर पुन:स्थापित करण्यात यावे. (शासन निर्णय, दि. २०.०५.२०१५)

(आ) कोणत्याही कारणास्तव दोन वर्षापेक्षा अधिक मुदतवाढ अनुज्ञेय असणार नाही. हा कालावधी संपताच नियुक्ती संपृष्टात आणावी. (शासन निर्णय,दि. २३/०८/१९९६)

**(१४) अनुकंपा तत्वावर गट-क मधील लिपीक-टंकलेखक पदावर नियुक्ती मिळाल्यानंतर विहीत मुदतीत टंकलेखन प्रमाणपत्र सादर न केल्यास अनुसरावयाची कार्यपध्दती:-**

अनुकंपा तत्वावर गट-क मधील लिपीक-टंकलेखक पदावर नियुक्ती मिळाल्यानंतर टंकलेखनाची विहीत वेगमर्यादेची परीक्षा पास होऊ शकले नाहीत म्हणून त्यांच्या सेवा संपृष्टात आणल्या आहेत, अशा उमेदवारांचा गट-ड मधील नियुक्तीसाठी पदांची उपलब्धता विचारात घेऊन नव्याने नियुक्ती देण्याबाबत विचार करण्यात यावा. मात्र अशा रीतीने गट-ड मधील पदावर नियुक्ती स्विकारल्यानंतर कुठल्याही परिस्थितीत गट-क मधील पदासाठी त्याचा विचार करता येणार नाही, ही बाब त्यांना नियुक्तीपूर्वी स्पष्ट करावी.
(शासन निर्णय, दि. ०८.०९.१९९७)

**(१५) गट-क मधील लिपीक-टंकलेखक पदावर अनुकंपा नियुक्तीसाठी संगणक अर्हता प्रमाणपत्र सादर करणे :-**

माहिती तंत्रज्ञान संचालनालय, महाराष्ट्र शासन यांच्याकडून शासन सेवेतील गट-क मधील (वाहन चालक वगळून) संबंधित पदाकरीता महाराष्ट्र नागरी सेवा (संगणक हाताळणी/व वापराबाबतचे ज्ञान आवश्यक ठरविण्याबाबत) नियम, १९९९ च्या नियम ३ अन्वये आवश्यक अर्हता म्हणून अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठी उमेदवारांनी खालील 'अ' किंवा 'ब' प्रमाणे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

अ) D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत 'C.C.C.' किंवा 'O' स्तर किंवा 'A' किंवा 'B' किंवा 'C' स्तर पैकी कोणतेही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा,

ब) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांच्याकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र

संगणक ज्ञानाची वरील किमान अर्हता अनुकंपा तत्वावरील नियुक्तीच्या वेळी धारण करीत नसलेल्या उमेदवारांना सदर अर्हता गट-क मधील पदावर (वाहन चालक वगळून) अनुकंपा तत्वावर नियुक्ती झाल्याच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील. या दोन वर्षाच्या कालावधित संबंधितांनी विहीत संगणक अर्हता प्राप्त केल्याचे प्रमाणपत्र नियुक्ती अधिका-यांना सादर

करावे, अन्यथा हा कालावधि संपताच उमेदवारांची अनुकंपा तत्वावरील नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल, अशी स्पष्ट तरतूद उमेदवारांच्या नियुक्तीच्या आदेशात नियुक्ती प्राधिका-यांनी नमूद करावी. ( शासन निर्णय, दि. २४.०९.२००१)

**(१६) पद उपलब्धते अभावी गट-क मधील पदाऐवजी गट-ड मधील पदावर नियुक्ती देताना अनुसरावयाची कार्यपध्दती:-**

गट-क मधील पदांवर अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठी पात्र असणा-या कर्मचा-याला पदाच्या उपलब्धतेअभावी गट-ड मधील पदांवर नियुक्ती दिल्यास पद उपलब्ध होताच गट- क मधील पदावर त्याला प्राधान्याने नियुक्ती देण्यात यावी. अशी नियुक्ती सरळसेवा नियुक्तीने भरण्यात येणा-या पदांवरील समजण्यात यावी. मात्र गट-ड मधील पदावर अनुकंपा योजनेन्वये नियुक्ती देण्याच्या आदेशात तसा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा, तसे करण्यात आले तरच गट-क मधील पदावर नियुक्ती देता येईल. (शासन निर्णय, दि. २३.०८.१९९६)

**(१७) अनुकंपा तत्वावर प्रतिक्षासूची ठेवण्याबाबतची कार्यवाही:-**

(अ) अनुकंपा नियुक्तीसाठी जिल्हाधिकारी कार्यालय/सा.प्र.वि.१४-अ यांच्याकडील सामायिक प्रतीक्षासूचीबरोबरच संबंधित नियुक्ती प्राधिका-यांनी त्यांच्या कार्यक्षेत्राकरिता गट-क व गट-ड करीता प्रतिक्षासूची ठेवण्याची दुहेरी प्रतीक्षासूचीची कार्यपध्दती अंमलात आणावी. ( शासन निर्णय, २२.०८.२००५)

(आ) गट-क व गट-ड मधील पदांवरील नियुक्तीसाठी सक्षम नियुक्ती प्राधिकारी (कार्यालय किंवा विभाग प्रमुख इत्यादी) त्यांच्या कार्यक्षेत्रातील उपलब्ध गट-क व गट-ड च्या रिक्त पदांवर पदांसाठी विहीत अटी व शर्ती पूर्ण करणा-या उमेदवारांना त्यांच्याकडील प्रतीक्षासूचीतील क्रमानुसार नियुक्ती करु शकतील. मात्र उमेदवारांच्या नियुक्त्या केल्यानंतर त्या उमेदवारांची नावे जिल्हाधिकारी कार्यालयांकडील सामायिक प्रतीक्षासूचीतून वगळण्यासाठी संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयांना लगेच कळवावीत. बृहन्मुंबईतील गट-क मधील नियुक्ती प्राधिकारी यांनी त्यांच्याकडील नियुक्त्यांबाबतची माहिती सा.प्र.वि./१४अ ला कळवावी. (शासन निर्णय, २२.०८.२००५ व शासन परिपत्रक दि. ५.२.२०१०)

(इ) अनुकंपाची प्रकरणे ज्या कार्यालयात/विभागात होतील त्या प्रकरणांच्या छाननीनंतर पात्र उमेदवारांची नावे संबंधित नियुक्ती अधिका-याकडील गट-क व गट-ड च्या प्रतीक्षासूचीत समाविष्ट करण्यात यावीत. त्याचप्रमाणे ज्या तारखेस अशी नावे कार्यालयाच्या प्रतीक्षासूचीवर घेण्यात येतील त्याच तारखेपासून त्यांची नावे संबंधित जिल्हाधिका-याकडील सामायिक प्रतीक्षासूचीत समाविष्ट करण्यासाठी जिल्हाधिका-यांकडे पाठवावीत. बृहन्मुंबईतील नियुक्ती प्राधिकारी यांनी त्यांच्याकडील गट-क च्या प्रतीक्षासूची/नियुक्त्यांबाबत सामान्य प्रशासन विभाग कार्यासन १४-अ यांना कळवावे. (शासन निर्णय, २२.०८.२००५)

(ई) जिल्हाधिका-यांकडे/सामान्य प्रशासन विभागाकडे समन्वयाच्या कामासाठी ठेवलेल्या सामायिक प्रतीक्षासूचीत जिल्हातील विविध कार्यालयांकडून येणारी नवीन नावे मूळ कार्यालयांच्या प्रतीक्षासूचीत समाविष्ट केलेल्या दिनांकानुसार गट-क व गट-ड च्या सामायिक प्रतीक्षासूचीत समाविष्ट करावीत. (शासन निर्णय, २२.०८.२००५)

(उ) ज्या कार्यालयात अनुकंपाधारक नियुक्तीच्या प्रतीक्षेत नाहीत, परंतु गट-क किंवा गट-ड मध्ये रिक्त पदे उपलब्ध आहेत. त्यांनी त्यांच्याकडे वर्षात रिक्त झालेल्या/होणा-या गट-क व गट-ड मधील पदांपैकी विहीत केलेल्या ५ टक्के पदे (१० टक्के- शासन निर्णय दि. १.३.२०१४) अनुकंपा धारकांनी भरण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे मागणीपत्र पाठवावे. अशी मागणीपत्रे पाठविताना संबंधित कार्यालयाने त्यांच्याकडे संबंधित पदांवर नियुक्ती देण्यासाठी अनुकंपाधारक त्या कार्यालयास उपलब्ध नाहीत असे प्रमाणित करावे. (शासन निर्णय, २२.०८.२००५)

(ऊ) सर्व जिल्हाधिकारी तसेच सामान्य प्रशासन विभाग (कार्यासन-१४अ) यांनी प्रत्येक ६ महिन्यांनी जानेवारी आणि जुलै मध्ये त्यांच्याकडील सामायिक प्रतीक्षासूचीचा आढावा घेऊन दरम्यानच्या कालावधित नियुक्त्या मिळालेल्या उमेदवारांची नावे वगळून त्यांच्याकडील सामायिक प्रतीक्षासूची अद्ययावत करतील. यासाठी त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व कार्यालयातील प्रतीक्षासूच्यांचा आढावा घेऊन समन्वयाचे काम करतील. (शासन निर्णय, २२.०८.२००५)

(ए) जिल्हाधिकारी कार्यालयांनी जिल्ह्यातील सर्व कार्यालयात उपलब्ध होणाऱ्या पदांवर नियुक्ती प्राधिकाऱ्यांच्या मागणीनुसार सामायिक प्रतिक्षासूचीतील अनुकंपा धारकांची नियुक्तीसाठी शिफारस करावी. तसेच शिफारस प्राप्त झाल्यानंतर नियुक्ती करण्याची जबाबदारी संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्याची राहिल. (शासन परिपत्रक दि.०५.०२.२०१०)

(ऐ) शासन निर्णय, दि. २२.०८.२००५ नुसार प्रतिवर्षी रिक्त होणा-या पदांच्या ५ टक्के (१० टक्के- शासन निर्णय दि. १.३.२०१४) पदे अनुकंपा नियुक्तीने भरावयाची आहेत. नियुक्ती प्राधिका-यांकडे असलेल्या विभागाच्या/कार्यालयाच्या प्रतीक्षासूचीवरील उमेदवारांसाठी अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठी रिक्त जागा उपलब्ध असल्यास त्यानुसार नियुक्ती करावी. तसेच रिक्त पदांची माहिती वेळोवेळी संबंधित जिल्ह्याधिका-यांकडे सादर करावी.(शासन परिपत्रक दि.०५.०२.२०१०)

(ओ) ज्या ठिकाणी विभागप्रमुख हा नियुक्ती प्राधिकारी असेल व त्याचे कार्यक्षेत्र एकापेक्षा अनेक जिल्हयांमध्ये असेल तर विभाग प्रमुखाने नियुक्ती प्राधिकारी या नात्याने त्याच्या अधिकार क्षेत्रातील जिल्हयातील कार्यालयांसाठी एकत्रित प्रतीक्षासूची ठेवावी. तसेच दिवंगत कर्मचारी ज्या जिल्हयातील कार्यालयामध्ये असेल त्या जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे सामाईक प्रतीक्षासूचीवर घेण्यास त्या दिवंगत कर्मचाऱ्याच्या वारसाचे नाव पाठविण्यात यावे.

उदा. एखाद्या प्रशासकीय विभागाचे नियंत्रणाखालील विभागप्रमुखाचे कार्यालय, अमरावती

येथे आहे. विभागप्रमुख हा गट क साठी नियुक्ती प्राधिकारी असून त्याचे अमरावती, अकोला, वाशिम, यवतमाळ, बुलढाणा या जिल्हयात कार्यक्षेत्र आहे. अशावेळी अनुकंपा नियुक्तीकरिता गट क साठी मूळ प्रतिक्षासूची नियुक्ती प्राधिकारी म्हणून अमरावती येथील विभाग प्रमुखांच्या कार्यालयात ठेवण्यात यावी व या प्रतीक्षासूचील सदर उमेदवारांची नावे सरसकट जिल्हाधिकारी अमरावती यांच्याकडे न पाठविता दिवंगत कर्मचारी हा ज्या जिल्हयातंर्गत कार्यालयातील असेल त्या जिल्हाधिकारी कार्यालयाकडे संबंधित उमेदवाराचे नाव त्याच्या सामायिक प्रतीक्षासूचीत दाखल करण्यासाठी पाठविण्यात यावे व अशा प्रतीक्षासूचीवरील उमेदवारास नियुक्ती दिल्यानंतर त्याचे नाव दोन्ही प्रतिक्षासूचीतून वगळण्यात यावे.

गट ड करीता नियुक्ती प्राधिकाऱ्याचे कार्यक्षेत्र एकापेक्षा अनेक जिल्हयात असल्यास वरीलप्रमाणेच कार्यपध्दती अनुसरण्यात यावी. (शासन परिपत्रक दि.०५.०२.२०१०)

(औ) सैनिक कल्याण विभाग, पुणे व सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था, औरंगाबाद या कार्यालयातील पदे ही त्या पदांच्या सेवाप्रवेश नियमानुसार तसेच केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार केवळ माजी सैनिकांमधून भरण्याची तरतुद जाणीवपूर्वक करण्यात आली आहे. त्यामुळे दिवंगत शासकीय कर्मचाऱ्यांच्या पात्र कुटुंबियांना अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यासाठी दि.२२.८.२००५ च्या शासन निर्णयान्वये अस्तित्वात आलेल्या योजनेमध्ये सदर दोन्ही कार्यालयातील आस्थापनांचा अपवाद करण्यात या शासन निर्णयान्वये मंजुरी देण्यात येत आहे. त्या कार्यालयातील दिवंगत कर्मचाऱ्यांच्या पात्र कुटुंबियांना अनुकंपा नियुक्ती देण्याची कार्यवाही दि.२२.८.२००५ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार न करता, ही कार्यवाही यापूर्वी अस्तितत्वात असलेल्या शासन निर्णयामधील (शासन निर्णय दि.१२ मार्च, १९९७) तरतुदीनुसार संबंधित जिल्हाधिकारी यांच्याकडूनच करण्यात यावी.

सैनिक कल्याण विभाग, पुणे व त्यांच्या अधिपत्याखालील जिल्हा सैनिक कल्याण कार्यालये तसेच सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था, औरंगाबाद या कार्यालयातील गट-क व गट-ड मधील दिवंगत कर्मचाऱ्यांच्या कुटूंबियांना अनुकंपा तत्वावरील नियुक्तीबाबतचा अर्ज स्विकृत करणे, अर्जाची छाननी करणे व नियमांची पूर्तता होत असलेला अर्ज प्रतीक्षासूचीत समाविष्ट करण्याकरीता जिल्हाधिकारी कार्यालयास पाठविण्याबाबतची प्राथमिक कार्यवाही ही संबंधित कार्यालयांमार्फत करण्यात यावी. त्यानंतर सदर अर्जदाराचे नाव संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्याकडे ठेवण्यात आलेल्या सामायिक प्रतिक्षासूचीमध्ये योग्य ठिकाणी समाविष्ट करावे व या सामायिक प्रतीक्षासूचीनुसार ज्येष्ठतेने त्यांचा क्रम अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यासाठी आल्यास त्यांच्या जिल्हयातील कोणत्याही क्षेत्रीय कार्यालयात (अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यासाठी रिक्त पदे असल्यास) नियुक्ती देण्यासंदर्भातील कार्यवाही जिल्हाधिकारी कार्यालयामार्फतच करण्यात यावी. (शासन निर्णय दि.३१.३.२००८)

(१८) अनुकंपा नियुक्तीकरिता ठेवण्यात येणारी प्रतीक्षासूची वेबसाईटवर (संकेतस्थळावर) प्रसिध्द करण्याबाबत:-

सर्व जिल्हाधिकारी/नियुक्ती प्राधिकारी व सामान्य प्रशासन विभाग, का. १४अ, यांनी त्यांच्या कार्यालयातील अनुकंपा नियुक्तीसाठी प्रतीक्षासूचीवर (सामायिक/स्वतंत्र) असलेल्या उमेदवारांची नावे व इतर माहिती सोबत जोडलेल्या **प्रपत्र 'ड' मधील नमुन्यात** कार्यालयाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावी व सदर माहिती ही प्रत्येक महिन्यास अद्ययावत करावी. (शासन परिपत्रक, दि. १५.०५.२०१०)

सर्व जिल्हाधिकारी व नियुक्ती प्राधिकारी व सामान्य प्रशासन विभाग, का. १४अ, यांनी प्रतीक्षासूचीतील उमेदवारांना महिन्याभरात अनुकंपा नियुक्ती दिलेल्या उमेदवारांची नावे व माहिती प्रत्येक महिन्याच्या अखेरीस कार्यालयाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावी व त्याची प्रत शासनास सामान्य प्रशासन विभाग, का. ८ कडे सादर करावी. (शासन परिपत्रक, दि. १५.०५.२०१०)

सर्व जिल्हाधिकारी व नियुक्ती प्राधिकारी व सामान्य प्रशासन विभाग, का. १४अ, यांनी अनुकंपा नियुक्तीबाबतची माहिती महिन्याच्या शेवटच्या दिवशी अद्यावत केली जाईल याची दक्षता घ्यावी. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अखत्यारातील मंत्रालय खुद्द व क्षेत्रीय नियुक्ती प्राधिका-यांकडून सदर सूचनांची अंमलबजावणी केली जाईल याची दक्षता घ्यावी. तसेच त्यांच्या अखत्यारातील नियुक्ती प्राधिका-यांच्या वेबसाईटचे पत्ते व दूरध्वनी क्रमांक कार्यासन क्र. ८, सामान्य प्रशासन विभाग यांच्याकडे पाठवावीत. (शासन परिपत्रक, दि. १५.०५.२०१०)

(१९) अनुकंपा नियुक्तीसाठी विहीत पदांची मर्यादा:-

(अ) शासन निर्णय दि. २२.०८.२००५ अन्वये विहीत करण्यात आलेल्या अनुकंपा नियुक्तीसाठी गट-क आणि गट-ड मध्ये प्रती वर्षी रिक्त होणा-या ५% मर्यादेमध्ये वाढ करुन ती गट-क व गट-ड मधील प्रती वर्षी रिक्त होणा-या पदांच्या १०% इतकी करण्यात आली आहे. (शासन निर्णय, दि. ०१.०३.२०१४)

(आ) अनुकंपा तत्वावरील पदे सन २०१२ या भरती वर्षापासून गट-क आणि गट-ड मधील प्रती वर्षी रिक्त होणा-या पदांच्या १०% मर्यादेत भरण्याची कार्यवाही सर्व नियुक्ती प्राधिकारी यांनी तात्काळ करावी. (शासन पूरक पत्र, दि. ०२.०५.२०१४)

(इ) शासन निर्णय, दि. ०१.०३.२०१४ अन्वये अनुकंपा नियुक्तीसाठी प्रतीवर्षी रिक्त होणा-या पदांच्या १०% ची असलेली मर्यादा दि. ०१.०३.२०१५ पासून पुढे २ वर्ष (दिनांक २८.०२.२०१७ पर्यंत) चालू होती.सदर १०% च्या मर्यादेस दि. ०१.०३.२०१७ पासून पुढे दोन वर्ष (दि. २८.०२.२०१९ पर्यंत) मुदतवाढ देण्यात आली आहे.

तथापि शासन निर्णय, वित्त विभाग दि. ०२.०६.२०१५ व दि. २३.०९.२०१५ अन्वये पदभरतीवर असलेले निर्बंध विचारात घेता, प्रस्तुत निर्बंध असेपर्यंत गट-क व गट-ड संवर्गातील एका वर्षात भरण्यास मान्यता असलेल्या रिक्त पदांच्या १०% पदे ही अनुकंपा नियुक्तीने भरण्यात यावीत. (शासन निर्णय, दि. २८.१०.२०१५ व दि. ०३.०५.२०१७)

**(ई) निवासी आयुक्त, महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली, ह्या कार्यालयात शासन सेवेत असताना दिवंगत झालेल्या गट-क व गट-ड मधील कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्याबाबत.**

निवासी आयुक्त, महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली हे कार्यालय नवी दिल्ली येथे असून त्या कार्यालयातील गट-क व गट-ड मधील एकूण पदांची ८९ ही संख्या लक्षात घेता त्या कार्यालयात प्रतिवर्षी १-२ पदेच रिक्त होतात. शासन निर्णय, दि.२२.८.२००५ नुसार अनुकंपा नियुक्तीसाठी विहित केलेल्या ५% मर्यादेमुळे (१०% - शासन निर्णय दि. ०१.०३.२०१४) या कार्यालयात कधीच अनुकंपा नियुक्तीसाठी पद उपलब्ध होणार नाही व अनुकंपा नियुक्ती या कार्यालयात करणेही शक्य होणार नाही. ही बाब विचारात घेता निवासी आयुक्त, महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली या आस्थापनेचा, अपवाद करुन त्या कार्यालयातील दिवंगत कर्मचाऱ्यांच्या पात्र कुटुंबियांना अनुकंपा नियुक्ती देण्याची कार्यवाही दि.२२.८.२००५ च्या शासन निर्णयातील परिच्छेद १ (ओ) मध्ये विहित केलेली रिक्त पदांची ५% ची (१०% - शासन निर्णय दि. ०१.०३.२०१४) मर्यादा शिथिल करुन त्या कार्यालयातच उपलब्ध होणाऱ्या गट-क किंवा गट-ड च्या पदावर निवासी आयुक्त यांचेकडूनच करण्यास या शासन निर्णयाद्वारे खास बाब म्हणून मान्यता देण्यात येत आहे. (शासन निर्णय, दि.६.११.२००८)

**(उ) कार्यालयामध्ये रिक्त पदांची संख्या १० पेक्षा कमी असल्यास नियुक्ती प्राधिकारी यांनी अनुसरावयाची कार्यपध्दती:-**

नियुक्ती प्राधिका-यांकडे त्याच्या नियंत्रणाखालील कार्यालयात गट-क व गट-ड मध्ये प्रतिवर्षी २० किंवा त्या पटीत किंवा त्यापेक्षा अधिक पदे रिक्त होत असतील, तर त्यांनी प्रचलित नियमाप्रमाणे ५% ( १०% - शासन निर्णय, ०१.०३.२०१४) नुसार पदे अनुकंपा नियुक्तीने भरावीत. मात्र ज्या नियुक्ती प्राधिका-याकडे वर्षात १० पेक्षा कमी रिक्तपदे उपलब्ध होणार असतील, तर त्यांनी त्यावर्षी उपलब्ध होणा-या सदर रिक्त पदांची संख्या संबंधित जिल्हाधिका-यांना/बृहन्मुंबईच्या बाबतीत सामान्य प्रशासन विभाग (कार्यासन १४-अ) यांना कळवावी. तसेच रिक्त पदे उपलब्ध होणार नसल्यासही कळविण्याची कार्यवाही करावी. संबंधित जिल्हाधिका-यांनी त्यांच्या जिल्ह्यातील (गट-क व गट-ड) व सामान्य प्रशासन विभाग (कार्यासन १४-अ) यांनी (फक्त गट-क) बृहन्मुंबईतील अशा नियुक्ती प्राधिका-यांकडून प्राप्त झालेल्या रिक्त पदांची संख्या एकत्रित करुन त्या एकूण रिक्त पदांच्या ५% (सध्या १०%, शासन निर्णय, ०१.०३.२०१४) पदांची परिगणना करुन, त्यानुसार ती पदे अनुकंपा नियुक्तीने भरण्यासाठी जिल्हाधिका-यांनी/ सामान्य प्रशासन विभागाने (कार्यासन १४-अ) त्यांच्याकडील सामायिक प्रतीक्षासुचीतील उमेदवारांच्या नावांची शिफारस जेष्ठतेनुसार नियुक्ती प्राधिका-यांना करण्याची कार्यवाही करावी. या नव्याने समाविष्ट केलेल्या तरतुदींचे पालन करण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिका-यांची तसेच बृहन्मुंबईसाठी सामान्य प्रशासन विभाग (कार्यासन १४-अ) ची राहील.

सदर तरतुदींची अंमलबजावणी करताना कॅलेंडर वर्षात (जानेवारी ते डिसेंबर) रिक्त झालेली पदे विचारात घ्यावीत व त्यानुसार सामान्य प्रशासन विभाग (कार्यासन १४-अ)/ जिल्हाधिकारी यांच्याकडून अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठी विभाग/ कार्यालयात उपलब्ध असलेल्या पदांवर अनुकंपा नियुक्तीसाठीच्या उमेदवारांची शिफारस प्राप्त झाल्यावर सात दिवसांच्या आत नियुक्ती करण्याची जबाबदारी संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्याची राहील. नियुक्ती केल्यानंतर तसे केल्याचे सामान्य प्रशासन विभाग (कार्यासन १४-अ)/ जिल्हाधिकारी यांना संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्याने विनाविलंब कळविणे बंधनकारक आहे.

त्याखेरीज बृहन्मुंबईतील गट-ड वर्गाच्या अनुकंपा नियुक्तीसाठी पद उपलब्ध नसेल तर अशा आस्थापनांच्या नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी अनुकंपा नियुक्ती योजनेखाली प्राप्त झालेली नावे वर नमुद केल्याप्रमाणे रिक्त पदांची माहिती जिल्हाधिकारी, मुंबई शहर, ओल्ड कस्टम हाऊस, मुंबई यांच्याकडे पाठवावीत. जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी गट-ड करीता स्वतंत्र सामायिक प्रतीक्षासूची ठेऊन त्यामधून ज्येष्ठतेनुसार उमेदवारांच्या नावांची शिफारस ज्या ठिकाणी अनुकंपा नियुक्तीसाठी पद उपलब्ध आहे अशा आस्थापनांच्या नियुक्ती प्राधिकाऱ्यांना करावी. (शासन निर्णय, दि. ०१.०१.२००८)

**(ऊ) अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठी दिनांक २२.०८.२००५ पूर्वी प्रतिक्षासूचीत असलेल्या पात्र उमेदवारांना शासन सेवेत नियुक्ती देण्यासंदर्भात शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे:-**

१. शासकीय कार्यालयातील आस्थापनेवर गट-क व गट-ड मध्ये अनुकंपा तत्वावर नियुक्तीकरिता तयार करण्यात आलेल्या प्रतीक्षासूचीमधील, दि.२२.८.२००५ पूर्वीच्या उमेदवारांना दि. २२.०८.२००५ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेली रिक्त पदांच्या ५% ची मर्यादा (१०% - शासन निर्णय, ०१.०३.२०१४) लागू राहाणार नाही.

२. प्रतीक्षासूचीवर असलेल्या दि. २२.०८.२००५ पूर्वीच्या उमेदवारांना शासकीय कार्यालयात रिक्त असलेल्या/होणाऱ्या पदांवर अनुकंपा तत्वावर नियुक्ती, आदेशाच्या दिनांकापासून तीन वर्षात टप्प्याटप्प्याने देण्यात यावी. तीन वर्षात टप्प्या-टप्प्याने नियुक्ती करताना दि. २२.०८.२००५ पूर्वीच्या प्रतीक्षायादीतील उमेदवारांपैकी ५० % उमेदवारांची नियुक्ती पहिल्यावर्षी, २५% उमेदवारांची नियुक्ती दुसऱ्या वर्षी व उर्वरित २५% उमेदवारांची नियुक्ती तिसऱ्या वर्षी करण्यात यावी.

३. अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठी उपरोक्त (अनुक्रमांक (ऊ) (१) व (२) मधील) आदेशाची अंमलबजावणी करताना दि. २२.०८.२००५ पूर्वीच्या उमेदवारांना तीन वर्षात टप्पा-टप्प्याने नियुक्ती देण्याकरिता नियुक्ती प्राधिकाऱ्यांकडे तितकी पदे उपलब्ध नसल्यास, त्यांनी अशा उमेदवारांना, सामायिक प्रतीक्षासूचीतून अन्य कार्यालयात नियुक्ती देण्याची विनंती संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडे करावी. बृहन्मुंबईतील गट-क च्या पदावरील नियुक्तीसंदर्भात अशी कार्यवाही बृहन्मुंबईतील नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी, सामान्य प्रशासन विभाग (का.क्र.१४-अ)

यांच्याकडे करावी व बृहन्मुंबईतील, गट ड च्या बाबतीत अशी कार्यवाही बृहन्मुंबईतील नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांच्याकडे करावी. जिल्हाधिकारी/सामान्य प्रशासन विभाग (का.१४-अ) यांना रिक्त पदावर अनुकंपा नियुक्तीकरिता शिफारस करणे शक्य व्हावे म्हणून सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील गट-क व गट-ड मधील रिक्त पदांची संख्या त्यांना कळवावी. ही प्रक्रिया संपूर्णपणे सुयोग्यरित्या पार पाडण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी/सामान्य प्रशासन विभाग, का.१४-अ यांची राहील. त्यांनी ह्या संदर्भात वेळोवेळी आढावा घेऊन अनुकंपा तत्वावरील नियुक्ती योग्य रित्या होते, याची खात्री करावी. (शासन निर्णय, दि. २३.०४.२००८)

(ए) दि. २२.०८.२००५ पूर्वी प्रतीक्षासूचीवर असलेल्या उमेदवारांपैकी ५०% उमेदवारांना पहिल्या वर्षी, २५% उमेदवारांना दुसऱ्या वर्षी व उर्वरीत २५% उमेदवारांना तिसऱ्या वर्षी शासन सेवेत अनुकंपा तत्वावर सामावून घ्यायचे आहे. ही कार्यवाही करताना प्रतीक्षासूची मध्ये उमेदवार आहेत, परंतू नियुक्ती प्राधिकाऱ्यांकडे नियुक्ती देण्यासाठी गट-क व गट- ड मध्ये सरळसेवेची पदे रिक्त नाहीत तसेच ज्या नियुक्ती प्राधिकाऱ्याकडे रिक्त पदे आहेत, परंतु अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यासाठी दि २२.०८.२००५ पूर्वीचे उमेदवार प्रतीक्षासूचीवर नाहीत, अशी परिस्थिती केव्हा केव्हा उदभवते. परिणामी अशा वेळी अनुकंपा तत्वावर नियुक्ती देणे शक्य होत नाही. त्याचप्रमाणे जिल्हाधिकारी कार्यालयाकडून सामायिक प्रतीक्षासूचीतून अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यासाठी जिल्ह्यातील अन्य कार्यालयांकडे शिफारशी केल्यानंतरही त्या उमेदवारांना संबंधित कार्यालयात पद रिक्त असूनही नियुक्ती दिली जात नाही, असे काही जिल्हाधिकाऱ्यांनी शासनाच्या निदर्शनास आणले आहे. अनुकंपा नियुक्ती संदर्भात शासनाने जो धोरणात्मक निर्णय दि.२३.४.२००८ च्या आदेशान्वये घेतला आहे, त्याची काटेकोर अंमलबजावणी करणे बंधनकारक असल्याने ज्या नियुक्ती प्राधिकाऱ्यांकडे/ज्यांच्या नियंत्रणाखालील कार्यालयामध्ये गट-क व गट-ड ची सरळसेवेची पदे रिक्त आहेत, त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठी प्राप्त झालेल्या शिफारशीच्या अनुषंगाने विहीत अटी व शर्ती पूर्ण करणाऱ्या व पूर्ण कागदपत्रे असणाऱ्या उमेदवारांना अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्याची कार्यवाही विनाविलंब पूर्ण करावी. त्याचप्रमाणे या आदेशांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याकरिता नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी त्यांच्या नियंत्रणाखालील कार्यालयांमध्ये सरळसेवेच्या गट-क व गट-ड च्या रिक्त पदांची माहिती संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना न चुकता वेळोवेळी कळवावी. तसेच, सरळसेवेने गट-क व गट-ड ची रिक्त पदे भरण्यासंदर्भात जाहिरात देण्यापूर्वी दि.१.१.२००८ व दि.२३.४.२००८ च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरिता अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यात आल्याची खात्री करुन उर्वरीत पदांकरीता जाहिरात देण्यापूर्वी संबंधित जिल्हाधिकारी यांची संमती मिळवणे आवश्यक राहील.

जाहिरातीसाठी संमती मिळविण्याचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविताना नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी त्याच्या अखत्यारीतील कोणत्या जिल्हयात कोणत्या संवर्गाची किती पदे रिक्त आहेत याची माहिती त्या त्या जिल्हाधिकाऱ्यांना कळविणे आवश्यक राहील. जाहिरात देण्याकरीता प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे प्राप्त झाल्यावर दि. २२.०८.२००५, दि.१.१.२००८ व दि.२३.४.२००८ च्या शासन निर्णयातील तरतुदींची पूर्तता करण्यासाठी आवश्यक असलेल्या उमेदवारांना अनूकंपा नियुक्तीकरीता त्यांच्या जिल्ह्यात रिक्त असलेली पदे भरण्याकरीता जिल्हाधिकारी शिफारस करतील व अशा शिफारशीनुसार अनुकंपा नियुक्ती देणे संबंधित विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुखांना बंधनकारक राहील. अनुकंपा नियुक्ती करिता जिल्हाधिकाऱ्यांच्या शिफारशीनुसार नियुक्ती केल्यानंतर/दिल्यानंतर जी रिक्त पदे उरतील ती पदे जाहिरातीद्वारे विहीत मार्गाने व विहित कार्यपध्दतीने भरण्यासाठी, जिल्हाधिकारी संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्यांना परवानगी/ ना हरकत प्रमाणपत्र देतील. ( शासन परिपत्रक, ०५.०२.२०१०)

**(२०) मागासवर्गीयांसाठी आरक्षित ठेवलेल्या पदांवर अनुकंपा तत्वावर नियुक्ती देताना करावयाच्या कार्यवाहीबाबत:-**

अनुकंपा नियुक्ती देण्यासाठी वर्षभरात रिक्त होणाऱ्या पदांच्या ५ % (१०% - शासन निर्णय, ०१.०३.२०१४) पदे अनुज्ञेय असून, शासनाच्या दि. १३.०६.२००३ च्या शासन निर्णयान्वये अनुकंपा नियुक्ती करतांना मागासवर्ग/अमागासवर्ग अशा भेदाभेद न करता प्रतिक्षासूचीवरील ज्येष्ठतेनूसार नियुक्ती देण्याचे निदेश देण्यात आले आहेत. सामान्य प्रशासन विभागाच्या दि. २३.०४.२००८ च्या शासन निर्णयान्वये दि. २२.०८.२००५ पूर्वीच्या प्रतिक्षासूचीवरील उमेदवारांना अनुकंपा नियुक्ती देण्यासाठी ५% (१०% - शासन निर्णय, ०१.०३.२०१४) अट नसल्याने, रिक्त पदांची माहिती पाठविणाऱ्या कार्यालयास, जिल्हाधिकाऱ्यांकडून प्रतीक्षासूचीवर उमेदवार उपलब्ध असल्यास रिक्त पदांइतक्याच उमेदवारांची शिफारस केली जाते. नियुक्ती प्राधिकाऱ्याकडून उपलब्ध सर्व रिक्त पदांची संख्या कळविली जात असल्याने त्यामध्ये काही पदे मागासवर्गीय प्रवर्गासाठी आरक्षित असण्याची शक्यता असते व अशा पदांसाठी जिल्हाधिकाऱ्यांकडून खुल्या प्रवर्गातील उमेदवारांची शिफारस केली गेल्यास नियुक्ती प्राधिकाऱ्यांपुढे आरक्षित पदावर खुल्या प्रवर्गातील उमेदवारांची नियुक्ती करणे नियमानुकूल होईल किंवा कसे, असा प्रश्न उद्भवत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. यासंदर्भात महाराष्ट्र राज्य लोकसेवा {अनुसूचित-जाती/अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्गीयांसाठी आरक्षण अधिनियम, २००१ मधील कलम ४(१) मध्ये "अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी राखून ठेवलेल्या जागा अशा जातीतील, जमातीतील, प्रवर्गातील किंवा वर्गातील नसलेल्या उमेदवारांद्वारे भरण्यात येणार नाहीत" अशी स्पष्ट तरतूद करण्यात आली आहे.

त्यामुळे वरील अधिनियमातील तरतूद तसेच अनुकंपा नियुक्ती देताना ती प्रतीक्षासूचीवरील जेष्ठताक्रमानुसारच देण्याची प्रचलित कार्यपध्दती इ. सर्व बाबींचा साकल्याने विचार करुन आता अनुकंपा नियुक्तीसाठी असलेल्या प्रतीक्षासूचीवरील अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यासाठी उमेदवारांची शिफारस करताना जिल्हाधिकाऱ्यांनी तसेच नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी, असे सूचित करण्यात येत आहे :-

अ) मागासवर्गीयांसाठी आरक्षित असलेल्या पदावर खुल्या प्रवर्गाच्या उमेदवाराची नियुक्ती करता येत नसल्याने, जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्या अधिकार क्षेत्रातील नियुक्ती प्राधिकाऱ्याकडून रिक्त पदांची माहिती घेताना प्रत्येक रिक्त पद कोणत्या प्रवर्गासाठी आरक्षित आहे/अनारक्षित आहे याचीही माहिती घ्यावी. तद्नंतर संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी/शिफारस करणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्यांनी अशा पदावर अनुकंपा उमेदवारांची शिफारस करतांना मागासवर्गीयांसाठी आरक्षित असलेल्या रिक्त पदावर खुल्या प्रवर्गाच्या उमेदवाराची शिफारस केली जाणार नाही, याची दक्षता घ्यावी व असे आरक्षित पद आरक्षित प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध होईपर्यन्त रिक्त ठेवावे.

ब) प्रतीक्षासूचीत कनिष्ठ क्रमांकावर मागास प्रवर्गाचा उमेदवार असला तरी त्यास जेष्ठता क्रम डावलून खुल्या प्रवर्गाच्या जेष्ठ उमेदवारांना नियुक्ती देण्यापूर्वी आरक्षित पदावर नियुक्ती देता येणार नाही. खुल्या प्रवर्गाच्या उमेदवारांना नियुक्ती दिल्यानंतर जेव्हा आरक्षित प्रवर्गाच्या उमेदवाराचा प्रतीक्षासूचीतील जेष्ठतेनुसार नियुक्तीसाठी क्रम येईल तेव्हाच त्याची नियुक्ती आरक्षित पदावर करणे आवश्यक आहे. तथापि, मागासवर्गीय उमेदवारास प्रतीक्षासूचीवरील जेष्ठताक्रमानुसार अनुकंपा नियुक्ती देण्याच्यावेळी त्या उमेदवारांच्या मागासवर्ग प्रवर्गाचे पद उपलब्ध नसले तरी त्यांना खुल्या प्रवर्गाच्या उपलब्ध पदावर नियुक्ती देण्यात यावी.

क) सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी त्यांच्या आस्थापनेवरील रिक्त पदांची माहिती जिल्हाधिकाऱ्यांना कळविताना त्यामधील आरक्षित पदे किती आहेत व ती कोणत्या प्रवर्गासाठी आरक्षित आहेत, याचा स्पष्ट उल्लेख करावा. त्याचप्रमाणे जिल्हाधिकाऱ्यांकडे त्यांच्या प्रतीक्षासूचीवर दाखल करण्यासाठी अनुकंपा उमेदवारांची नावे पाठविताना त्यांचा प्रवर्ग न चुकता नमूद करावा. (शासन परिपत्रक दि. १३.१०.२०१०)

**(२१) अनुकंपा तत्वावरील प्रतीक्षासूचीवरील उमेदवाराचे निधन झाल्यास त्याऐवजी कुटुंबातील अन्य पात्र वारसदाराचा समावेश अनुकंपा नियुक्तीच्या प्रतीक्षासूचीत करणे:-**

कर्मचा-याच्या मृत्यूनंतर त्याच्या पात्र कुटुंबियांचे नांव अनुकंपाधारकांच्या प्रतीक्षासूचीमध्ये घेतल्यानंतर त्याच्याऐवजी अन्य पात्र वारसदाराचे नाव प्रतीक्षासूचीमध्ये घेतले जात नाही. म्हणजेच प्रतीक्षासूचीमधील नाव बदलण्याची तरतूद सध्याच्या धोरणात नाही. परंतु प्रतीक्षासूचीवरील उमेदवाराचेच निधन झाल्यास प्रतीक्षासूचीतील उमेदवाराऐवजी त्याच्या कुटुंबातील अन्य पात्र वारसदाराचे नाव अनुकंपाधारकांच्या प्रतीक्षासूचीमध्ये मूळ उमेदवाराच्या प्रतीक्षासूचीतील दिनांकाला

घेतले जाईल. मात्र नव्या उमेदवाराचे वय सदर दिनांकाला १८ वर्षापेक्षा जास्त असावे. जर नव्या उमेदवाराचे वय मूळ उमेदवाराच्या प्रतीक्षासूचीतील दिनांकास १८ वर्षापेक्षा कमी असेल तर, नव्या उमेदवाराचे नाव त्याला ज्या दिवशी १८ वर्ष पूर्ण होतील त्या दिनांकास घेण्यात यावे. (शासन निर्णय दि. २०.०५.२०१५)

**(२२) दि. २६.११.२००८ ते दि. २९.११.२००८ या कालावधित मुंबई येथे आतंकवाद्यांच्या हल्ल्यांत शहीद झालेल्या पोलीस सेवेतील व्यक्तींच्या कुटुंबियांपैकी एकास गट-ब किंवा गट-अ मधील पदावर खास बाब म्हणून शासन सेवेत सामावून घेण्याबाबत:-**

(अ) प्रचलित अनुकंपा नियुक्ती योजनेतील अटी व शर्ती तसेच पात्रतेचे निकष शिथील करुन एक खास बाब म्हणून दि. २६.११.२००८ ते २९.११.२००८ या कालावधित शहीद झालेल्या पोलीस अधिकारी/कर्मचा-यांच्या पात्र कुटुंबियांपैकी एकाच व्यक्तीस त्यांची शैक्षणिक पात्रता विचारात घेऊन गट-क व गट-ड प्रमाणेच शासन सेवेतील गट-ब किंवा गट-अ मधील सरळसेवेच्या कोट्यातील प्रथम टप्प्यावरील पदांवर नियुक्ती देण्यास शासन मान्यता देत आहे. प्रचलित अनुकंपा योजनेतील अटी व शर्ती शिथील करुन वरील पोलीस कर्मचा-यांच्या कुटुंबियांना अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यास दिलेली मान्यता ही तत्कालीन विशिष्ट परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेवून देण्यात आली आहे. त्यामुळे या प्रकरणी घेतलेला निर्णय पूर्वोदाहरण म्हणून धरता येणार नाही. (शासन निर्णय, दि. २०.०१.२००९)

(आ) अनुकंपा तत्वावरील नियुक्ती संदर्भातील इतर तरतूदी कायम राहतील. त्यामुळे शहीद झालेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या कुटुंबातील पात्र व्यक्ती सज्ञान असल्यास त्यांनी पोलीस अधिकारी/कर्मचारी शहीद झाल्याच्या दिनांकापासून एका वर्षात अर्ज करणे आवश्यक राहील. तसेच त्यांच्या पात्र कुटुंबियांपैकी कोणीही व्यक्ती सज्ञान नसल्यास त्या कुटुंबियांमधील पात्र व्यक्तीने सज्ञान झाल्यानंतर एका वर्षाच्या आत अर्ज करणे आवश्यक राहील. तथापि पात्र कुटुंबियांतील ज्यांना गट-ब किंवा गट-अ पदावरील नियुक्तीकरिता अर्ज करावयाचा आहे, त्यांच्याबाबतीत अर्ज करण्यासाठी वयोमर्यादा २५ वर्षापर्यंत राहील. (शासन निर्णय, दि. २०.०१.२००९ व दि. १३.११.२००९)

प्रस्तुत प्रकरणी अनुकंपातत्वावर प्राधान्याने नियुक्ती द्यावयाची असल्याने शासन निर्णय दि. २२ ऑगस्ट, २००५ मधील तरतूदीनुसार नियुक्ती करीता रिक्त होणाऱ्या पदांच्या ५% ची मर्यादा या प्रकरणी शिथील करण्यात येत आहे. त्यामुळे अनुकंपा नियुक्तीसाठी अर्ज प्राप्त झाल्यानंतर विहित सर्व बाबींची पूर्तता झाल्यानंतर संबंधितांना प्राधान्याने नियुक्ती देण्यात यावी. तथापि, आयोगाच्या कक्षेतील गट-ब किंवा गट-अ पदावर नियुक्ती देण्यापूर्वी अशा प्रकरणी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची पूर्वमान्यता घेणे आवश्यक राहील. अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यासंदर्भातील संपूर्ण कार्यवाहीवर म्हणजेच अर्ज स्वीकृतीपासून ते नियुक्ती देईपर्यन्तच्या कार्यवाहीवर नियंत्रण गृह विभागाचे राहील. (शासन निर्णय दि. २०.०१.२००९)

(२३) सामान्य प्रशासन विभागाच्या अधिकार क्षेत्रातील अनुकंपा नियुक्ती योजनेशी संबंधित कोणताही धोरणात्मक निर्णय प्रशासकीय विभागांनी परस्पर न घेण्याबाबत:-

शासन सेवेत कार्यरत असताना दिवंगत झालेल्या गट-क व गट-ड मधील शासकीय कर्मचाऱ्यांच्या पाल्यास त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनुसार गट-क अथवा गट-ड पदावर अनुकंपा नियुक्ती देण्याची योजना व त्या योजनेत वेळोवेळी आवश्यक ते बदल करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेणे ही बाब सामान्य प्रशासन विभागाच्या अधिकार कक्षेतील आहे. या योजनेतील प्रचलित तरतूदींपेक्षा वेगळा अथवा त्या तरतूदींना अपवाद करणारा असा कोणताही निर्णय प्रशासकीय विभागांनी स्वतंत्रपणे घेणे अपेक्षित नाही. तथापि दि.२६ नोव्हेंबर, २००८ रोजी झालेल्या अतिरेकी हल्ल्यात शहीद झालेल्या पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांचे वारसांना अनुकंपा नियुक्तीचा विशेष लाभ देण्याचा निर्णय घेताना त्याचप्रमाणे नक्षलवादी क्षेत्रात कार्यरत असतांना नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात शहीद झालेल्या पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या वारसांना अनुकंपा नियुक्ती विषयक विशेष लाभ देण्याचा निर्णय घेताना महसूल व वन विभागाने व गृह विभागाने सामान्य प्रशासन विभागाशी सल्लामसलत न करता अथवा प्रस्ताव या विभागास न दाखविता परस्पर मंत्रिमंडळापुढे प्रस्ताव सादर करुन स्वतंत्रपणे निर्णय घेतल्याचे आढळून आले आहे व अशातऱ्हेने प्रशासकीय विभागांनी परस्पर प्रस्ताव सादर केल्यामुळे प्रस्तावाची सर्वांगीण बाजू मंत्रिमंडळासमोर/शासनासमोर विभागांकडून मांडली जात नाही ही वस्तुस्थिती आहे.

वस्तुत: कोणतीही नियुक्ती ही सेवाविषयक बाब असल्याने, अनुकंपा नियुक्तीसंदर्भात निर्णय घेताना सर्वकष विचार होणे आवश्यक असते व त्यासाठी सेवाविषयक नियम/तरतूदी, वेळोवेळी पारित झालेले न्याय निर्णय तसेच घेतलेल्या निर्णयाचा राज्य स्तरावरील सर्व सेवांवर होणारा परिणाम विचारात घेऊन निर्णय घ्यावा लागतो.

वर नमूद केल्यानुसार प्रशासकीय विभागांनी सामान्य प्रशासन विभागाशी सल्ला मसलत न करताच परस्पर शासनास प्रस्ताव सादर करताना वरील कोणत्याही बाबींचा विचार केलेला दिसून येत नाही. तसेच त्यामुळे प्रचलित कार्यपध्दतीचा व संकेतांचा भंग होऊन संबंधीत प्रशासकीय विभागाकडून त्यांचे कार्यकक्षांचे उल्लंघन होत आहे ही बाबही त्या विभागांनी विचारात घेतलेली नाही. त्यामुळे विहित कार्यपध्दती अनुसरुन व सामान्य प्रशासन विभागाशी सल्ला मसलत न करता परस्पर घेतल्या गेलेल्या निर्णयामुळे त्यामध्ये काही त्रुटी राहून भविष्यात न्यायालयीन प्रकरणे उद्भवून त्यामुळे शासनाची अडचणीची परिस्थिती निर्माण होऊ शकते.

वरील सर्व परिस्थिती विचारात घेऊन, सर्व प्रशासकीय विभागांना असे निदेश देण्यात येत आहेत की, सामान्य प्रशासन विभागाच्या कार्यकक्षेतील "अनुकंपा नियुक्ती" या विषयाशी संबंधीत कोणताही प्रस्ताव मंत्रिमंडळापुढे आणण्यापूर्वी तो सामान्य प्रशासन विभागाला दाखविणे व अशा कोणत्याही प्रस्तावामध्ये सामान्य प्रशासन विभागाच्या अभिप्रायांचा समावेश मंत्रिमंडळ टिप्पणीमध्ये

करणे सर्व प्रशासकीय विभागांना याद्वारे बंधनकारक करण्यात येत आहे.( शासन परिपत्रक, दि. ०५.०३.२०११)

(२४) अनुकंपा नियुक्ती हा कर्मचाऱ्याच्या कुटुंबाचा "वारसा हक्क" नाही-

मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या विविध निर्णयानुसार अनुकंपा तत्वावरील नियुक्ती हा कर्मचाऱ्याच्या कुटुंबाचा "वारसा हक्क" होत नाही. तसेच विशिष्ट कालावधी उलटून गेल्यावर अनुकंपा नियुक्ती अनुज्ञेय राहत नाही. (शासन निर्णय, दि. २२.०८.२००५)

(२५) अनुकंपा नियुक्तीबाबतच्या अटी व शर्ती शिथील करण्याबाबत:-

शासन निर्णय, दि. २६.१०.१९९४ अन्वये अनुकंपा नियुक्तीसाठी दिवंगत शासकीय कर्मचा-यांच्या विधवांना केवळ गट-ड मधील पदावर नियुक्ती करावयाची असल्यास शैक्षणिक अर्हता शिथील करण्याबाबतची तरतुद आहे. याव्यतिरिक्त अन्य कोणतीही अट शिथील करण्यास शासन सक्षम नाही असा स्पष्ट उल्लेख शासन निर्णय, दि. २६.१०.१९९४ मध्ये करण्यात आला आहे.

अनुकंपा नियुक्तीबाबच्या तरतुदी सुस्पष्ट असताना देखील ब-याच विभागांकडून कर्मचा-यांच्या कुटुंबियांना अनुकंपा नियुक्तीकरिता अटी शिथील करण्याकरिता सातत्याने प्रस्ताव प्राप्त होत असतात. अटी व शर्ती शिथील करण्याचे अधिकार शासनाला नसताना देखील अशा स्वरुपाचे प्रस्ताव विचारात घेण्यामुळे शासनाच्या आदेशांचे उल्लंघन होते आणि अनुकंपाच्या अटी शिथीलक्षम आहेत असा गैरसमज पसरतो. परंतु या अटी व शर्ती शिथीलक्षम नसल्याने ही सर्व प्रकरणे सामान्य प्रशासन विभागात अमान्य केली जातात. यास्तव नियमांना धरुन नसलेली प्रकरणे/ शासन सक्षम नसलेली प्रकरणे विभागांनी सामान्य प्रशासन विभागाकडे सादर करुन नयेत. केवळ गट-ड मधील नियुक्तीसाठी कर्मचा-यांच्या विधवांना शैक्षणिक अर्हतेत जी शिथीलता दिली जाते ती वगळता अन्य कोणत्याही अटी व शर्ती शिथिल करण्याचे प्रस्ताव विभागांनी विचारात घेऊ नयेत.

अनुकंपा नियुक्तीबाबतचे प्रस्ताव विभाग/कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर त्यांची संपूर्ण शहानिशा संबंधित कार्यालयांनी करुन जर अटी व शर्तीची पूर्तता होत असेल तरच ते प्रस्ताव विचारात घ्यावेत अन्यथा ते प्रस्ताव त्यांच्या स्तरावर उचित उत्तर देऊन निकालात काढावेत. त्याकरीता प्रस्ताव सामान्य प्रशासन विभाग/शासनास सादर करण्याची आवश्यकता नाही. सर्व नियुक्ती अधिकारी/विभाग/कार्यालयांनी या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

(शासन परिपत्रक, दि. २९.१०.२००३)

(२६) अटी शिथील करण्याचे अधिकार-

उपरोक्त अनुक्रमांक ३. (१२) (इ) मध्ये नमूद केलेल्या अटी व्यतिरिक्त कोणत्याही अटी शिथील करण्याची शक्ती शासनाकडे राहणार नाही.

परिशिष्ट 'ब'

( शासन निर्णय क्रमांक : अकंपा १२१७/प्र.क्र.१०२/आठ, दिनांक २१ सप्टेंबर, २०१७.)

शासकीय सेवेत असताना दिवंगत झालेल्या शासकीय कर्मचा-यांच्या नातेवाईकांस अनुकंपा तत्वावर नेमणूक देतेवेळी भरावयाचे प्रपत्र. (शासन निर्णय, दि. २६.१०.१९९४)

भाग-१

१. (अ) दिवंगत अधिकारी/कर्मचा-याचे नांव:-
(ब) कर्मचा-याचे पदनाम:-
(क) जन्म दिनांक:-
(ड) मृत्यूचा दिनांक/कायमस्वरुपी जायबंदी झाल्याचा दिनांक:-
(इ) नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीचा दिनांक:-

२. (अ) ज्या व्यक्तीस नियुक्ती द्यावयाची आहे
त्या व्यक्तीचे नांव:-
(ब) त्याचे/तिचे कर्मचा-याशी नाते:-
(क) जन्म दिनांक:-
(ड) शैक्षणिक अर्हता:-
(इ) कुटुंबियांपैकी दुसर-या कोणा कुटुंबियाला अनुकंपा तत्वावर नियुक्ती दिली आहे काय ?:-

३. स्थावर मालमत्तेच्या उत्पन्नासह पुढील योजनांनुसार मिळालेली एकूण रक्कम:-
(अ) कुटुंब निवृत्तीवेतन-
(ब) स्थावर मालमत्तेपासूनचे वा इतर मासिक उत्पन्न-
(क) मृत्यू-नि-सेवानिवृत्ती उपदान-
(ड) भविष्यनिर्वाह निधीतील बचत-
(इ) ठेव संलग्न विमा योजना-
(फ) गट विमा योजना-
(ग) आयुर्विम्याची रक्कम-

---

एकूण रक्कम-

भाग-२

१ (अ) ज्याला नियुक्ती द्यावयाची आहे त्या उमेदवाराचे नांवः-

(ब) त्याचे/तिचे शासकीय अधिकारी/कर्मचा-याशी नातेः-

(क) शैक्षणिक अर्हता, वय (जन्मतारीख), अनुभव (काही असल्यास):-

(ड) ज्या पदावर नियुक्ती द्यावयाची आहे ते पद व कार्यालयाचे नांवः-

२. उमेदवाराने अर्ज केल्याचा दिनांकः-

३. विभाग प्रमुख/विभागाची शिफारसः-

४. उमेदवाराचे प्रकरण सादर करण्यास उशीर झाला असल्यास त्यांचा खुलासा:-

मी उमेदवाराने नमूद केलेल्या भाग-१ मधील बाबी तपासल्या आहेत.

दिनांक-
ठिकाण-

आस्थापना अधिका-यांची सही,
नांव व पत्ता

४. शासकीय कर्मचा-याच्या कुटुंबातील सर्व व्यक्तींचा तपशील (त्यापैकी कोणी नोकरी/व्यवसाय करीत असल्यास त्याचे मासिक उत्पन याबाबतची माहिती)

| अ.क्र. (१) | नांव (२) | शासकीय कर्मचा-याशी नाते व वय (३) | नोकरी /व्यवसाय करीत असल्यास त्याचे मासिक उत्पन्न (४) |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |
| ४ | | | |

## प्रतिज्ञापत्र

मी याद्वारे असे घोषित करतो/करते की, वर नमूद केलेल्या बाबी माझ्या समजुतीप्रमाणे ख-या आहेत. वरील बाबींपैकी एक बाब जरी भविष्यात खोटी किंवा चुकीची आढळली तर माझी नियुक्ती समाप्त करण्यात यावी.

दिनांक-

उमेदवाराची सही.

श्री./श्रीमती ........................................................ हे माझ्या परिचयाचे असून त्यांनी नमूद केलेल्या बाबी ख-या आहेत.

दिनांकः-

स्थायी शासकीय कर्मचा-याची सही व पत्ता

## परिशिष्ट - 'क'

( शासन निर्णय क्रमांक : अकंपा १२१७/प्र.क्र.१०२/आठ, दिनांक २१ सप्टेंबर, २०१७.)

(शासन निर्णय, क्र.अकंपा-१०९६/प्र.क्र.६७/९६/आठ, दि. २०.१२.१९९६ अन्वये निवड मंडळाच्या कक्षेतील रु. १२००/- व त्याहून अधिक वेतनश्रेणी असलेले संवर्ग कार्यकारी पदे) (वेतनश्रेणी- ५ व्या वेतन आयोगानुसार)

| | |
|---|---|
| १. वरिष्ठ लिपीक | रु. १२००-२०४० |
| २. वरिष्ठ सहायक | रु. १४००-२३०० |
| ३.अल्पबचत अधिकारी | रु. १६४०-२००० |
| ४. वरिष्ठ समाजकल्याण निरीक्षक | रु. १६४०-२९०० |
| ५. रचना सहायक | रु. १४००-२३०० |
| ६. कनिष्ठ अभियंता | रु. १६४०-२९०० |
| ७. सांखिकी सहायक | रु. १२००-२००० |
| ८. दुय्यम निबंधक | रु. १२००-२०४० |
| ९. लेखापाल | रु. १६४०-२९०० |
| १०. सहकार अधिकारी | रु. १६४०-२९०० |
| ११. विस्तार अधिकारी(कृषि) | रु. १६००-२६६० |
| १२.लेखा परिक्षक | रु. १६४०-२९०० |
| १३. विस्तार अधिकारी (पंचायत) | रु. १४००-२३०० |
| १४. विस्तार अधिकारी (शिक्षण) | रु. १६४०-२९०० |

## परिशिष्ट - 'ड'

(शासन निर्णय, क्र. अकंपा-१२१७/प्र.क्र.१०२/आठ, दि. २१ सप्टेंबर, २०१७ )

**अनुकंपा नियुक्तीसाठी जिल्हाधिकारी/सा.प्र.वि.-१४-अ आणि नियुक्ती प्राधिकारी यांनी ठेवावयाच्या प्रतीक्षासूचीचा नमूना**

**(शासन परिपत्रक, दि. १५.०५.२०१०)**

| अ.क्र. | प्रतीक्षासुची मधील उमेदवाराचे नाव व पत्ता | उमेदवाराशी संबंधित मूळ कार्यालयाचा पत्ता | प्रतीक्षासूची मधील क्रमांक | प्रतीक्षासुची मध्ये नाव दाखल झाल्याचा दिनांक | जन्मतारीख | शैक्षणिक अर्हता | मागासवर्गीय प्रवर्गाचे नाव/खुला/ | नियुक्तीसाठी शिफारस केल्याचा दिनांक व क्रमांक | नियुक्तीसाठी शिफारस कोणत्या कार्यालयात केली |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| | | | | | | | | | |

अनुकंपा तत्वावर नियुक्त्या जलदगतीने होण्यास सहाय्यभूत म्हणून अनुकंपा नियुक्तीची प्रमाणित कार्यपध्दती (SOP) प्रसिध्द करणेबाबत.---

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : अकंपा -१२२१/प्र.क्र.१८६/का-८
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २६ ऑगस्ट, २०२१.

प्रस्तावना:-

शासकीय सेवेत असताना कर्मचाऱ्याचे निधन झाल्यास त्याच्या कुटुंबावर ओढावणाऱ्या आर्थिक आपत्तीतून कुटुंबास बाहेर काढण्यासाठी आणि या आपत्तीजनक परिस्थितीवर मात करण्यास मदत करण्यासाठी संबंधित मृत कर्मचाऱ्याच्या कुटुंबातील एका पात्र सदस्यास शासकीय सेवेत अनुकंपा (सहानुभूती) म्हणून अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यात येते.

अनुकंपा नियुक्तीचे सदर प्रयोजन विचारात घेता अनुकंपा तत्वावर तातडीने नियुक्ती देणे अभिप्रेत आहे. तथापि, अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठी अर्ज केल्यानंतर नियुक्ती मिळण्यास काही वर्षाचा कालावधी लागत असल्याची बाब निदर्शनास आली आहे. अनुकंपा नियुक्तीच्या प्रतिक्षासूचीत प्रलंबित उमेदवारांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. कोवीड-१९ च्या पार्श्वभूमीवर अनुकंपा नियुक्ती धोरणानुसार तातडीने रोजगार उपलब्ध करुन दिल्यास या योजनेचे उद्देश साध्य होईल. ही बाब विचारात घेवून, अनुकंपा नियुक्तीच्या कार्यपध्दतीबाबत असणारा संभ्रम दूर करुन अनुकंपा नियुक्ती प्रक्रिया जलद गतीने पूर्ण करण्यास सहाय्यभूत होण्यासाठी अनुकंपा नियुक्तीची प्रमाणित कार्यपध्दती (Standard Operating Procedure) प्रसिध्द करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन परिपत्रक:-

अनुकंपा तत्वावरील नियुक्तीसाठी प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना तातडीने नियुक्त्या देण्याच्या अनुषंगाने अनुकंपा नियुक्तीची प्रमाणित कार्यपध्दती (SOP) सदर शासन परिपत्रकाद्वारेप्रसिध्द करण्यात येत आहे.

०२. सन १९९४ मध्ये अनुकंपा धोरणाबाबतचे यापूर्वीचे सर्व आदेश अधिक्रमित करुन दि.२६ ऑक्टोबर,१९९४ च्या शासन निर्णयाद्वारे नवीन अनुकंपा धोरणलागू करण्यात आले. तरी, सन १९९४ पासून आजतागायत पर्यंत अनुकंपा नियुक्ती संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन आदेशांद्वारे अनुकंपा नियुक्तीच्याप्रमाणित कार्यपध्दतीचे एकत्रिकरण करुन,सदर कार्यपध्दती सारांश रुपाने सुलभ संदर्भासाठी खालीलप्रमाणे उद्धृत करण्यात येत आहे.

अ) अनुकंपा नियुक्तीची कार्यपध्दती:-

| | | |
|---|---|---|
| १ | प्रत्येक प्रशासकीय विभागांतर्गतच्या नियुक्ती प्राधिकाऱ्यांच्या स्तरावर अनुकंपा नियुक्तीबाबत करावयाची कार्यवाही | |
| | (१) | नियुक्ती प्राधिकारी यांनी गटनिहाय अनुकंपा नियुक्तीची स्वतंत्र प्रतिक्षासूची तयार करणे |

| | | |
|---|---|---|
| | i | **कार्यालय प्रमुखाने अनुकंपा नियुक्तीच्या अर्जाची छाननी करणे** - ज्या कार्यालयातील शासकीय कर्मचाऱ्याचे सेवेत असताना निधन झाल्यामुळेत्याच्या कुटुंबातील पात्र सदस्याने अनुकंपा नियुक्तीसाठी अर्ज केल्यास, संबंधित कार्यालयाच्या कार्यालय प्रमुखांनी अनुकंपा नियुक्तीसाठी प्राप्त अर्जाची,दि.२१.०९.२०१७ च्या शासन निर्णयातील नमूद तरतूदींनुसार, छाननी करावी. |
| | ii | **नियुक्ती प्राधिकाऱ्याने प्रतिक्षासूचीत नाव समाविष्ट करणे**- छाननी अंती पात्र उमेदवाराने ज्या गटासाठी (गट-क / गट-ड) अनुकंपा नियुक्तीचा अर्ज केला आहे, त्या गटाच्या नियुक्ती प्राधिकाऱ्याकडे, सदर अर्ज प्रतिक्षासूचीत नाव समाविष्ट करण्यासाठी पाठवावा.<br>तथापि, कार्यालय प्रमुख हा स्वतः च गट-क / गट-ड साठी नियुक्ती प्राधिकारी असेल तर त्याने त्याच्याकार्यालयातील प्रतिक्षासूचीत संबंधित अनुकंपा नियुक्तीसाठीच्या अर्जदाराचेनाव समाविष्ट करावे.<br>म्हणजेच गट-क साठी व गट-ड साठी स्वतंत्र प्रतिक्षासूची ठेवणे आवश्यक आहे. |
| | iii | **प्रतिक्षासूचीमध्ये नाव समाविष्ट करण्याचा दिनांक** - प्रतिक्षा सूचीमध्ये उमेदवाराचे नाव त्याने विहित मुदतीत ज्या दिनांकास परिपूर्ण अर्ज सादर करेल त्या दिनांकास समाविष्ट करण्यात यावे. |
| | iv | **प्रतिक्षासूची संकेतस्थळावर प्रसिध्द करणे** - सदर प्रतिक्षासूची प्रत्येक नियुक्ती प्राधिकारी यांनी त्यांच्या संकेतस्थळावर वेळोवेळी अद्ययावत करुन प्रसिध्द करणे आवश्यक राहील. |
| (२) | | **नियुक्ती प्राधिकारी यांनी जिल्हास्तरीय सामायिक प्रतिक्षासूचीसाठी उमेदवाराचे नाव पाठविणे -** |
| | i | उपरोक्त १ प्रमाणे नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या स्तरावरील प्रतिक्षासूचीत उमेदवाराचे नाव अंतर्भूत केल्यानंतर, सदर नाव, जिल्हयाच्या गटनिहाय सामायिक प्रतिक्षासूचीमध्ये अंतर्भूत करण्यासाठी, तात्काळ संबंधित जिल्हयाच्या जिल्हाधिकारी कार्यालयास पाठवावे.<br>परंतु केवळ बृहन्मुंबई जिल्ह्यासाठी गट-क च्या सामायिक प्रतिक्षासूचीत नाव अंतर्भूत करण्यासाठी मंत्रालयातील सामान्य प्रशासन विभागातील कार्यासन १४-अ कडे प्रस्ताव पाठवावा आणि गट-ड च्या सामायिक प्रतिक्षासूचीत नाव अंतर्भूत करण्यासाठी बृहन्मुंबई जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयाकडे प्रस्ताव पाठवावा. |
| | ii | ज्या प्रकरणी नियुक्ती प्राधिकारी यांचे कार्यक्षेत्र एकापेक्षा जास्त जिल्ह्यांमध्ये असेल तर,अशा सर्व जिल्ह्यांसाठी मिळून त्यांच्या स्तरावर गटनिहाय स्वतंत्र प्रतीक्षासूची ठेवावी. मात्र दिवंगत कर्मचारी ज्या जिल्ह्यातील कार्यालयामध्ये असेल त्या जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे गटनिहाय सामाईक |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | प्रतीक्षासूचीवर घेण्यास त्या दिवंगत कर्मचाऱ्याच्या वारसाचे नाव पाठविण्यात यावे. |
| | (3) | **नियुक्ती प्राधिकारी यांनी त्यांच्या स्तरावरील प्रतिक्षासूचीतून अनुकंपा नियुक्ती देणे** | |
| | | i | **सरळसेवेच्यामंजूर पदांपैकी प्रतिवर्षी रिक्त होणाऱ्या पदांची संख्या व आरक्षण निश्चित करणे** :-नियुक्ती प्राधिकारी यांनी त्यांच्या अधिनस्त कार्यालयातील गट-क व गट-ड मधील प्रत्येक संवर्गातील सरळसेवेच्या प्रतिवर्षी रिक्त पदांची संख्या व त्यासाठीचे आरक्षण निश्चित करावे. |
| | | ii | **अनुकंपा नियुक्तीची पदसंख्या निश्चित करणे** :- त्यानंतर सरळसेवेने पद भरतीस मान्यता असणाऱ्या पदांपैकी प्रचलित तरतूदीनुसार २० टक्के **अनुकंपा तत्वावर नियुक्तीचीपद संख्या निश्चित करावी.** |
| | | iii | **प्रतिक्षासूचीतील ज्येष्ठतेक्रमानुसारच अनुकंपा नियुक्ती देणे** :-अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठी निश्चित केलेल्या पदांवर, नियुक्ती प्राधिकारी यांनी त्यांच्याकडील **प्रतिक्षासूचीतील उमेदवारांना, त्यांचा ज्येष्ठताक्रम न डावलता, त्यांच्या प्रतिक्षासूचीतील ज्येष्ठताक्रमानुसारच नियुक्ती दयावी.**<br>म्हणजेच अनुकंपा नियुक्ती देताना आरक्षण विचारात न घेता प्रतिक्षासूचीतील ज्येष्ठतेनुसार नियुक्ती देणे आवश्यक आहे.<br>त्यामुळे प्रतिक्षासूचीतील ज्येष्ठतेनुसार २० टक्के उमेदवारांना नियुक्ती दिल्यानंतर,संबंधित उमेदवार ज्या ज्या प्रवर्गातील आहेत त्यानुसार त्यांनाअ.क्र.१(३)(i) नुसार सरळसेवेच्या रिक्त पदांसाठी जे आरक्षण निश्चित केले आहे त्या आरक्षणातील त्या त्या प्रवर्गात दर्शविण्यात यावे.<br>परंतु, प्रतिक्षासूचीतील ज्येष्ठ उमेदवार हा अनुकंपा नियुक्तीसाठी उपलब्ध असलेल्या पदाची शैक्षणिक व इतर अर्हता धारण करीत नसेल मात्र प्रतिक्षासूचीतील नजीकचा कनिष्ठ उमेदवार संबंधित पदासाठीची अर्हता धारण करीत असेल तर केवळ अशा प्रसंगी त्या कनिष्ठ उमेदवारास प्रतिक्षासूचीतील ज्येष्ठ उमेदवाराची ज्येष्ठता डावलून अनुकंपा नियुक्ती देण्यात यावी. |
| | | iv | **अनुकंपा नियुक्तीनंतर सरळसेवेचे मागणीपत्र पाठविणे** :-सरळसेवेनेभरण्यास मान्यता असणाऱ्या पदांपैकी अनुकंपा नियुक्तीद्वारे २० टक्के पदे भरल्यानंतर ती पदे वगळून उर्वरित पदांचे मागणीपत्र लोकसेवा आयोग / निवड समितीस पाठवावे.<br>असे मागणीपत्र पाठविताना अनुकंपाद्वारे नियुक्त झालेले उमेदवार त्या त्या प्रवर्गात दर्शवून त्या त्या प्रवर्गातील उर्वरित पदांचे प्रवर्गनिहाय सरळसेवेचे मागणीपत्र पाठविणे आवश्यक राहील. |
| | | v | **अनुकंपा नियुक्तीनंतर प्रतिक्षासूचीतून संबंधित उमेदवाराचे नाव वगळणे** - नियुक्ती प्राधिकारी यांनी अनुकंपा तत्वावर त्यांच्या प्रतिक्षासूचीतील उमेदवारास नियुक्ती दिल्यानंतर सदर उमेदवाराचे नावत्यांच्या प्रतिक्षासूचीमधून वगळावे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | vi | **अ.क्र. २(१) नुसार जिल्हास्तरीय सामायिक ज्येष्ठतासूचीतून नाव वगळण्यासाठी पत्रव्यवहार करणे:-** नियुक्ती प्राधिकारी यांनी अनुकंपा तत्वावर त्यांच्या प्रतिक्षासूचीतील उमेदवारास नियुक्ती दिल्यानंतर, सदर उमेदवाराचे नाव जिल्हाधिकारी कार्यालयाच्या गटनिहाय सामायिक प्रतिक्षासूचीमधून वगळण्याबाबत संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयास तात्काळ अवगत करावे. |
| | | vii | **अनुकंपा नियुक्तीचे पद उपलब्ध असेल आणि प्रतिक्षासूचीवर उमेदवार उपलब्ध नसल्यास सामायिक यादीमधून उमेदवाराची मागणी करणे :-**नियुक्ती प्राधिकारी यांच्याकडे अनुकंपा तत्त्वावर पदभरतीसाठी पदे उपलब्ध असतील मात्र अनुकंपाची प्रतिक्षासूचीवर उमेदवार उपलब्ध नसेलतर सदर अनुकंपाची पदे जिल्हाधिकारी कार्यालयाकडील गटनिहाय सामायिक प्रतिक्षासूचीतून भरण्यासाठी तसा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करावा. असा प्रस्ताव सादर करताना त्यासोबत संबंधित पदांची सेवाप्रवेश नियमानुसार अर्हता, सरळसेवेने भरावयाच्या मंजूर रिक्त पदाच्या आरक्षणाचा तक्ता व अनुकंपाने भरावयाच्या पदांची संख्या पाठविण्याची दक्षता घ्यावी. |
| २ | **जिल्हाधिकारी यांच्या स्तरावरअनुकंपा नियुक्तीबाबत करावयाची कार्यवाही** | | |
| | (१) | **जिल्हाधिकारी यांनी जिल्हास्तरावर गटनिहाय सामाईक प्रतिक्षासूची तयार करणे** | |
| | | i | **बृहन्मुंबई जिल्हा वगळून अन्य सर्व जिल्हयांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाने जिल्हास्तरीय सामायिक प्रतिक्षासूचीत नाव समाविष्ट करणे** –अ.क्र.१(२) नुसार नियुक्ती प्राधिकारी यांच्याकडून गटनिहाय जिल्हास्तरीय सामायिक यादीसाठी नावप्राप्त झाल्यानंतर, सदर नाव जिल्हास्तरिय गट निहाय सामायिक प्रतिक्षासूचीत नाव अंतर्भूत करावे. म्हणजेच जिल्हा स्तरावर गट-क साठी एक व गट-ड साठी एक अशा एकुण दोन स्वतंत्र सामायिक प्रतिक्षासूची तयार करणे आवश्यक आहे.<br>ही कार्यवाही करत असताना, संबंधित उमेदवाराचे नाव हे नियुक्ती प्राधिकारी यांनी ज्या तारखेस त्यांच्या स्तरावरील प्रतिक्षासूचीत अंतर्भूत केले आहे त्याच तारखेस जिल्हास्तरिय गट निहाय सामायिक प्रतिक्षासूचीत नाव अंतर्भूत करावे. |
| | | ii | **बृहन्मुंबई जिल्हयासाठी सामायिक प्रतिक्षासूचीत नाव समाविष्ट करणे-**<br>• गट-क ची जिल्हास्तरीय सामायिक यादी ही मंत्रालयातील सामान्य प्रशासन विभागातील कार्यासन १४-अ यांचेकडे ठेवण्यात येते.<br>• गट-ड ची जिल्हास्तरीय सामायिक यादी ही जिल्हाधिकारी, बृहन्मुंबई यांचेकडे ठेवण्यात येते.<br>उपरोक्त बाब विचारात घेवून, अ.क्र.१(२) नुसार नियुक्ती प्राधिकारी यांच्याकडून गटनिहाय संबंधित कार्यालयास (सा.प्र.वि./कार्या-१४ किंवा जिल्हाधिकारी, बृहन्मुंबई) जिल्हास्तरीय सामायिक यादीसाठी नाव पाठविल्यानंतर, संबंधित कार्यालयाने त्यांच्याकडील जिल्हास्तरिय सामायिक प्रतिक्षासूचीत सदर नाव अंतर्भूत करावे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | iii | **जिल्हाधिकारी कार्यालयाने सामायिक प्रतिक्षासूची संकेतस्थळावर प्रसिध्द करणे**-जिल्हास्तरीय गट निहाय सामायिक प्रतिक्षासूची प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयाने त्यांच्या संकेतस्थळावर वेळोवेळी अद्ययावत करुन प्रसिध्द करणे आवश्यक राहील. |
| | (२) | **जिल्हाधिकारी कार्यालयाने अनुकंपा नियुक्तीसाठी शिफारस करणे** | |
| | | i | **जिल्हयातील सर्व नियुक्ती प्राधिकारी यांच्याकडून अनुकंपाच्या रिक्त पदांची माहिती घेणे** -जिल्हाधिकारी कार्यालयाने वेळोवेळी जिल्हयातील सर्व नियुक्ती प्राधिकारी यांना त्यांच्याकडील अनुकंपा तत्वावर नियुक्तीने भरावयाच्या पदांची संख्या सादर करण्याबाबत सूचीत करावे. |
| | | ii | **नियुक्ती प्राधिकारी यांनाअनुकंपा नियुक्तीसाठी शिफारस करणे** - जिल्हाधिकारी कार्यालयाने अ.क्र.२(२)(i) नुसार प्राप्त माहितीच्या आधारे, त्यांच्याकडील गटनिहाय सामायिक प्रतिक्षासूचीतील ज्येष्ठताक्रमानुसारच उमेदवारांना अनुकंपा नियुक्ती देण्याची नियुक्ती प्राधिकारी यांना शिफारस करावी. |
| | | iii | **शिफारशीनुसार दिलेल्या अनुकंपा नियुक्तीची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयास कळविणे** - जिल्हाधिकारी कार्यालयाच्या शिफारशीनुसार उमेदवारास नियुक्ती प्राधिकाऱ्यांमार्फत अनुकंपा नियुक्ती देण्याची कार्यवाही केल्यानंतर त्याबाबतची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयास कळवावी. |
| | | iv | **अनुकंपा नियुक्तीनंतर सामायिक प्रतिक्षासूचीतून संबंधित उमेदवाराचे नाव वगळणे**- नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या शिफारशीनुसार दिलेल्या अनुकंपा नियुक्तीची माहिती कळविल्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयाने संबंधित उमेदवाराचे नाव सामायिक प्रतिक्षायादीतून वगळावे. |
| | | v | **नियुक्ती प्राधिकारी यांच्या सूचीतून नाव वगळण्याबाबत कळविणे** - ज्या उमेदवारास जिल्हाधिकारी कार्यालयाच्या शिफारशीनुसार नियुक्ती प्राधिकाऱ्यांमार्फत नियुक्ती देण्यात येईल,त्या उमेदवाराचे नाव अ.क्र.२(२)(iv) नुसारसामायिक प्रतिक्षासूचीतून वगळण्याबरोबरच सदर नाव ज्या नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या पत्रव्यवहारानुसार सामायिक प्रतिक्षासूचीत अंतर्भूत करण्यात आले होते त्या नियुक्ती प्राधिकाऱ्यास देखिल त्यांच्या स्तरावरील प्रतिक्षासूचीमधून संबंधित उमेदवाराचे नाव वगळण्याबाबत कळविण्यात यावे. |
| ३ | **जिल्हाधिकारी यांची दुहेरी भूमिका राहिल -** जिल्हाधिकारी स्वत: त्यांच्या कार्यालयातील गट-क व गट-ड च्या शासकीय कर्मचाऱ्यांसाठी नियुक्ती प्राधिकारी या नात्याने अनुकंपा नियुक्तीचे कामकाज पाहतील. तसेच प्रत्येक जिल्हयातील अनुकंपा नियुक्तीच्या सामायिक प्रतिक्षासूचीचे सनियंत्रण अधिकारी म्हणून कामकाज पाहतील. | | |

| ४ | **अनुकंपा नियुक्तीसाठी दुहेरी प्रतिक्षासूची ठेवण्याचे प्रयोजन -** <br> नियुक्ती प्राधिकाऱ्यांच्या स्तरावर अनुकंपा नियुक्तीसाठी जी प्रतिक्षासूची ठेवण्यात येते त्या प्रतिक्षासूचीमधून संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या कार्यालयात अनुकंपा नियुक्ती देण्यात येते. मात्र अशा प्रकारे विविध नियुक्ती प्राधिकाऱ्यांच्या कार्यालयामध्ये त्यांच्या स्तरावर ठेवण्यात येणाऱ्या प्रतिक्षासूचीमधून अनुकंपा नियुक्तीसाठी उपलब्ध होणाऱ्या पदांचे प्रमाण समान नसते. त्यामुळे काही नियुक्ती प्राधिकारी कार्यालयातनू अनुकंपा तत्त्वावर तातडीने नियुक्त्या होतात. मात्र काही नियुक्ती प्राधिकारी कार्यालयात नियुक्तीसाठी पद उपलब्ध नसल्यामुळे नियुक्तीची प्रकरणे प्रलंबित राहतात. तसेच काही नियुक्ती प्राधिकारी कार्यालयात अनुकंपा नियुक्तीसाठी पद उपलब्ध असूनही त्या कार्यालयामध्ये प्रतिक्षासूचीवर उमेदवार उपलब्ध नसल्यामुळे अनुकंपा नियुक्ती करण्यात येत नाही. <br> ही वस्तुस्थिती विचारात घेवून अनुकंपा नियुक्तीच्या प्रमाणामध्ये सुसूत्रता आणणेतसेच अनुकंपा नियुक्ती शिघ्र गतीने होणे या दोन उद्देशाने, जिल्हा स्तरावरील सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांच्या कार्यालयातील प्रतिक्षासूचीतील उमेदवारांचे एकत्रिकरण करुन जिल्हा स्तरावर त्यांची सामायिक प्रतिक्षासूची ठेवावी असा शासनाने सन २००५ मध्ये निर्णय घेतला. जेणेकरुन त्या जिल्हयातील एखाद्या नियुक्ती प्राधिकाऱ्याकडे अनुकंपा नियुक्तीसाठी पद उपलब्ध असूनही त्या कार्यालयामध्ये प्रतिक्षासूचीवर उमेदवार उपलब्ध नसल्यास अशा प्रकरणी त्या जिल्हयातील अन्य नियुक्ती प्राधिकारी कार्यालयातील उमेदवारास सामायिक प्रतिक्षासूचीतील यादीमधूनसंबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या कार्यालयात अनुकंपा नियुक्ती शिघ्र गतीने प्राप्त होईल. <br> थोडक्यात प्रत्येक उमेदवाराचे अनुकंपा नियुक्तीसाठी संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्याचे कार्यालय व जिल्हा स्तरावरील सामायिक प्रतिक्षासूची या दोन्ही ठिकाणी नाव समाविष्ट राहील व या दोन्ही प्रतिक्षासूचीपैकी ज्या प्रतिक्षासूचीतून प्रथम नियुक्ती देणे शक्य आहे तेथून प्रथम नियुक्ती देणे अभिप्रेत असून त्यानंतर दोन्ही प्रतिक्षासूचीतून उमेदवाराचे नाव वगळणे आवश्यक आहे. |
|---|---|

टिप :-

१) अनुकंपा नियुक्तीची कार्यवाही जलद गतीने पूर्ण करण्यास्तव उपरोक्त प्रमाणे सुलभ संदर्भाधीसाठी नमूद करण्यात आलेल्या कार्यपध्दतीनुसार अनुकंपा नियुक्ती देत असताना, अनुकंपा धोरणासंदर्भातील दि.२१.०९.२०१७ च्या शासन निर्णयाद्वारे एकत्रिकरण केलेले सर्व आदेश विचारात घेवून त्यानुसारच अनुकंपा नियुक्ती देण्याची दक्षता घ्यावी.

२) नियुक्ती प्राधिकारी याचा अर्थ शासन निर्णय, समान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही/२०१६/ प्र.क्र.२९०/कार्या.१२ दिनांक १९ नोव्हेंबर, २०१६ अन्वये प्रत्येक प्रशासकीय विभागाने गट-क व गट-ड साठी आदेश निर्गमित करुन निश्चित केलेले प्राधिकारी असा आहे.

**आ) अनुकंपा नियुक्तीबाबत वेळोवेळी आढावा घेणे -**

अनुकंपा नियुक्तीची प्रक्रिया जलद गतीने पूर्ण करण्यासाठी, अनुकंपा धोरणानुसार नियुक्त्या देण्याची कार्यवाही करण्यात येते का यासंदर्भात खालीलप्रमाणे वेळोवेळी आढावा घेण्यात यावा.

१) **विभागीय आयुक्त यांच्या स्तरावर**- सर्व विभागीय आयुक्तांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व जिल्हयातील सामायिक गटनिहाय प्रतिक्षासूचीतून देण्यात येणाऱ्या अनुकंपा नियुक्ती संदर्भात सर्व शासकय कार्यालयातील नियुक्ती प्राधिकारी व जिल्हाधिकारी यांची त्रैमासिक आढावा बैठक आयोजित करावी. तसेच अनुकंपा नियुक्तीची प्रक्रिया वेळेवर होण्याच्या अनुषंगाने सनियंत्रण करावे व त्याबाबतची त्रैमासिक माहिती सामान्य प्रशासन विभागास पाठवावी.

२) **प्रशासकीय विभागाच्या स्तरावर** - सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिपत्याखालील गट-क व गट-ड च्या सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी त्यांच्याकडील प्रतिक्षासूचीतील अनुकंपा नियुक्तीबाबत केलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने त्रैमासिक आढावा बैठक घेवून अनुकंपा नियुक्त्यांची माहिती संकलित करावी. तसेच अनुकंपा नियुक्तीची प्रक्रिया वेळेवर होण्याच्या अनुषंगाने सनियंत्रण करावे व त्याबाबतची त्रैमासिक माहिती सामान्य प्रशासन विभागास सादर करावी.

०३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०२१०८२५१६३१४८१००७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**( गीता कुलकर्णी )**
उप सचिव (सेवा), महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. मा. राज्यपालांचे सचिव, मलबार हिल, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३. सर्व मा.मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४. सर्व सन्माननीय विधानसभा सदस्य/ विधानपरिषद सदस्य.
५. मा. मुख्य सचिव,
६. सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव / सचिव, (त्यांनी सदर आदेश त्यांच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय कार्यालयांना अवगत करावे.)
७. सर्व विभागीय आयुक्त/ सर्व जिल्हाधिकारी,
८. सामान्य प्रशासन विभाग / कार्या-१४अ,
९. निवडनस्ती. (सा.प्र.वि./ कार्यासन-८).

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिनस्त अकृषि विद्यापीठे, अशासकीय अनुदानित महाविद्यालये, अनुदानित संस्था इत्यादीमधील अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या अनुकंपा धोरणाबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२२०७/प्र.क्र.१४१/विशि-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक:- २२ डिसेंबर, २०२३

वाचा :-

१) शिक्षण व सेवायोजन विभाग, शासन निर्णय क्र.एनजीसी-१५८८/१४९१/विशि-४, दि.१९.०१.१९८९.
२) उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग, शासन निर्णय क्र. एनजीसी-१५९२/६३३७२/ (२४०३)/ विशि-४, दिनांक २३.०९.१९९३
३) उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग, शासन निर्णय क्र.एनजीसी-१५९५/ ९४२३ /(३०५४) /विशि-४, दि.२९.०९.१९९५.
४) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.एनजीसी-१५९७/२१४३/(४४०९)/विशि-४, दि.२६.०५.१९९८.
५) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.एनजीसी-१२९९/४८७१/विशि-४, दि.२८.०१.२०००.
६) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.अकंपा-२०११/ (३३३/११)/विशि-१, दि.१०.१०.२०११.
७) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१४/प्र.क्र.१५/१४/विशि-१, दि.१२.०५.२०१५.
८) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.अकंपा-१२१७/प्र.क्र.१०२/आठ, दि.२१.०९.२०१७.
९) सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना क्रमांक एसआरव्ही-२०१७/प्रक्र ४६२/कार्या-१२ दि. २८.५.२०१८.
१०) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.अकंपा-१२१९/प्र.क्र.५६/आठ, दि.११.९.२०१९
११) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.अकंपा-१२२१/प्र.क्र.११२/का-८, दि.२७.०९.२०२१

प्रस्तावना :-

अकृषि विद्यापीठे, अशासकीय अनुदानित महाविद्यालये, तंत्र शिक्षण संचालनालय व कला संचालनालय यांच्या नियंत्रणाखालील अशासकीय अनुदानित महाविद्यालये / संस्था, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्र शिक्षण विद्यापीठ-लोणेरे, अनुदानित अभिमत विद्यापीठे यामधील गट-क व गट-ड मधील कर्मचाऱ्यांना अनुकंपा नियुक्ती योजना लागू करण्यासंदर्भात वेळोवेळी शासन निर्णय निर्गमित करण्यात आले आहेत.

सामान्य प्रशासन विभागाने दि.२१.०९.२०१७ च्या शासन निर्णयान्वये अनुकंपा योजनेबाबत निर्गमित करण्यात आलेल्या सर्व शासन निर्णयांचे एकत्रिकरण करून सर्वसमावेशक आदेश निर्गमित केले आहेत. तसेच सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२७.०९.२०२१ च्या शासन निर्णयान्वये गट-अ व गट-ब संवर्गातील शासकीय कर्मचाऱ्यांना अनुकंपा नियुक्तीचे धोरण लागू करण्यात आले आहे.

सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णयाच्या धर्तीवर विभागाच्या अधिनस्त अकृषि विद्यापीठे, अनुदानित अशासकीय महाविद्यालये, तंत्र शिक्षण संचालनालय व कला संचालनालय यांच्या नियंत्रणाखालील अशासकीय अनुदानित महाविद्यालये / संस्था, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्र शिक्षण विद्यापीठ-लोणेरे, सीओइपी तंत्रज्ञान विद्यापीठ, लक्ष्मीनारायण अभिनव तंत्रज्ञान विद्यापीठ-नागपूर, यशवंतराव चव्हाण

अनुकंपा नियुक्ती योजना लागू करण्याकरीता सर्वसमावेशक आदेश निर्गमित करण्याची तसेच, सदर शैक्षणिक संस्थांमधील गट-अ व गट-ब संवर्गातील कर्मचाऱ्यांना अनुकंपा नियुक्तीचे धोरण लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यासंदर्भात पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

शासन निर्णय:-

१. अकृषि विद्यापीठे, अनुदानित अशासकीय महाविद्यालये, तंत्र शिक्षण संचालनालय व कला संचालनालय यांच्या नियंत्रणाखालील अशासकीय अनुदानित महाविद्यालये / संस्था, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्र शिक्षण विद्यापीठ-लोणेरे, सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ, लक्ष्मीनारायण अभिनव तंत्रज्ञान विद्यापीठ-नागपूर, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ-नाशिक, अनुदानित अभिमत विद्यापीठे यामधील शासनमान्य पदांवरील कर्मचाऱ्यांना अनुकंपा नियुक्तीचे धोरण लागू करण्यासंदर्भात यापूर्वी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयांमधील तरतुदी अधिक्रमित करण्यात येत आहेत.

२. अकृषि विद्यापीठे, अनुदानित अशासकीय महाविद्यालये, तंत्र शिक्षण संचालनालय व कला संचालनालय यांच्या नियंत्रणाखालील अशासकीय अनुदानित महाविद्यालये / संस्था, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्र शिक्षण विद्यापीठ-लोणेरे, सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ, लक्ष्मीनारायण अभिनव तंत्रज्ञान विद्यापीठ-नागपूर, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ-नाशिक, अनुदानित अभिमत विद्यापीठे यामधील शासनमान्य गट-अ ते गट-ड पदांवरील कर्मचाऱ्यांना अनुकंपा नियुक्ती देण्यासंदर्भातील तरतुदी सोबतच्या परिशिष्ट-अ नुसार असतील.

३. दिवंगत कर्मचाऱ्याच्या कुटुंबियाने करावयाचा अर्ज व तत्संबंधीची माहिती सोबतच्या परिशिष्ट-ब नुसार असेल.

४. अनुकंपा नियुक्तीसाठी नियुक्ती प्राधिकारी यांनी ठेवावयाच्या प्रतीक्षासूचीचे प्रारूप परिशिष्ट-क नुसार असेल.

५. कोविडच्या पार्श्वभूमीवर गट-अ व गट ब मधील कर्मचाऱ्यांना सदर योजनेचा लाभ दि.०१.०१.२०२० पासून अनुज्ञेय करण्यात येत आहे. अशा दिवंगत कर्मचाऱ्यांच्या पात्र कुटुंबियांना अनुकंपा नियुक्तीसाठी अर्ज करण्याची मुदत या शासन निर्णयाच्या दिनांकापासून एक वर्ष राहील.

६. सदर शासन निर्णय सामान्य प्रशासन विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक ९१/का ८/दिनांक ५ एप्रिल,२०२३ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०२३१२२२१८२६०८८१०८ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

AJIT MADHUKARRAO BAWISKAR

(अजित बाविस्कर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. राज्यपाल तथा कुलपती यांचे प्रधान सचिव, राजभवन मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा.उपमुख्य मंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

६) अपर मुख्य सचिव (सेवा) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
७) अपर मुख्य सचिव (वित्त विभाग) मंत्रालय, मुंबई.
८) प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
९) महालेखापाल (लेखा व परीक्षा), १/ २ महाराष्ट्र, मुंबई/ नागपूर.
१०) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), १/ २ महाराष्ट्र, मुंबई/नागपूर
११) सर्व उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२) कुलगुरु, सर्व अकृषि विद्यापीठे.
१३) कुलगुरु, डेक्कन महाविद्यालय पदव्युत्तर व संशोधन संस्था, पुणे.
१४) कुलगुरु, गोखले इन्स्टीट्यूट ऑफ पॉलिटीक्स ॲंड इकॉनॉमिक्स, पुणे.
१५) कुलगुरु, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.
१६) कुलगुरु, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
१७) संचालक, लक्ष्मीनारायण अभिनव तंत्रज्ञान विद्यापीठ-नागपूर.
१८) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१९) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२०) संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२१) सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण.
२२) सर्व विभागीय सहसंचालक, तंत्र शिक्षण.
२३) सर्व अवर सचिव/ कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२४) कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे.
२५) निवड नस्ती (विशि-१).

## परिशिष्ट - अ

(शासन निर्णय क्र.संकीर्ण-२२०७/प्र.क्र.१४१/विशि-१, दिनांक.- ३१ डिसेंबर, २०२३)

**१ अनुकंपा नियुक्ती योजनेचा लाभ खालील कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना अनुज्ञेय राहील:-**

अ) अकृषि विद्यापीठे, अनुदानित अशासकीय महाविद्यालये, तंत्र शिक्षण संचालनालय व कला संचालनालय यांच्या नियंत्रणाखालील अशासकीय अनुदानित महाविद्यालये / संस्था, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्र शिक्षण विद्यापीठ-लोणेरे, सीओइपी तंत्रज्ञान विद्यापीठ, लक्ष्मीनारायण अभिनव तंत्रज्ञान विद्यापीठ-नागपूर, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ-नाशिक, अनुदानित अभिमत विद्यापीठे यामधील शासनमान्य पदांवरील गट-अ ते गट-ड संवर्गातील अधिकारी/कर्मचारी.

आ) शासनमान्य पदावर सेवा नियमित केलेल्या परंतु अधिसंख्य पदावर कार्यरत असलेले कर्मचारी.

**२) खालील परिस्थितीत अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या पात्र नातेवाईकांना अनुकंपा तत्व वर नियुक्ती लागू राहील:-**

अ) अकृषि विद्यापीठे, अनुदानित अशासकीय महाविद्यालये, तंत्र शिक्षण संचालनालय व कला संचालनालय यांच्या नियंत्रणाखालील अशासकीय अनुदानित महाविद्यालये / संस्था, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्र शिक्षण विद्यापीठ-लोणेरे, सीओइपी तंत्रज्ञान विद्यापीठ, लक्ष्मीनारायण अभिनव तंत्रज्ञान विद्यापीठ-नागपूर, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ-नाशिक, अनुदानित अभिमत विद्यापीठे यामधील शासनमान्य पदांवरील यामधील गट-अ ते गड-ड संवर्गातील पात्र कर्मचाऱ्यांनाच अनुकंपा तत्वावर नियुक्ती अनुज्ञेय राहील.

आ) गट अ/ब/क/ड मधील अधिकारी/कर्मचाऱ्यास नक्षलवादी/दहशतवादी/दरोडेखोर/समाज-विघातक यांच्या हल्ल्यात/कारवाईत मृत्यू आल्यास अथवा सेवेत कार्यरत असताना स्वत:चा जीव धोक्यात घालून प्रत्यक्ष कर्तव्य बजावत असताना मृत्यूमुखी पडल्यास अशा अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या कुटुंबातील पात्र व्यक्तीस, अनुकंपा तत्वावर नियुक्ती देताना, त्यांचे नाव अनुकंपाधारकाच्या सामान्य प्रतीक्षासूचीमध्ये न घेता, त्यांची वेगळी यादी करून पद उपलब्ध असल्यास, रिक्त पदांच्या २० टक्के मर्यादेची अट शिथील करून त्यांना सर्व प्राधान्याने अनुकंपा नियुक्ती देण्यात यावी.

इ) गट अ/ब/क/ड मधील जे अधिकारी अथवा कर्मचारी नक्षलवादी /दहशतवादी /दरोडेखोर/ समाजविघातक यांच्या हल्ल्यात/कारवाईमध्ये कायमस्वरूपी जायबंदी झाले आहेत व त्यांनी स्वत:हून सेवा सोडून देण्याची लेखी अनुमती दिली आहे, अशा अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या पात्र कुटुंबियातील एका व्यक्तीस अनुकंपा नियुक्तीसाठी विहित केलेल्या २० टक्के मर्यादेमध्ये प्राधान्याने नियुक्ती देण्यात यावी.

ई) अनुकंपा नियुक्तीची पद संख्या ०.५ पेक्षा कमी येत असल्यास किमान १ पद अनुकंपा नियुक्तीने भरण्यात यावे. मात्र अनुकंपा नियुक्तीची पदसंख्या १ किंवा त्यापेक्षा जास्त पण ती पुर्णांकात नसून अपूर्णांकात येत असल्यास अशा वेळी संबंधित अपूर्णांक हा ०.१ ते ०.४९ असल्यास त्यापुर्वीच्या पूर्णांक संख्येइतकी पदे अनुकंपा नियुक्तीने भरावीत आणि जर अपुर्णांक हा ०.५० ते ०.९९ असल्यास त्यानंतरच्या पुर्णांक संख्येइतकी पदे अनुकंपा नियुक्तीने भरावीत. म्हणजेच जर अनुकंपा नियुक्तीची पदसंख्या ही ४.४० असल्यास ४ पदे भरावीत, आणि जर सदर पदसंख्या ४.६० असल्यास ५ पदे अनुकंपा नियुक्तीद्वारे भरण्यात यावीत.

उ) रिक्त पदांची गणना ही संबंधित पदांच्या मागील जाहिरातीच्या दिनांकापासून करण्यात यावी. मात्र अशी गणना करण्याच्या दरम्यानच्या काळात आकृतिबंध निश्चित झाल्या असल्यास त्यानुसार पदसंख्या विचारात घेऊन सरळसेवेने भरावयाच्या रिक्त पदांपैकी अनुकंपा नियुक्तीसाठीची पदसंख्या निश्चित करावी.

<u>३) खालील दर्जाच्या पदावर अनुकंपा नियुक्ती देय राहील</u> :-

अकृषि विद्यापीठे, अनुदानित अशासकीय महाविद्यालये, तंत्र शिक्षण संचालनालय व कला संचालनालय यांच्या नियंत्रणाखालील अशासकीय अनुदानित महाविद्यालये / संस्था, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्र शिक्षण विद्यापीठ-लोणेरे, सीओइपी तंत्रज्ञान विद्यापीठ, लक्ष्मीनारायण अभिनव तंत्रज्ञान विद्यापीठ-नागपूर, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ-नाशिक, अनुदानित अभिमत विद्यापीठे यामधील शासनमान्य पदांवरील कोणत्याही गट-क आणि गट-ड मधील सरळसेवेच्या पदावर, त्या पदाच्या सेवाप्रवेश नियमातील विहित शैक्षणिक अर्हता धारण करीत असल्यास अशी नियुक्ती देता येईल.

<u>४) अनुकंपा नियुक्तीसाठी पात्र कुटुंबिय</u> :-

अ) अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठी खालील नमूद केलेले नातेवाईक पात्र राहतील व त्यापैकी एका पात्र नातेवाईकास नियुक्ती अनुज्ञेय राहील.

१) पती/पत्नी
२) मुलगा/मुलगी (अविवाहीत/विवाहीत), मृत्यूपूर्वी कायदेशीररित्या दत्तक घेतलेला मुलगा/मुलगी (अविवाहीत/विवाहीत)
३) दिवंगत अधिकारी/कर्मचाऱ्याचा मुलगा हयात नसेल किंवा तो नियुक्तीसाठी पात्र नसेल तर त्याची सून
४) घटस्फोटित मुलगी किंवा बहीण, परित्यक्ता मुलगी किंवा बहीण, विधवा मुलगी किंवा बहीण
५) केवळ दिवंगत अविवाहीत कर्मचाऱ्याच्या बाबतीत त्याच्यावर सर्वस्वी अवलंबून असणारा भाऊ किंवा बहीण,

आ) मृत अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या पती/पत्नी ने कोणाची अनुकंपा तत्वावर नियुक्ती करावी याबाबत नामांकन देणे आवश्यक राहील. मृत अधिकारी/कर्मचाऱ्यांचे पती/पत्नी हयात नसल्यास त्याच्या/तीच्या सर्व पात्र कुटुंबियांनी एकत्रित येऊन कोणाची नियुक्ती करावी याबाबत नामांकन करावे.

<u>५) कुटुंबाची हलाखीची परिस्थिती</u> :-

अ) अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठी मासिक उत्पन्नाची तसेच ठोक रकमेची मर्यादा यापुढे राहणार नाही.

आ) अनुकंपा तत्वावर नियुक्ती देताना असे प्रस्ताव शासन सेवेतील रोजगारावर असलेली मर्यादा, या योजनेच्या मागील भूमिका लक्षात घेऊन जो कर्मचारी मृत झाला आहे त्याच्या कुटुंबियांना तात्काळ उद्भवणाऱ्या आर्थिक पेचप्रसंगावर मात करण्याच्या उद्देशाने विचारात घ्यावेत.

इ) दिवंगत कर्मचाऱ्याचा नातेवाईक पूर्वीच सेवेत असेल, तथापि तो त्याच्या कुटुंबातील अन्य सदस्यांना आधार देत नसेल तर अशा प्रकरणात त्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती हलाखीची आहे किंवा कसे हे ठरविताना नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी अत्याधिक दक्षता घ्यावी, जेणेकरुन सेवेत असलेला सदस्य कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत नाही या सबबीखाली अनुकंपा तत्वावरील नियुक्तीचा दुरुपयोग केला जाणार नाही.

यासंदर्भात नियुक्ती प्राधिकाऱ्याने मिळणाऱ्या निवृत्तीवेतनाची रक्कम, कुटुंबातील व्यक्तींची संख्या, त्याची मालमत्ता/दायित्व, गंभीर आजारामुळे अथवा अपघातामुळे मृत झाला असल्यास त्यासाठी करण्यात आलेला वैद्यकीय खर्च, कुटुंबातील मिळवत्या व्यक्ती इत्यादी बाबी विचारात घेणे अपेक्षित आहे.

<u>६) लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र</u> :-

दिनांक ३१ डिसेंबर, २००१ नंतर तिसरे अपत्य झालेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियास अनुकंपा तत्वावरील नियुक्तीसाठी पात्र समजले जाणार नाही.

<u>७) योजनेची माहिती देण्याची जबाबदारी</u> :-

अ) विद्यापीठाच्या बाबतीत कुलसचिव व महाविद्यालयाच्या बाबतीत प्राचार्य यांनी अनुकंपा तत्वावर नियुक्तीच्या योजनेची माहिती (योजनेचा उद्देश, पात्र नातेवाईक, अर्ज करण्याची मुदत, शैक्षणिक अर्हता, टंकलेखन प्रमाणपत्र सादर करण्यास मुदत, अर्ज विहित नमुन्यात भरणे इ. माहिती) कर्मचाऱ्याच्या मृत्यूनंतर १५ दिवसांत किंवा कुटुंबनिवृत्तीवेतनाची कागदपत्रे पाठविताना दिवंगत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना त्वरीत उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. तसेच सदर माहिती मिळाल्याबाबत कुटुंबाकडून पोच घेणे आवश्यक आहे.

ब) दिवंगत कर्मचाऱ्याचा पात्र वारसदार सज्ञान नसेल तर तो सज्ञान झाल्यानंतर एक वर्षाच्या आत अनुकंपा नियुक्तीसाठी अर्ज करू शकेल, मात्र तो सज्ञान झाल्यावर त्याने असा अर्ज करणे अपेक्षित आहे हे देखील कुटुंबनिवृत्तीवेतन धारकाला कुटुंब निवृत्तीवेतनविषयक कागदपत्रांची पूर्तता करतेवेळी लेखी कळविणे विद्यापीठाच्या बाबतीत कुलसचिव व महाविद्यालयाच्या बाबतीत प्राचार्य यांच्यावर बंधनकारक राहील.

<u>८) कुटुंबातील अन्य सदस्यांचा सांभाळ करण्याबाबतचे प्रमाणपत्र</u> :-

अ) अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यापूर्वी संबंधितांकडून कुटुंबातील अन्य व्यक्तींचा सांभाळ करण्याबाबत प्रतिज्ञापत्र घेण्यात यावे.

आ) अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यापूर्वी संबंधितांकडून दिवंगत कर्मचाऱ्यावर अवलंबून असलेल्या कुटुंबातील अन्य व्यक्तींचा सांभाळ करण्याबाबत प्रतिज्ञापत्र घेण्यात यावे. भविष्यामध्ये सदर प्रतिज्ञापत्राचे उल्लंघन झाल्याबाबतची तक्रार संबंधित कुटुंबियातील सदस्यांनी केल्यास सदर तक्रारीची चौकशी संबंधित नियुक्ती प्राधिकारी/शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्याने करावी. चौकशीअंती अनुकंपा नियुक्तीधारकाने प्रतिज्ञापत्राचे उल्लंघन केल्याचे निष्पन्न झाल्यास त्याला सेवेतून काढून टाकण्याची देखील शिक्षा देता येईल.

<u>९) कुटुंबातील इतर सदस्यांचे संमतीपत्र</u> :-

अ) अनुकंपा तत्वावर नियुक्ती ही कुटुंबातील एकाच पात्र नातेवाईकास अनुज्ञेय असल्याने कुटुंबातील इतर सदस्यांचे ना हरकत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

आ) ज्या शासकीय कर्मचाऱ्यांना वैयक्तिक कायद्यानुसार एकापेक्षा जास्त लग्न करण्यास प्रतिबंध नसेल अशा कर्मचाऱ्याच्या एकापेक्षा जास्त पत्नी हयात असल्यास, ज्या पत्नीला किंवा तीच्या मुलाला/मुलीला अनुकंपा तत्वावर नियुक्ती द्यायची आहे त्या व्यतिरिक्त अन्य पत्नीचे देखील ना हरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे.

<u>१०) अर्ज करण्यासाठी मुदत</u> :-

अ) दिवंगत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबातील पात्र नातेवाईकाने अधिकारी/कर्मचारी दिवंगत झाल्याच्या दिनांकापासून एक वर्षाच्या मुदतीत अनुकंपा नियुक्तीकरीता संबंधित नियुक्ती प्राधिका-याकडे विहीत नमुन्यात परिपूर्ण अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

(आ) सेवेत असताना दिवंगत झालेल्या कर्मचा-यांच्या कुटुंबातील अज्ञान वारसदाराच्या बाबतील एकानेसज्ञान म्हणजे १८ वर्षाचा झाल्यावर एक वर्षाच्या आत अनुकंपा नियुक्तीसाठी परिपूर्ण अर्ज सादरकरणे आवश्यक आहे.

(इ) पात्र वारसदारास विहीत १ वर्षाच्या मुदतीनंतर २ वर्ष इतक्या कालावधीपर्यंत (मृत्युच्या दिनांकापासून ३ वर्षापर्यंत) तसेच, दिवंगत शासकीय कर्मचा-यांच्या अज्ञान वारसदाराच्या बाबतीत तो उमेदवार सज्ञान झाल्यानंतर विहीत १ वर्षाच्या मुदतीनंतर २ वर्षापर्यंत (सज्ञान झाल्यानंतर ३ वर्षापर्यंत) अर्ज सादर करण्यास विलंब झाल्यास अशा विलंब क्षमापित करण्याचे

अधिकार उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव यांना देण्यात आले आहेत.

(इ) जोपर्यंत अनुकंपा नियुक्तीकरीता आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे उमेदवारांकडून प्राप्त होत नाहीत, तोपर्यंत त्यांचे नाव प्रतीक्षासूचीमध्ये समाविष्ट करता येणार नाही. ज्यादिवशी संपूर्ण कादपत्रे प्राप्त होतील, त्यादिवशी त्यांचे नाव प्रतीक्षासूचीमध्ये समाविष्ट करावे.

११) अनुकंपा नियुक्तीकरीता वयोमर्यादा :-

अ) किमान वयोमर्यादा- १८ वर्ष.

(आ) कमाल वयोमर्यादा- वयाच्या ४५ वर्षापर्यंतच्याच उमेदवारांना अनुकंपा नियुक्ती अनुज्ञेय असेल. त्यामुळे प्रतिक्षा सूचीतील उमेदवारांना वयाच्या ४५ वर्षापर्यंत नियुक्ती न मिळाल्यास त्यांची नावे वयाची ४५ वर्ष पूर्ण होताच आवश्यक ती नोंद घेऊन प्रतीक्षासूचीतून काढून टाकण्यात यावीत.

(इ) अनुकंपा नियुक्तीकरीता सामान्य प्रशासन विभागाकडून वेळोवेळी विहित करण्यात येणारी वयोमर्यादा लागू राहील.

१२) अनुकंपा नियुक्तीसाठी शैक्षणिक अर्हता :-

(अ) पात्र नातेवाईकाची शैक्षणिक अर्हता व निम्न वयोमर्यादेनुसार त्याला गट-क किंवा गट-ड मधीलपदावर अनुकंपा नियुक्ती अनुज्ञेय राहील.

(आ) संबंधीत पदांसाठी विहीत शैक्षणिक पात्रता आणि निम्न वयोमर्यादा याबाबतच्या अटी या नेमणूकांसाठी कटाक्षाने पाळण्यात येतील.

(इ) तथापि, दिवंगत कर्मचाऱ्याची पत्नी शैक्षणिक पात्रतेव्यतिरिक्त इतर अटी पूर्ण करीतअसल्यास तीच्या बाबतीत गट-ड मध्ये नेमणूकीसाठी शैक्षणिक अर्हतेची अट शिथील करण्याचेअधिकार संबंधितनियुक्ती प्राधिकाऱ्याला असतील.

१३) गट-क मधील लिपीक टंकलेखक पदावर अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठी टंकलेखन प्रमाणपत्र सादर करण्यास मुदत :-

(अ) अनुकंपा तत्वावर लिपीक-टंकलेखक , गट-क या पदावर नियुक्त झालेल्या उमेदवारांना विहीत वेगमर्यादेचे टंकलेखन अर्हता प्रमाणपत्र २ वर्षाच्या आत सादर करणे बंधनकारक राहील.

१४) अनुकंपा तत्वावर गट-क मधील लिपीक टंकलेखक पदावर नियुक्ती मिळाल्यानंतर विहीत मुदतीत टंकलेखन प्रमाणपत्र सादर न केल्यास अनुसरावयाची कार्यपध्दती :-

अनुकंपा तत्वावर लिपीक-टंकलेखक, गट-क या पदावर नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्याने, नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या विहित मुदतीत टंकलेखन प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. तथापि, दोन वर्षाच्या विहित मुदतीत टंकलेखन प्रमाणपत्र सादर न केल्यास, त्याची सेवा समाप्त न करता, अशा कर्मचाऱ्यास विहित मुदतीनंतरटंकलेखन प्रमाणपत्र सादर करेपर्यंत वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय राहणार नाही. दोन वर्षाच्या मुदतीनंतर ज्यावेळी टंकलेखन प्रमाणपत्र सादर करण्यात येईल, त्यावेळी संबंधित कर्मचाऱ्यास वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय राहील. तसेच विलंबाने प्रमाणपत्र सादर केल्यानंतर सदर विलंबाच्या कालावधीतील देय असणाऱ्या वेतनवाढी ह्या टंकलेखन प्रमाणपत्र सादर करण्याच्या दिनांकास काल्पनिकरित्या अनुज्ञेय करण्यातयाव्यात. तथापि, त्या कालावधीतील वेतन व भत्यांची कोणतीही थकबाकी संबंधित कर्मचाऱ्यास अनुज्ञेय असणार नाही.

या आदेशाच्या दिनांकापासून ही तरतुद लागू होईल. परंतु, या आदेशाच्या दिनांकास अनुकंपा तत्वावर सेवेत नियुक्त झालेल्या ज्या कर्मचाऱ्यांची टंकलेखन प्रमाणपत्र सादर करण्याची प्रकरणे प्रलंबित आहेत, त्या

प्रकरणी या आदेशातील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात यावी. मात्र विहित मुदतीनंतर टंकलेखन प्रमाणपत्र सादर झालेल्या ज्या प्रकरणी यापूर्वी अंतिम निर्णय झाला आहे, अशा प्रकरणास ही तरतुद लागू होणार नाही.

१५) गट-क मधील लिपीक टंकलेखक पदावर अनुकंपा नियुक्तीसाठी संगणक अर्हता प्रमाणपत्र सादर करणे :-

माहिती तंत्रज्ञान संचालनालय, महाराष्ट्र शासन यांच्याकडून शासन सेवेतील गट-क मधील (वाहन चालक वगळून) संबंधित पदाकरीता महाराष्ट्र नागरी सेवा (संगणक हाताळणी/वापराबाबतचे ज्ञान आवश्यक ठरविण्याबाबत) नियम, १९९९ च्या नियम ३ अन्वये आवश्यक अर्हता म्हणून अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठी उमेदवारांनी खालील "अ" किंवा "ब" प्रमाणे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

अ) D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत 'C.C.C. किंवा 'O' स्तर किंवा 'A' किंवा 'B' किंवा "C"स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा,

ब) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांच्याकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.

संगणक ज्ञानाची वरील किमान अर्हता अनुकंपा तत्वावरील नियुक्तीच्या वेळी धारण करीत नसलेल्या उमेदवारांना सदर अर्हता गट-क मधील पदावर (वाहन चालक वगळून) अनुकंपा तत्वावर नियुक्ती झाल्याच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील.सामान्य प्रशासन विभाग, शासन अधिसूचना दि.२८.०५.२०१८ अन्वये "महाराष्ट्र नागरी सेवा (संगणक हाताळणी/वापराबाबतचे ज्ञान आवश्यक ठरविण्याबाबत) (सुधारणा) नियम, २०१८ व याबाबत सामान्य प्रशासन विभागाकडून वेळोवेळी करण्यात येणाऱ्या सुधारणा लागू राहतील अशी स्पष्ट तरतूद उमेदवारांच्या नियुक्ती आदेशात, नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी नमूद करावी.

१६) पद उपलब्धते अभावी गट-क मधील पदाऐवजी गट-ड मधील पदावर नियुक्ती देताना अनुसरावयाची कार्यपध्दती :-

गट-क मधील पदांवर अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठी पात्र असणाऱ्या कर्मचाऱ्याला पदाच्या उपलब्धतेअभावी गट-ड मधील पदांवर नियुक्ती दिल्यास पद उपलब्ध होताच गट-क मधील पदावर त्याला प्राधान्याने नियुक्ती देण्यात यावी.अशी नियुक्ती सरळसेवा नियुक्तीने भरण्यात येणाऱ्या पदांवरील समजण्यात यावी. मात्र गट-ड मधील पदावर अनुकंपा योजनेन्वये नियुक्ती देण्याच्या आदेशात तसा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा, तसे करण्यात आले तरच गट-क मधील पदावर नियुक्ती देता येईल.

१७) अनुकंपा तत्वावर प्रतीक्षासूची ठेवण्याबाबतची कार्यपध्दती :-

(अ) विद्यापीठांनी अनुकंपा नियुक्तीसाठी विद्यापीठनिहाय गट-क व गट-ड पदांकरीता प्रतिक्षासूची ठेवावी.

(आ) एकाच शैक्षणिक संस्थेची एका पेक्षा अधिक महाविद्यालये असल्यास अशा शैक्षणिक संस्थांनी अशा सर्व महाविद्यालयाकरीता एकत्रित स्वरूपात गट-क व गट-ड पदांकरीता प्रतिक्षासूची ठेवावी.

(इ) गट-क व गट-ड मधील पदांवरील नियुक्तीसाठी सक्षम नियुक्ती प्राधिकारी उपलब्ध गट-क व गट-ड च्या रिक्त पदांवर, पदांसाठी विहीत अटी व शर्ती पूर्ण करणाऱ्या उमेदवारांची त्यांच्याकडील प्रतीक्षासूचीतील क्रमानुसार नियुक्ती करु शकतील. नियुक्ती दिल्यानंतर अशा उमेदवारांची नावे प्रतिक्षासूचीमधून वगळण्यात यावीत.

(ई) गट-ड च्या प्रतीक्षासूचीवरील उमेदवाराने गट-ड च्या पदावर अनुकंपा तत्वावर नियुक्ती मिळण्यापूर्वी जर गट-क पदासाठी आवश्यक असणारी वाढीव शैक्षणिक अर्हता प्राप्त केली व त्यानुसार त्याने गट-क च्या प्रतीक्षासूचीत नाव समाविष्ट करण्यासाठी अर्ज केल्यास, त्याचे नाव गट-ड च्या प्रतीक्षासूचीतून वगळून गट-क च्या प्रतीक्षासूचीत समाविष्ट करावे. यासाठी गट-ड च्या प्रतिक्षासूचीतील उमेदवार गट-क साठीची शैक्षणिक अर्हता धारण केल्याच्या आवश्यक त्या

कागदपत्रांच्या पुराव्यासह परिपूर्ण अर्ज ज्या दिनांकास नियुक्ती प्राधिकाऱ्याकडे करेल त्या दिनांकास त्याचे नाव गट-क च्या प्रतीक्षासूचीत समाविष्ट करण्यात यावे व गट-ड च्या प्रतीक्षासूचीतून त्याचे नाव वगळण्यात यावे.

एकदा गट-ड च्या प्रतीक्षासूचीमधून नाव वगळून गट-क च्या प्रतीक्षासूचीमध्ये नाव समाविष्ट केल्यास पुन्हा गट-ड च्या प्रतीक्षासूचीमध्ये नाव समाविष्ट करता येणार नाही. यापूर्वी अनुकंपा धारकाने जरी गट बदलण्याची विनंती केली असली तरी तत्कालीन नियमात तशी तरतुद नसल्याने अनुकंपाधारकांनी गट बदलण्यासाठी पुन्हा नियुक्ती प्राधिकाऱ्याकडे अर्ज करावा. असा अर्ज ज्या दिनांकास प्राप्त होईल त्या दिनांकास अनुकंपाधारकाचे नाव प्रतीक्षासूचीतून बदलता येईल.

<u>१८) अनुकंपा नियुक्तीकरीता ठेवण्यात येणारी प्रतीक्षासूची वेबसाईट (संकेतस्थळावर) प्रसिध्द करणे</u> :-

अकृषि विद्यापीठे, अनुदानित अशासकीय महाविद्यालये, तंत्र शिक्षण संचालनालय व कला संचालनालय यांच्या नियंत्रणाखालील अशासकीय अनुदानित महाविद्यालये / संस्था, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्र शिक्षण विद्यापीठ-लोणेरे, सीओइपी तंत्रज्ञान विद्यापीठ, लक्ष्मीनारायण अभिनव तंत्रज्ञान विद्यापीठ-नागपूर, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ-नाशिक, अनुदानित अभिमत विद्यापीठे यांनी त्यांच्या कार्यालयातील अनुकंपा नियुक्तीसाठी प्रतीक्षासूचीवर असलेल्या उमेदवारांची नावे व इतर माहिती सोबत जोडलेल्या प्रपत्र 'क' मधील नमुन्यात कार्यालयाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावी. सदर माहिती ही प्रत्येक महिन्यास अद्यावत करावी. तसेच अनुकंपा तत्वावर नियुक्ती दिलेल्या उमेदवारांची नावे व माहिती प्रत्येक महिन्याच्या अखेरीस १)संचालक-उच्च शिक्षण,२) संचालक- तंत्र शिक्षण, ३) संचालक, कला संचालनालय व संबंधित विभागीय सहसंचालक यांना सादर करावी.

<u>१९) अनुकंपा नियुक्तीसाठी विहित पदांची मर्यादा</u> :-

गट-क व गट-ड संवर्गातील सरळसेवा कोट्यातील प्रतिवर्षी रिक्त होणाऱ्या पदांच्या २० टक्के पदे अनुकंपा नियुक्तीने भरण्यात यावीत. सामान्य प्रशासन विभागाकडून अनुकंपा नियुक्तीकरीता वेळोवेळी विहित करण्यात येणारी पदांची मर्यादा अकृषि विद्यापीठे व अशासकीय अनुदानित महाविद्यालयांना लागू राहील.

<u>२०) मागासवर्गीयांसाठी आरक्षित ठेवलेल्या पदावर अनुकंपा तत्वावर नियुक्ती देताना करावयाची कार्यवाही</u> :-

अनुकंपा नियुक्तीसाठी असलेल्या प्रतीक्षासूचीवरील अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यासाठी उमेदवारांची शिफारस करताना नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी खालीलप्रमाणेकार्यवाही करावी:-

अ) मागासवर्गीयांसाठी आरक्षित असलेल्या पदावर खुल्या प्रवर्गाच्या उमेदवाराची नियुक्ती करता येत नाही. वास्तव नियुक्ती प्राधिकारी यांनी रिक्त पदांची माहिती घेताना प्रत्येक रिक्त पद कोणत्या प्रवर्गासाठी आरक्षित आहे/अनारक्षित आहे, याचीही माहिती घ्यावी. तद्नंतर अशा पदावर अनुकंपा उमेदवारांची नियुक्ती करताना मागासवर्गीयांसाठी आरक्षित असलेल्या रिक्त पदावर खुल्या प्रवर्गाच्या उमेदवाराची नियुक्ती केली जाणार नाही, याची दक्षता घ्यावी. तसेच आरक्षित पद आरक्षित प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध होईपर्यंत रिक्त ठेवावे.

ब) प्रतीक्षासूचीत कनिष्ठ क्रमांकावर मागास प्रवर्गाचा उमेदवार असला तरी त्यास जेष्ठता क्रम डावलून खुल्या प्रवर्गाच्या जेष्ठ उमेदवारांना नियुक्ती देण्यापूर्वी आरक्षित पदावर नियुक्ती देता येणार नाही.खुल्या प्रवर्गाच्या उमेदवारांना नियुक्ती दिल्यानंतर जेव्हा आरक्षित प्रवर्गाच्या उमेदवाराचा प्रतीक्षा सूचीतील जेष्ठतेनुसार नियुक्तीसाठी क्रम येईल तेव्हाच त्याची नियुक्ती आरक्षित पदावर करणे आवश्यक आहे. तथापि, मागासवर्गीय उमेदवारास प्रतीक्षासूचीवरील जेष्ठताक्रमानुसार अनुकंपा नियुक्ती देण्याच्या वेळी त्या उमेदवाराच्या मागासवर्ग प्रवर्गाचे पद उपलब्ध नसले, तरी त्यांना खुल्या प्रवर्गाच्या उपलब्ध पदावर नियुक्ती देणयात यावी

<u>२१) अनुकंपा तत्वावरील प्रतीक्षासूचीवरील उमेदवाराचे निधन झाल्यास त्याऐवजी कुटुंबातील अन्य पात्र वारसदाराचा समावेश अनुकंपा नियुक्तीच्या प्रतिक्षासूचीत करणे</u> :-

कर्मचाऱ्याच्या मृत्युनंतर त्याच्या पात्र कुटुंबियांचे नाव अनुकंपाधारकांच्या प्रतीक्षासूचीमध्ये घेतल्यानंतर त्याच्याऐवजी अन्य पात्र वारसदाराचे नाव प्रतीक्षासूचीमध्ये घेतले जात नाही. म्हणजेच प्रतीक्षासूचीमधील नाव बदलण्याची तरतूद सध्याच्या धोरणात नाही. परंतु प्रतीक्षासूचीवरील उमेदवाराचेच निधन झाल्यास प्रतीक्षासूचीतील उमेदवाराऐवजी त्याच्या कुटुंबातील अन्य पात्र वारसदाराचे नाव अनुकंपाधारकांच्या प्रतीक्षासूचीमध्ये मूळ उमेदवाराच्या प्रतीक्षासूचीतील दिनांकाला घेतले जाईल. मात्र नव्या उमेदवाराचे वय सदर दिनांकाला १८ वर्षापेक्षा जास्त असावे. जर नव्या उमेदवाराचे वय मूळ उमेदवाराच्या प्रतीक्षासूचीतील दिनांकास १८ वर्षापेक्षा कमी असेल तर या उमेदवाराचे नाव त्याला ज्या दिवशी १८ वर्ष पूर्ण होतील त्या दिनांकास घेण्यात यावे.

<u>२२) बेपत्ता झालेल्या कर्मचाऱ्याच्या कुटुंबातील सदस्यांना नियुक्ती देणेबाबत</u> :-

अकृषि विद्यापीठे, अनुदानित अशासकीय महाविद्यालये, तंत्र शिक्षण संचालनालय व कला संचालनालय यांच्या नियंत्रणाखालील अशासकीय अनुदानित महाविद्यालये / संस्था, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्र शिक्षण विद्यापीठ-लोणेरे, सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ, लक्ष्मीनारायण अभिनव तंत्रज्ञान विद्यापीठ-नागपूर, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ-नाशिक, अनुदानित अभिमत विद्यापीठे यामधील बेपत्ता झालेल्या कर्मचाऱ्यास सक्षम न्यायालयाने मयत घोषित केल्यानंतर त्याच्या कुटुंबातील पात्र सदस्यांना अनुकंपा नियुक्ती देय ठरेल. बेपत्ता कर्मचाऱ्याच्या वारसदारास अनुकंपा नियुक्तीसाठी अर्ज करण्याची मुदत ही अनुकंपा धोरणासाठी वेळोवेळी केलेल्या नियमानुसार राहील.

<u>२३) अनुकंपा नियुक्ती हा कर्मचाऱ्याच्या कुटुंबाचा "वारसा हक्क" नाही</u>-

मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या विविध निर्णयानुसार अनुकंपा तत्वावरील नियुक्ती हा कर्मचाऱ्याच्या कुटुंबाचा "वारसा हक्क" होत नाही. तसेच विशिष्ट कालावधी उलटून गेल्यावर अनुकंपा नियुक्ती अनुज्ञेय राहत नाही.

<u>२४) अनुकंपा तत्वावरील नियुक्तीस मान्यता देणे</u> :-

अकृषि विद्यापीठे, अनुदानित अशासकीय महाविद्यालये, तंत्र शिक्षण संचालनालय व कला संचालनालय यांच्या नियंत्रणाखालील अशासकीय अनुदानित महाविद्यालये / संस्था, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्र शिक्षण विद्यापीठ-लोणेरे, सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ, लक्ष्मीनारायण अभिनव तंत्रज्ञान विद्यापीठ-नागपूर, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ-नाशिक, अनुदानित अभिमत विद्यापीठे यामधील नियुक्ती प्राधिकारी यांनी अनुकंपा तत्वावरील नियुक्तीबाबतचा परिपूर्ण प्रस्ताव, विभागीय सहसंचालक यांच्यामार्फत तपासणी करून यथास्थिती १) संचालक- उच्च शिक्षण, २) संचालक-तंत्र शिक्षण, ३) संचालक, कला संचालनालय यांना सादर करावा. संचालकांनी अशा प्रस्तावाची छाननी करून अटी व शर्तीची पूर्तता होत आहे, याची खातरजमा करून अशा अनुकंपा नियुक्तीच्या प्रस्तावास मान्यता द्यावी. तद्नंतर नियुक्ती प्राधिकारी यांनी संबंधित उमेदवारास अनुकंपा नियुक्ती देण्याचे आदेश निर्गमित करावे.

<u>२५) अनुकंपा नियुक्तीबाबतच्या अटी व शर्ती शिथील करण्याबाबत</u> :-

अज्ञान वारसदाराच्या बाबतीत तो उमेदवार सज्ञान झाल्यानंतर विहीत १ वर्षाच्या मुदतीनंतर २ वर्षापर्यंत (सज्ञान झाल्यानंतर ३ वर्षापर्यंत) अर्ज सादर करण्यास विलंब झाल्यास असा विलंब क्षमापित करण्याचे अधिकार उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव यांना उपरोक्त अनुक्रमांक १० (इ) नुसार देण्यात आले आहेत. तसेच अनुकंपा नियुक्तीसाठी दिवंगत शासकीय कर्मचाऱ्यांच्या विधवांना केवळ गट-ड मधील पदावर नियुक्ती करावयाची असल्यास शैक्षणिक अर्हता शिथील करण्याची

तरतुद उपरोक्त अनुक्रमांक ११ (इ) मध्ये आहे. याव्यतिरिक्त अन्य कोणत्याही अटी व शर्ती शिथील करण्याची शक्ती नियुक्ती प्राधिकारी तसेच शासनाकडे राहणार नाहीत.

अनुकंपा नियुक्तीबाबतचे प्रस्ताव कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर त्यांची संपूर्ण शहानिशा संबंधित कार्यालयांनी करुन जर अटी व शर्तीची पूर्तता होत असेल तरच ते प्रस्ताव विचारात घ्यावेत अन्यथा ते प्रस्ताव त्यांच्या स्तरावर उचित उत्तर देऊन निकालात काढावेत. त्याकरीता प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याची आवश्यकता नाही. सर्व नियुक्ती प्राधिकारी यांनी उपरोक्त सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

*****************

## परिशिष्ट-ब

(शासन निर्णय क्र.संकीर्ण-२२०७/प्र.क्र.१४१/विशि-१, दिनांक:- २२ डिसेंबर, २०२३)

अकृषि विद्यापीठे, अनुदानित अशासकीय महाविद्यालये, तंत्र शिक्षण संचालनालय व कला संचालनालय यांच्या नियंत्रणाखालील अशासकीय अनुदानित महाविद्यालये / संस्था, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्र शिक्षण विद्यापीठ-लोणेरे, सीओइपी तंत्रज्ञान विद्यापीठ, लक्ष्मीनारायण अभिनव तंत्रज्ञान विद्यापीठ-नागपूर, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ-नाशिक, अनुदानित अभिमत विद्यापीठे यामधील शासनमान्य पदावर सेवेत असताना दिवंगत झालेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या नातेवाईकास अनुकंपा तत्वावर नेमणूक देतेवेळी भरावयाचे प्रपत्र.

### भाग-१

१. (अ) दिवंगत अधिकारी/कर्मचाऱ्याचे नाव :-
(ब) कर्मचाऱ्याचे पदनाम :-
(क) जन्म दिनांक :-
(ड) मृत्यूचा दिनांक :-
(इ) नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीचा दिनांक :-

२. (अ) ज्या व्यक्तीस नियुक्ती द्यावयाची आहे, त्या व्यक्तीचे नाव :-
(ब) त्याचे/तिचे दिवंगत कर्मचाऱ्याशी नाते :-
(क) जन्म दिनांक :-
(ड) शैक्षणिक अर्हता :-
(इ) कुटुंबियांपैकी दुसऱ्या कोणा कुटुंबियाला अनुकंपा तत्वावर नियुक्ती दिली आहे काय :-

३. स्थावर मालमत्तेच्या उत्पन्नास पुढील योजनांनुसार मिळालेली एकूण रक्कम :-
(अ) कुटुंब निवृत्तीवेतन :-
(ब) स्थावर मालमत्तेपासून वा इतर मासिक उत्पन्न :-
(क) मृत्यू-नि-सेवानिवृत्ती उपदान :-
(ड) भविष्यनिर्वाह निधीतील बचत :-
(इ) ठेव संलग्न विमा योजना :-
(फ) गट विमा योजना :-
(ग) आयुर्विम्याची रक्कम :-

एकूण रक्कम :-

४. कर्मचाऱ्याच्या कुटुंबातील सर्व व्यक्तींचा तपशील (त्यापैकी कोणी नोकरी/व्यवसाय करीत असल्यास त्याचे मासिक उत्पन्न याबाबतची माहिती) :-

| अ.क्र. | नांव | कर्मचाऱ्याशी नाते व वय | नोकरी/व्यवसाय करीत असल्यास त्याचे मासिक उत्पन्न |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |
| ४ | | | |
| ५ | | | |
| ६ | | | |

## प्रतिज्ञापत्र

मी, याव्दारे असे घोषित करतो/करते की, वर नमूद केलेल्या बाबी माझ्या समजुतीप्रमाणे खऱ्या आहेत. वरील बाबींपैकी एक जरी बाब भविष्यात खोटी किंवा चूकीची आढळली तर माझी नियुक्ती समाप्त करण्यात यावी.

दिनांक :-

उमेदवाराची स्वाक्षरी

श्री./श्रीमती.................................................................................. हे माझ्या परिचयाचे असून त्यांनी नमूद केलेल्या बाबी खऱ्या आहेत.

दिनांक :-

स्थायी कर्मचाऱ्याची सही व पत्ता

## भाग-२

१. (अ) ज्याला नियुक्ती द्यावयाची आहे त्या उमेदवाराचे नाव :-

(ब) त्याचे/तिचे अधिकारी/कर्मचाऱ्याशी नाते :-

(क) शैक्षणिक अर्हता, वय (जन्मतारीख), अनुभव (काही असल्यास)

(ड) ज्या पदावर नियुक्ती द्यावयाची आहे ते पद व कार्यालयाचे नाव :-

उमेदवाराने अर्ज केल्याचा दिनांक :-

३. विद्यापीठ/महाविद्यालयाची शिफारस :-

४. उमेदवाराचे प्रकरण सादर करण्यास उशीर झाला असल्यास त्याचा खुलासा :-

मी, उमेदवाराने नमूद केलेल्या भाग-१ मधील बाबी तपासल्या आहेत

आस्थापना अधिकाऱ्याची सही, नाव व पत्ता

दिनांक :-
ठिकाण :-

## परिशिष्ट-क

(शासन निर्णय क्र.संकीर्ण-२२०७/प्र.क्र.१४१/विशि-१, दिनांक:- २२ डिसेंबर, २०२३)

अनुकंपा नियुक्तीसाठी नियुक्ती प्राधिकारी यांनी ठेवावयाच्या प्रतीक्षासूचीचा नमुना.

| क्र | प्रतीक्षासूची मधील उमेदवाराचे नाव व पत्ता | उमेदवाराशी संबंधित मुळ कार्यालयाचा पत्ता | प्रतिक्षासूची मधील क्रमांक | प्रतीक्षासूची मध्ये नाव दाखल झाल्याचा दिनांक | जन्म तारीख | शैक्षणिक अर्हता | मागासवर्गीय प्रवर्गाचे नाव/खुला | नियुक्तीसाठी शिफारस केल्याचा दिनांक व क्रमांक | नियुक्तीसाठी शिफारस कोणत्या कार्यालयास केली |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |